सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि. २७ सप्टेंबर २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १६२ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## महाराष्ट्रातील 265 तालुक्यांत दुष्काळ जाहीर, नाशिक विभागातील 'या' 49 तालुक्यांचा समावेश



**Nashik :** पावसाने ओढ दिल्याने निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने अखेर २६५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर केला आहे. राज्यातील ३५८ तालुक्यांपैकी २६५ तालुक्यांमध्ये 'ट्रिगर-१' लागू झाल्याने हा निर्णय घेण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर आज शनिवारी हा निर्णय जाहीर केला.

दुष्काळ जाहीर झालेल्या भागांतील शेतकऱ्यांना जमीन महसुलात सूट, पीक कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी संबंधित कर्जाच्या वसुलीस स्थगिती, कृषीपंपाच्या वीजबिलात सवलत, विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी यांसह विविध सवलती आणि उपाययोजनांचा लाभ मिळणार आहे. दरम्यान, नाशिक महसूल विभागातील नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार आणि अहिल्यानगर या पाच जिल्ह्यांतील ४९ तालुक्यांचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश आहे.

महाराष्ट्रात कोरडा दुष्काळ जाहीर; शेतकऱ्यांना नेमके काय मिळणार ?

**मुंबई :** राज्यातील दुष्काळग्रस्त २६५ तालुक्यांमध्ये कोरडा दुष्काळ जाहीर झाल्यानंतर शेतकरी आणि ग्रामीण भागासाठी विविध सवलती व उपाययोजना लागू करण्यात ...

नाशिक जिल्ह्यातील १० तालुके

मालेगाव, बागलाण, कळवण, नांदगाव, सुरगाणा, इगतपुरी, पेठ, सिन्नर, येवला आणि देवळा.

धुळे जिल्ह्यातील ४ तालुके

धुळे, साक्री, सिंदखेडा आणि शिरपूर.

जळगाव जिल्ह्यातील १५ तालुके

एरंडोल, पारोळा, धरणगाव, चोपडा, पाचोरा, जामनेर, जळगाव, भडगाव, अमळनेर, रावेर, चाळीसगाव, भुसावळ, बोदवड, मुक्ताईनगर आणि यावल.

नंदुरबार जिल्ह्यातील ६ तालुके

अक्कलकुवा, शहादा, नंदुरबार, नवापूर, तळोदा आणि अक्राणी.

अहिल्यानगर जिल्ह्यातील १४ तालुके

नगर, पारनेर, श्रीगोंदा, कर्जत, जामखेड, शेवगाव, पाथर्डी, नेवासा, राहुरी, संगमनेर, अकोले, कोपरगाव, श्रीरामपूर आणि राहता.

५ ऑक्टोबरपासून पंचनाम्यांना सुरुवात

दुष्काळामुळे झालेल्या पीक नुकसानीचे अचूक आकलन करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना ५ ऑक्टोबरपासून प्रत्यक्ष पंचनामे सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. नुकसानीची नोंद पारदर्शक पद्धतीने करण्यासाठी GPS लोकेशनसह छायाचित्रे म्हणजेच जिओ-टॅग्ड फोटो संकलित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. प्रत्यक्ष नुकसानीच्या आकलनानंतर शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या मदतीबाबत पुढील निर्णय घेतला जाणार आहे.

दुष्काळग्रस्त तालुक्यांसाठी जमीन महसुलात सवलत, पीक कर्ज पुनर्गठन, वीजबिल सवलत आणि रोजगार हमीशी संबंधित उपाययोजनांसह विविध मदतीच्या तरतुदी लागू करण्यात आल्या आहेत.

## वृंदावनमध्ये प्रेमानंद महाराजांच्या शिष्याचा संशयास्पद मृत्यू, चार मजली इमारतीवरून उडी

**वृंदावन (उत्तर प्रदेश) :** मथुरेतील प्रसिद्ध प्रेमानंद महाराज यांचे शिष्य दीपक कुमार उर्फ 'रसिक दुलारी सरन' यांचा संशयास्पद परिस्थितीत मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. प्राथमिक माहितीनुसार, त्यांनी प्रेमानंद महाराजांच्या आश्रमामागील एका सोसायटीच्या चौथ्या मजल्यावरून उडी मारली. गंभीर जखमी अवस्थेत त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित करण्यात आले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दीपक कुमार हे गेल्या दीड वर्षापासून आश्रमामागील एका सोसायटीतील फ्लॅटमध्ये राहत होते. ते मूळचे मध्य प्रदेशातील जबलपूर येथील रहिवासी होते. फेब्रुवारी २०२५ मध्ये त्यांनी प्रेमानंद महाराजांकडून दीक्षा घेतल्याची माहिती आहे. शुक्रवारी त्यांनी



अचानक चौथ्या मजल्यावरून खाली उडी मारल्याची प्राथमिक माहिती पोलिसांना मिळाली. घटनेनंतर त्यांना तातडीने सर्वोदय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.या टोकाच्या पावलामागचे नेमके कारण अद्याप अस्पष्ट असून पोलीस या घटनेचा तपास करत आहेत.

घटनेची माहिती मिळताच वृंदावन कोतवाली पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह ताब्यात घेऊन पोस्टमार्टमसाठी पाठवण्यात आला आहे. पोलिसांच्या प्राथमिक तपासात ही आत्महत्या असल्याचा संशय व्यक्त केला जात असला, तरी मृत्यूमागील नेमकं कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. त्यामुळे पोलिसांकडून आत्महत्या तसेच अन्य शक्यतांचा तपास केला जात आहे. आश्रमातील व्यक्ती आणि परिसरातील संभाव्य प्रत्यक्षदर्शींची चौकशी सुरू आहे.

एका वृत्तसंस्थेच्या वृत्तानुसार, पोलिसांना प्राथमिक तपासादरम्यान रसिक दुलारी यांच्या शरीराच्या संवेदनशील भागावर दुखापतीच्या खुणा आढळल्याची माहिती आहे. त्यांच्या खोलीतून एक ग्राइंडरही सापडल्याचे वृत्त आहे. काही प्रत्यक्षदर्शींनी त्यांच्या शरीरावर गंभीर जखमा असल्याचा दावा केला आहे. प्रत्यक्षदर्शींनी प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार रसिक दुलारी यांचं लिंगही कापलेलं होतं, तसंच बरंच रक्तही वाहत होतं.मात्र या सर्व बाबींची अधिकृत पुष्टी होणे बाकी असून, पोस्टमार्टम आणि पोलिस तपासानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

## भारताला स्थायी सदस्यत्व मिळणार? पोर्तुगालने UNSC मध्ये सूचवले महत्त्वाचे बदल

**नवी दिल्ली:** संयुक्त राष्ट्र महासभेमध्ये भारताच्या सदस्यत्वाला पोर्तुगालकडून विशेष समर्थन मिळाले आहे. पोर्तुगालचे पंतप्रधान लुईस मॉन्टेनेग्रो यांनी संयुक्त राष्ट्र महासभेमध्ये संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत (यूएनएससी) सुधारणा करण्याची गरज व्यक्त केली. जगात मोठे बदल झाले आहेत, त्यामुळे सुरक्षा परिषदेतही आणखीन काही राष्ट्रांना प्रतिनिधित्व देण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.



लुईस मॉन्टेनेग्रो यांनी सुरक्षा परिषद अधिक मजबूत करण्यासाठी आफ्रिका, ब्राझील आणि भारताला स्थायी सदस्यत्व देण्याचे समर्थन केले. लुईस मॉन्टेनेग्रो यांच्या मते, आणखीन राष्ट्रांना सदस्यत्व दिल्यामुळे बदलत्या जागतिक परिस्थितीनुसार सुरक्षा परिषद अधिक सक्षम आणि प्रतिनिधित्व करणारी बनेल. या निर्णयामुळे सुरक्षा परिषद अधिक प्रभावीपणे आणि वेगाने काम करू शकेल, असेही पोर्तुगालच्या पंतप्रधानांनी सांगितले.

संयुक्त राष्ट्रांच्या सदस्य देशांनी संघटनेच्या आर्थिक गरजा आणि शांतता मोहिमांसाठी आपली जबाबदारी पूर्ण करायला हवी, असेही त्यांनी नमूद केले. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत एकूण 15 सदस्य असतात. त्यापैकी 5 स्थायी सदस्य आहेत. ज्यामध्ये अमेरिका, रशिया, चीन, फ्रान्स आणि ब्रिटन या पाच राष्ट्रांचा समावेश आहे. या पाचही देशांकडे व्हेटोचा अधिकार आहे. याशिवाय 10 अस्थायी सदस्य असतात, ज्यांची दोन वर्षांच्या कार्यकाळासाठी निवड केली जाते.

## सिक्कीममध्ये मुसळधार पावसाचा कहर; रिम्बी गावात भूस्खलन, 128 जणांना सुरक्षित स्थळी हलवले

**सिक्कीम :** सिक्कीममध्ये गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक भागांमध्ये परिस्थिती गंभीर झाली आहे. पश्चिम सिक्कीममधील ग्यालशिंग जिल्ह्यातील रिम्बी गावात मोठे भूस्खलन झाले आहे. डोंगरावरून मोठ्या प्रमाणात चिखल, दगड आणि माती खाली आल्याने गावातील अनेक घरांचे नुकसान झाले. या घटनेत सात घरे आणि वीज विभागाच्या सहा निवासस्थानांना मोठा फटका बसला आहे. काही घरे ढिगाऱ्यासोबत वाहून गेल्याची माहिती आहे. मात्र, आतापर्यंत या घटनेत कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही.

रिम्बी गावातील युक्सोम-ताशिडोंग भागात सततच्या पावसामुळे डोंगरावरील माती खचली. त्यानंतर मोठ्या प्रमाणात ढिगारा गावाच्या दिशेने आला. भूस्खलनाचा धोका लक्षात घेऊन प्रशासन आणि स्थानिक बचाव पथकांनी तातडीने मदतकार्य सुरू केले. बाधित भागातील



128 हून अधिक नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहे.

दरम्यान, भूस्खलनामुळे रिम्बी-खेचुपेरी रस्ताही बंद झाला आहे. रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखल आणि दगड साचल्याने वाहतूक थांबवण्यात आली आहे. ढिगारा हटवण्याचे काम सुरू असून सततच्या पावसामुळे या कामात अडथळे येण्याची शक्यता आहे.

सिक्कीमच्या इतर भागांमध्येही पावसामुळे वाहतुकीवर परिणाम झाला आहे. राष्ट्रीय महामार्ग 10 च्या काही भागांमध्ये अडचणी निर्माण झाल्या असून सिंगताम आणि गंगटोकदरम्यानचा संपर्कही विस्कळीत झाला आहे. डोंगराळ भागात आणखी भूस्खलन होण्याची शक्यता असल्याने नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने नागरिकांना अनावश्यक प्रवास टाळण्याचा सल्ला दिला आहे. विशेषतः भूस्खलनाचा धोका असलेल्या डोंगराळ भागात जाणे टाळावे, तसेच हवामान आणि प्रशासनाच्या सूचनांकडे लक्ष ठेवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

सिक्कीमचे मुख्यमंत्री प्रेम सिंह तामांग यांनी रिम्बी येथील परिस्थितीची दखल घेत अधिकाऱ्यांना सतर्क राहण्याचे निर्देश दिले आहेत. नागरिकांची सुरक्षा सरकारचे प्राधान्य असल्याचे त्यांनी सांगितले. प्रशासनाकडून परिस्थितीवर लक्ष ठेवण्यात येत असून बाधित नागरिकांना आवश्यक मदत देण्याचे काम सुरू आहे.

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडून परभणी जिल्ह्यातील दुष्काळसदृश परिस्थितीची पाहणी, शेतकऱ्यांच्या जाणून घेतल्या व्यथा

**परभणी:** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दोन दिवसांपूर्वी दुष्काळग्रस्त भागाचा दौरा केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी धाराशिव आणि लातूर जिल्ह्यात थेट बांधावर पोहोचून नुकसानाची पाहणी केली. तर, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अकोला, वाशिम जिल्ह्यात पाहणी केली. त्यातच आज उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी परभणी जिल्ह्यातील दुष्काळसदृश परिस्थितीची पाहणी केली आहे. नुकसान झालेल्या पिकांची पाहणी करत बांधावर जाऊन सुनेत्रा पवार यांनी शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. शिवाय, शेतकऱ्यांनाही त्यांनी धीर दिला.

सकाळपासून आज उपमुख्यमंत्र्यांकडून दुष्काळ भागाची पाहणी केली जात आहे. गेल्या दोन महिन्यांपासून परभणी, नांदेड आणि अनेक जिल्ह्यांमध्ये पाऊस नाहीये. त्यामुळे पीकं करपली आहेत. शेतकरी राजा चिंतेत आहे. शेतकऱ्यांसमोर मोठ संकट येऊन उभं ठाकलं आहे. राज्यात पावसाने पाठ फिरवली. दुष्काळाची स्थिती राज्यात आहे. राज्यात यंदा अपेक्षित पाऊस झाला नाही. पावसाने ओढ दिल्यामुळे परभणी जिल्ह्यात निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार आज परभणी जिल्ह्यातील विविध भागांची भेट देऊन पिक परिस्थितीची पाहणी केली. सर्वप्रथम त्यांनी गंगाखेड तालुक्यातील मरडसगाव येथील पिकांची पाहणी केली.

यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी व समस्या जाणून घेतल्या. संकटाच्या काळात शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये, शासन त्यांच्या पाठीशी असून आवश्यक ती मदत तातडीने उपलब्ध करून देण्यात येईल, असा दिलासा यावेळी दिला. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांशी संवाद साधताना उपमुख्यमंत्र्यांनी त्यांच्या अडचणीही ऐकून घेतल्या. राज्यातील 265 तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. परभणी जिल्ह्यातील नऊ तालुक्यांचा दुष्काळ क्षेत्रामध्ये समावेश करण्यात आला आहे. परभणीतील पूर्णा, पालम, परभणी, सोनपेठ, जिंतूर, गंगाखेड, सेलू मानवत आणि पाथरी अशा नऊ जिल्ह्यांमध्ये शासनाकडून दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे.

दुष्काळग्रस्त भागातील नागरिकांना राज्य शासनाकडून जमीन महसुलातत सूट, शेतीशी निगडित कर्जाच्या वसूलीस स्थगिती, कृषी पंपाच्या चालू विजबिलात सूट अशा अनेक गोष्टींवर शासनाकडून सूट देण्यात आली आहे. यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल.

## कुटुंबात वाद होताच पोलीस कर्मचारी घरातून निघून गेला अन्... पिंपरी चिंचवड पोलीस दलात खळबळ

**पुणे :** गेल्या दोन दिवसांपासून बेपत्ता असलेल्या पिंपरी-चिंचवड पोलिस दलातील एका कर्मचाऱ्याने सेवा पिस्तुलातून स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केल्याचे शनिवारी सकाळी उघडकीस आले. विजय कोळी असे आत्महत्या करणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्याचे नाव असून या घटनेनं पिंपरी चिंचवड पोलीस दलात खळबळ उडाली आहे. निगडीतील ट्रान्सपोर्टनगर बस डेपो परिसरात त्यांचा मृतदेह आढळून आला. कौटुंबिक वादानंतर ते बुधवारी (दि. २३) घरातून निघून गेले होते.

मिळालेल्या माहितीनुसार, पिंपरी चिंचवड पोलिस दलात (Pune Crime News) कार्यरत असणारे विजय कोळी कौटुंबिक कलहातून दोन दिवसांपूर्वी घरातून निघून गेले होते. त्यांच्या पत्नी सारिका विजय कोळी यांनी याबाबत चिखली पोलिस ठाण्यात बेपत्ता असल्याची तक्रार दिली होती. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे कोळी हे आरटीपीसी म्हणून कार्यरत होते. बुधवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास कोळी घरातून निघून गेले. त्यानंतर ते घरी परतले नाहीत. जाताना त्यांच्याकडे सरकारी पिस्तूल असल्याचे समोर आल्यानंतर पोलिस यंत्रणेने त्यांचा शोध सुरू केला होता.

पिंपरी-चिंचवड पोलिस दलात हळहळ

कोळी निगडी दुर्गा देवी टेकडी परिसरात शेवटचे दिसल्याने त्यांचा ड्रोनच्या साहाय्याने देखील शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. आज शनिवारी अखेर सकाळी निगडी ट्रान्सपोर्ट नगर येथील बस डेपोमध्ये त्यांचा मृतदेह आढळून आला.घटनास्थळी सरकारी पिस्तूलही मिळून आले. प्राथमिक तपासात त्यांनी त्याच पिस्तुलातून स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केल्याचे समोर आले आहे.

## "मुख्यमंत्री ज्याला योग्य समजतील, तोच चेअरमन होईल : विखे पाटील

**शिर्डी (प्रतिनिधी) :** जिल्हा बँकेच्या चेअरमनपदाची चर्चा; विखे पाटील म्हणाले, "मुख्यमंत्री ज्याला योग्य समजतील, तोच चेअरमन होईल जिल्हा बँकेच्या संदर्भात माझ्या नावाची चर्चा सुरू आहे, हे माझ्याही कानावर येत आहे. मात्र, माझ्या विरोधात कोण आहे, मला कोणाचा त्रास आहे किंवा माझा कोणाला त्रास आहे, याची मला कल्पना नाही.

माझ्या नावावर शिक्कामोर्तब व्हावं यासाठी मी कुठेही धावत नाही. मी कधीही म्हटलं आहे का की, मी जिल्हा बँकेचा चेअरमन होणार आहे? माझी भूमिका अगदी स्पष्ट आहे माननीय मुख्यमंत्री महोदय ज्याला योग्य समजतील, तोच व्यक्ती जिल्हा बँकेचा चेअरमन होईल.

माझा सध्या जिल्हा बँकेच्या चेअरमनपदासाठी कोणताही संघर्ष किंवा प्रयत्न सुरू नाही. माझे प्रयत्न वेगळ्या दिशेने सुरू आहेत. जागतिक स्तरावर, विशेषतः वर्ल्ड बँकेसारख्या संस्थांमध्ये काही संधी मिळू शकते का, यासाठी मी प्रयत्न करत आहे. देशाच्या आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर आपल्याला काही काम करण्याची संधी मिळते का, हे मी पाहत आहे. त्यामुळे जिल्ह्याच्या राजकारणात मुख्यमंत्री महोदय जो निर्णय घेतील, तो मला मान्य असेल. हीच माझी कालची भूमिका होती आणि आजही तीच भूमिका आहे.

## प्रा. डॉ. मंगेश कराड यांना 'मराठवाडा रत्न' पुरस्कार

### राज्यपाल जिष्णू देव वर्मा आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज ठाण्यात गौरव

तभा वृत्तसेवा

**पुणे :** एमआयटी आर्ट, डिझाइन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष तथा प्र-कुलपती प्रा. डॉ. मंगेश कराड यांना शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल 'मराठवाडा रत्न' पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. मराठवाडा जनविकास परिषद, ठाणे यांच्या वतीने मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचे औचित्य साधून आज (दि. २७ सप्टेंबर) आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.



मराठवाडा जनविकास परिषद ही संस्था गेल्या १७ वर्षांपासून मराठवाड्यातील नागरिकांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवत आहे. संस्थेच्या वतीने दरवर्षी मराठवाडा बहुभाषिक दिन सोहळ्याचे आयोजन केले जाते. यंदाच्या सोहळ्यात शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल प्रा. डॉ. मंगेश कराड यांची 'मराठवाडा रत्न' पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. त्यांच्यासह परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांना 'मराठवाडा मित्र' पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

मराठवाडा जनविकास परिषदेचे अध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम आज सकाळी ११ ते दुपारी १.३० या वेळेत ठाणे येथील गडकरी रंगायतन, तलावपाळी येथे होणार आहे. या कार्यक्रमाला स्थानिक खासदार नरेश म्हस्के आणि आमदार संजय केळकर यांचीही उपस्थिती लाभणार आहे.

प्रा. डॉ. मंगेश कराड हे गेल्या ३५ वर्षांहून अधिक काळापासून शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली एमआयटी एडीटी विद्यापीठात शिक्षण, संशोधन, नवोपक्रम आणि कौशल्यविकासाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध उपक्रम राबविले जातात. शैक्षणिक क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.



CMYK

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## शेतातील शेडमधून ७० हजारांच्या १२ शेळ्या-बोकडांची चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ सप्टेंबर -**

भूम तालुक्यातील साबळेवाडी शिवारातील शेतातील पत्र्याच्या शेडमधून अज्ञात चोरट्याने सुमारे ७० हजार रुपये किमतीच्या १२ शेळ्या-बोकडांची चोरी केल्याची घटना समोर आली आहे.

याबाबत गणेश दगडू शेंडगे (वय ३५, रा. कल्याणस्वामी मठाजवळ, भूम) यांनी भूम पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. शेंडगे यांचे साबळेवाडी येथील गट क्रमांक ११४ मध्ये शेत असून, तेथील पत्र्याच्या शेडमध्ये शेळ्या-बोकड ठेवण्यात आले होते.



दि. २१ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजेपासून दि. २२ सप्टेंबर रोजी सकाळी ६ वाजेच्या दरम्यान अज्ञात व्यक्तीने शेडमधून अंदाजे ७० हजार रुपये किमतीच्या शेळ्या, बोकड व लहान पाटी अशा एकूण १२ जनावरांची चोरी करून नेल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी गणेश शेंडगे यांनी दि. २४ सप्टेंबर रोजी दिलेल्या प्रथम खबरीवरून भूम पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चोरी करणाऱ्या अज्ञात व्यक्तीचा शोध घेण्यासाठी भूम पोलिसांकडून कसून तपास करण्यात आला आहे.



## क्रिडा वृत्त...



### एकलव्य विद्या संकुलाच्या खेळाडूंची तालुकास्तरीय स्पर्धेत चमक

**तुळजापूर, दि.२६ सप्टेंबर**

भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान संचलित एकलव्य विद्या संकुलातील विद्यार्थ्यांनी तालुकास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत अनेक पदके पटकावली. काही खेळाडूंची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. यु-१७ गटात विश्वजीत जाधव याने ३००० मीटरमध्ये प्रथम व १५०० मीटरमध्ये द्वितीय क्रमांक मिळवला. ओंकार निंबाळकर याने ३००० मीटरमध्ये तृतीय क्रमांक, तर कुणाल चव्हाण याची उंच उडीसाठी जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. यु-१४ गटात ओमकार गदेवाड याने ४०० मीटर व ८० मीटर हर्डल्समध्ये प्रथम क्रमांक, दिनेश चव्हाण याने २०० मीटरमध्ये प्रथम व ४०० मीटरमध्ये तृतीय क्रमांक मिळवला. सत्यजित जाधव याने ६०० मीटरमध्ये प्रथम, तर प्रणय सुपलकर याने १०० मीटरमध्ये तृतीय क्रमांक पटकावला. प्रणय, प्रतीक, ओमकार व मेघराज यांच्या संघाने यु-१४ रिले स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला. यशस्वी खेळाडूंचे प्रतिष्ठानचे अध्यक्ष उद्धव काळे, उपाध्यक्ष डॉ. अभय शहापूरकर, कार्यवाह विवेक अयाचित, मुख्याध्यापक विठ्ठल म्हेत्रे यांच्यासह शिक्षक व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.



### महात्मा बसवेश्वर विद्यालयाची मैदानी क्रीडा स्पर्धेत दमदार कामगिरी

**उमरगा, दि.२६ सप्टेंबर**

एकुर्गा येथे २४ सप्टेंबर रोजी झालेल्या तालुकास्तरीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेत श्री महात्मा बसवेश्वर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत विविध क्रीडा प्रकारांत प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावले. १४ वर्षे वयोगटातील मुलांच्या ४-१०० मीटर रिलेमध्ये कैवल्य कांबळे, प्रसाद माने, रिहान तांबोळी व उमर शेख यांच्या संघाने, तर मुलींच्या गटात किरण जाधव, दुर्वा सोनटक्के, पूनम पासवान व जानवी लोंढे यांच्या संघाने प्रथम क्रमांक मिळवला. १७ वर्षे गटात आयुष पवार याने थाळीफेक व गोळाफेकमध्ये प्रथम क्रमांक, तर १४ वर्षे गटात सोहम क्षीरसागर याने लांब उडीत प्रथम क्रमांक पटकावला. १७ वर्षे मुलींच्या ३ किलोमीटर चालणे प्रकारात संध्या चव्हाण हिने द्वितीय क्रमांक मिळवला. या सर्व खेळाडूंची २८ सप्टेंबर रोजी धाराशिव येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. संस्थेचे मार्गदर्शक डॉ. चंद्रकांतराव महाजन, मल्लिकार्जुन आप्पा दंडगे, डॉ. कपिल महाजन, मुख्याध्यापक नेताजी गायकवाड यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. क्रीडा विभाग प्रमुख संजय कोथळीकर व क्रीडा शिक्षक सुरेश गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले.



### बाळेश्वर विद्यालयाच्या विद्यार्थिनींची मैदानी क्रीडा स्पर्धेत दमदार कामगिरी

**तुळजापूर, दि.२६ सप्टेंबर**

तुळजापूर तालुकास्तरीय पावसाळी मैदानी क्रीडा स्पर्धेत श्री बाळेश्वर विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय कामगिरी करत विविध क्रीडा प्रकारांत पदकांची कमाई केली. दीक्षा शिवमूर्ती बोने हिने थाळीफेक, गोळाफेक, भालाफेक आणि हातोडाफेक या चारही प्रकारांत प्रथम क्रमांक मिळवत चार सुवर्णपदके पटकावली. श्रावणी शंकर कानडे हिने हातोडाफेकमध्ये द्वितीय व थाळीफेकमध्ये तृतीय क्रमांक मिळवला. तसेच श्रावणी ज्योर्तिलिंग मेनकुदळे हिने गोळाफेकमध्ये तृतीय क्रमांक मिळवला. या यशस्वी विद्यार्थिनींना क्रीडा शिक्षक विठ्ठल नाईक व मुख्याध्यापक राजेंद्र हजारे यांचे मार्गदर्शन लाभले.



### अर्जुन पाटील यांचे बुद्धिबळ स्पर्धेत यश

**परंडा, दि.२६ सप्टेंबर**

धाराशिव येथील तुळजाभवानी स्टेडियमवर २३ सप्टेंबर रोजी झालेल्या जिल्हास्तरीय शालेय बुद्धिबळ स्पर्धेत परंडा येथील बावची विद्यालयाच्या अर्जुन पाटील याने उल्लेखनीय कामगिरी केली. १४ वर्षे वयोगटातील मुलांच्या गटातून त्याची विभागीय स्तरावरील बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या यशाबद्दल स्पर्धास्थळी अर्जुनचा सत्कार करण्यात आला. संस्थापक अध्यक्ष बिभिषण रोडगे व प्राचार्य नारायण खैरे यांनी त्याचे अभिनंदन करून विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# २६५ तालुके दुष्काळग्रस्त; आता शेतकऱ्यांच्या हातात प्रत्यक्ष काय मिळणार? : आदित्य ठाकरे

**खानापूर येथे शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन केली दुष्काळाची पाहणी...**





**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ सप्टेंबर -**

राज्यातील २६५ तालुके दुष्काळग्रस्त घोषित केल्यानंतर या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या बांधावर आणि हातात प्रत्यक्ष कोणती मदत मिळणार, हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांद्वारे स्पष्ट करून शेतकऱ्यांना धीर द्यावा, असे आवाहन शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी केले.

२६ सप्टेंबर रोजी मराठवाडा दौऱ्यादरम्यान तुळजापूर तालुक्यातील खानापूर येथे त्यांनी दुष्काळी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. दुष्काळाच्या संकटाने खचून जाऊ नका, असे आवाहनही त्यांनी शेतकऱ्यांना केले.

खानापूर येथे शेतकऱ्यांनी ठाकरे यांच्यासमोर कर्जमाफी, पीकविमा, बँकांच्या नोटिसा आणि खरीप पिकांच्या नुकसानीच्या समस्या मांडल्या.

पूर्वी जाहीर झालेली कर्जमाफी अद्याप मिळालेली नाही, पीकविम्याची रक्कम रखडली आहे, तसेच नव्याने कर्जमाफी जाहीर झाली तरी विविध नियम व अटींमुळे तिचा लाभ प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नसल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांनी केल्या. दुष्काळी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करून शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी आयोजित या दौऱ्याला खानापूर येथे शेतकऱ्यांची मोठी उपस्थिती होती.

यावेळी अंबादास दानवे, सुषमा अंधारे, आमदार कैलास पाटील, आमदार प्रवीण स्वामी, नंदूराजे निंबाळकर, संजय निंबाळकर, शामल पवार, श्याम पवार, सुधीर कदम, राज अहमद पठाण, धुळापर राक्षे, सुनील जाधव, जगन्नाथ गवळी यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> **दुष्काळ जाहीर झाला; मात्र मदत नेमकी किती आणि कशी?...**
>
> दुष्काळ जाहीर झाल्यानंतर शासनाकडून शेतकऱ्यांना कोणत्या स्वरूपात आणि किती प्रत्यक्ष मदत मिळणार, याबाबत स्पष्टता असणे आवश्यक आहे. शासनाने मदतीचे स्वरूप जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, असे ठाकरे यांनी सांगितले.

## दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना संपूर्ण परीक्षा शुल्कमाफी

### अभाविपच्या मागणीला यश

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ सप्टेंबर -**

महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये पावसाने दिलेल्या प्रदीर्घ खंडामुळे खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून शेतकरी आणि त्यांच्या कुटुंबीयांसमोर मोठे आर्थिक संकट निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर दुष्काळग्रस्त परिस्थितीची तातडीने दखल घेऊन दुष्काळ जाहीर करावा व दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती देण्यात याव्यात, अशी मागणी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने केली होती.

अभाविपच्या मागणीची दखल घेत राज्य शासनाने राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळाचा पहिला टप्पा लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. यासोबतच दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना संपूर्ण परीक्षा शुल्कमाफी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आर्थिक संकटाचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होऊ नये, यासाठी हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा आहे.

तसेच ५ ऑक्टोबरपासून पीक नुकसानीचे पंचनामे सुरू करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. पंचनाम्याची प्रक्रिया वेगाने व पारदर्शक पद्धतीने पूर्ण करून एकही नुकसानग्रस्त शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, याची प्रशासनाने दक्षता घ्यावी. दुष्काळग्रस्तांसाठी जाहीर केलेल्या सर्व सवलतींची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

अभाविप देवगिरी प्रदेशमंत्री डॉ. वरुणराज नन्नवरे म्हणाले, दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांना संपूर्ण परीक्षा शुल्कमाफीचा निर्णय स्वागतार्ह आहे. मात्र, विद्यार्थ्यांनी आधी शुल्क भरायचे आणि तीन-चार महिन्यांनी शासनाकडून परतावा मिळवायचा, ही प्रक्रिया टाळली पाहिजे. विद्यापीठांनी विद्यार्थ्यांकडून शुल्क न घेता ते स्वनिधीतून भरावे आणि नंतर शासनाकडून त्याची प्रतिपूर्ती करून घ्यावी. संकटाच्या काळात विद्यार्थ्यांना आर्थिक दिलासा देणे हीच या शुल्कमाफीची खरी अंमलबजावणी ठरेल.

## दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी तुळजाभवानी संस्थानने ५ कोटी द्यावेत : मधुकरराव चव्हाण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ सप्टेंबर -**

धाराशिव जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानने मुख्यमंत्री सहाय्यता निधीस ५ कोटी रुपयांची मदत द्यावी, अशी मागणी माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांनी जिल्हाधिकारी तथा श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे अध्यक्ष यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती गंभीर बनली असून संपूर्ण खरीप हंगाम हातातून गेला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे. त्यातच रब्बी हंगामाचीही आशा मावळली असून अनेक भागांत आतापासूनच पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवत आहे. आगामी काळात पाणीटंचाईची तीव्रता आणखी वाढण्याची शक्यता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.



यंदाच्या दुष्काळी संकटातही संस्थानने पुढाकार घेऊन ५ कोटी रुपयांची मदत मुख्यमंत्री सहाय्यता निधीस द्यावी, अशी मागणी चव्हाण यांनी केली आहे.

दुष्काळामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकरी व ग्रामीण भागातील नागरिकांना मदत मिळण्यासाठी या निधीचा उपयोग व्हावा आणि दुष्काळ निवारणाच्या उपाययोजनांना बळ मिळावे, यासाठी मंदिर संस्थानने सामाजिक बांधिलकीतून सहकार्य करावे, असेही निवेदनात म्हटले आहे.

## धाराशिव जिल्ह्यातील आठही तालुक्यांचा दुष्काळाच्या यादीत समावेश

**धाराशिवच्या शेतकऱ्यांना घोषणांपेक्षा प्रत्यक्ष मदतीची प्रतीक्षा**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ सप्टेंबर -**

राज्यातील खरीप हंगाम २०२६ मध्ये टीगर-१ (प्रथम कळ) लागू झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये शासनाने दुष्काळ जाहीर करून विविध उपाययोजना व सवलती लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये धाराशिव जिल्ह्यातील धाराशिव, कळंब, भूम, वाशी, तुळजापूर, लोहारा, परंडा आणि उमरगा या आठही तालुक्यांचा समावेश आहे.




पावसाचा प्रदीर्घ खंड पडल्याने जिल्ह्यातील खरीप हंगाम संकटात सापडला आहे. सुरुवातीच्या पावसानंतर दीर्घकाळ पाऊस न झाल्याने सोयाबीन, तूर, उडीद, मूग, मका, कापूस यासह विविध पिकांवर परिणाम झाला आहे. अनेक भागांत पिके वाढीच्या महत्त्वाच्या अवस्थेत असतानाच पावसाअभावी कोमेजली आहेत. त्यामुळे उत्पादन घटण्याची शक्यता असून शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे.



दुष्काळ जाहीर झाल्याने संबंधित तालुक्यांमध्ये जमीन महसुलात सूट, पीक कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी संबंधित कर्जवसुलीस स्थगिती, कृषी पंपांच्या वीजबिलात सवलत, रोजगार हमीच्या कामांच्या निकषात शिथिलता, आवश्यकतेनुसार टँकरने पाणीपुरवठा, चारा व अन्नधान्याची व्यवस्था अशा उपाययोजनांचा मार्ग मोकळा झाला आहे.

जिल्हाधिकाऱ्यांना पंचनाम्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

आता जिल्ह्यातील सर्व आठ तालुके दुष्काळाच्या कक्षेत आल्याने शेतकरी, पशुपालक आणि शेतमजुरांचे लक्ष प्रत्यक्ष मदतीकडे लागले आहे.

विशेषतः खरीप पिकांच्या नुकसानीचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन करून पंचनामे, नुकसानग्रस्त क्षेत्राचे मूल्यांकन आणि पात्र लाभार्थ्यांना मदत देण्याची प्रक्रिया जलदगतीने राबविण्याची मागणी होत आहे.

> **मुख्यमंत्र्यांनी पाहणी केली; आता आश्वासनाची अंमलबजावणी कधी?**
>
> मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी धाराशिव जिल्ह्यातील करजखेडा आणि मलकापूर (येरमाळा) येथे दुष्काळी परिस्थितीची पाहणी करून नुकसानग्रस्त शेतीची पाहणी केली होती. यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेत शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याचे सांगितले होते. आता जिल्ह्यातील आठही तालुके दुष्काळग्रस्त घोषित झाल्यानंतर शासनाच्या उपाययोजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी आणि शेतकऱ्यांना मदत मिळण्याची प्रक्रिया वेगाने सुरू होण्याची अपेक्षा आहे.

## जागतिक फार्मसी दिनानिमित्त विद्यार्थ्यांचे ज्ञान, सर्जनशीलता पोस्टरमधून अविष्कार



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ सप्टेंबर -**

जागतिक फार्मसी दिनानिमित्त श्री भैरवनाथ निसर्ग मंडळ कॉलेज ऑफ डी. फार्मसी अँड बी. फार्मसी महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या ज्ञानाला, सर्जनशीलतेला आणि संशोधनवृत्तीला चालना देण्याच्या उद्देशाने आयोजित या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

दरवर्षी २५ सप्टेंबर रोजी जागतिक फार्मसी दिन साजरा केला जातो. यानिमित्त महाविद्यालयात विविध शैक्षणिक व जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात आले. पोस्टर प्रेझेंटेशनमध्ये बी. फार्मसीच्या विविध वर्षांतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. औषधांचा योग्य वापर, औषध सुरक्षा, फार्मासिस्टची आरोग्यसेवेतील भूमिका, औषधांचे दुष्परिणाम, फामकोव्हिजिलन्स, जनजागृती, आधुनिक औषधनिर्मिती तंत्रज्ञान, हर्बल औषधे आणि विविध आरोग्यविषयक विषयांवर विद्यार्थ्यांनी आकर्षक व माहितीपूर्ण पोस्टर्स सादर केले.

विद्यार्थ्यांनी पोस्टर्सच्या माध्यमातून शास्त्रीय माहिती, आकृत्या, चित्रे आणि महत्त्वपूर्ण मुद्दे प्रभावीपणे मांडले. तसेच परीक्षकांसमोर पोस्टरचे सादरीकरण करून विषयासंदर्भातील प्रश्नांची उत्तरे दिली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या संवादकौशल्य, सादरीकरण कौशल्य, विषयज्ञान, संशोधनवृत्ती आणि आत्मविश्वासाला चालना मिळाली.

उद्घाटनप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरज ननवरे यांनी मार्गदर्शन केले. फार्मासिस्ट हा केवळ औषध वितरण करणारा घटक नसून रुग्णांना सुरक्षित व प्रभावी औषधोपचार मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावणारा आरोग्यसेवा व्यावसायिक आहे, असे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी अद्ययावत ज्ञान, संशोधनवृत्ती आणि सामाजिक बांधिलकी जोपासावी, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमासाठी डॉ. गणेश मते व डॉ. अझर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. विषयाची निवड, वैज्ञानिक माहिती, मांडणी, सर्जनशीलता आणि सादरीकरण या निकषांवर त्यांनी पोस्टर्सचे मूल्यमापन केले. सूत्रसंचालन प्रा. हजारे यांनी, तर आभार प्रदर्शन प्रा. मुंडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## शेतातून ३० हजारांचे तांब्याचे वायर चोरीला

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ सप्टेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील ढेकरी शेतशिवारातून पानबुडी मोटारचे ७४५ मीटर तांब्याचे वायर अज्ञात व्यक्तीने चोरून नेल्याची घटना घडली. या वायरची किंमत सुमारे ३० हजार रुपये आहे.


फिर्यादी शिवाजी मधुकर रोडे (वय ४४, रा. ढोकी) यांच्या शेतातून १५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ ते १६ सप्टेंबर रोजी ही चोरी झाली. याप्रकरणी रोडे यांनी २४ सप्टेंबर रोजी दिलेल्या फिर्यादीवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## दुष्काळाने शेतकरी उद्धवस्त; आता मदतीचा हात द्या!

**हेक्टरी ५० हजारांची मदत, शेतमजुरांना कुटुंबामागे २५ हजार द्या; रोहित पवारांची विभागीय आयुक्तांकडे मागणी**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ सप्टेंबर -**

मराठवाड्यात दुष्काळाची तीव्रता वाढत असून खरीप हंगाम मोठ्या प्रमाणात हातातून गेला आहे. अनेक गावांमध्ये पिकांचे नुकसान झाले असून पिण्याच्या पाण्याचेही गंभीर संकट निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर आमदार रोहित पवार यांनी मागील दोन दिवसांत मराठवाड्यातील विविध भागांची प्रत्यक्ष पाहणी करून शेतकरी व शेतमजुरांशी संवाद साधला. त्यानंतर विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांची भेट घेऊन दुष्काळग्रस्तांसाठी तातडीच्या मदतीची मागणी केली.




रखडलेला पीकविमा त्वरित वितरित करावा, शेतकऱ्यांची कर्जमाफी करावी आणि नियमित कर्जदार शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान तातडीने द्यावे, अशी मागणी पवार यांनी केली. दुष्काळामुळे खरीप पिकांचे मोठे नुकसान झाल्याने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयांची तातडीची मदत द्यावी, अशीही मागणी करण्यात आली. त्यामुळे रोजगारापासून वंचित शेतमजुरांना प्रत कुटुंब २५ हजार रुपयांची आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. शासनाने परिस्थितीची गांभीर्याने दखल घेऊन दुष्काळ निवारणाच्या उपाययोजना तातडीने राबवाव्यात, अशी मागणी पवार यांनी केली.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरदचंद्र पवार) जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्सची नवीन शाखा

**जालना, :** आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड ("एबीएचएफएल") या आघाडीच्या हाऊसिंग फायनान्स कंपनी आणि आदित्य बिर्ला कॅपिटल लिमिटेडच्या उपकंपनीने महाराष्ट्रातील आपला विस्तार वाढवत जालना येथे नवीन शाखा सुरू केली आहे. देशभरातील शाखांचे नेटवर्क वाढवण्याच्या व्यापक योजनेअंतर्गत ही शाखा सुरू करण्यात आली आहे. या नवीन शाखेमुळे महाराष्ट्रातील एबीएचएफएलच्या शाखांची एकूण संख्या 43 झाली आहे. यामुळे वेगाने वाढणाऱ्या बाजारपेठांमध्ये कंपनीची उपस्थिती मजबूत होऊन ग्राहकांना अधिक सहजपणे सेवा उपलब्ध होणार आहे. जालन्यातील गृहनिर्माण बाजारपेठेत सातत्याने वाढ होत आहे.

## आई-मुलीच्या नात्यातील परस्पर ताकद

**मुंबई :** डॉटर्स डेच्या निमित्ताने क्लिनिक प्लसने आई-मुलीच्या नात्यातील परस्पर ताकद अधोरेखित करणारी नवी चित्रफीत सादर केली आहे. चित्रफितीत एका लेखिकेच्या आयुष्याचा प्रवास दाखवण्यात आला असून, तिच्या संघर्षात मुलगी कशी आधार आणि प्रेरणा बनते, हे मांडले आहे. आईने मुलीला खंबीर, स्वावलंबी आणि स्वतःचा आवाज शोधायला शिकवले; कालांतराने तीच मुलगी आईला स्वतःसाठी उभे राहण्याचे बळ देते.

## डिजिटल रुपयाचे नवीन प्रकार सादर

मुंबई- एचडीएफसी बँकेने 'डिजिटल रुपया'चे (सीबीडीसी) विविध उपयोग सादर केले असून यातून दैनंदिन ग्राहक व्यवहार आणि कॉर्पोरेट कार्यप्रणाली या दोन्ही क्षेत्रांत भारताच्या या सार्वभौम डिजिटल चलनाचे वाढते महत्त्व अधोरेखित होते. गेल्या आठवड्यात एका उद्योग-मंचावर सादर करण्यात आलेल्या या उपक्रमांमधून डिजिटल रुपयाची व्यावहारिक उपयुक्तता, नियामक नियमांचे पालन आणि व्यापक उपलब्धता या बाबी स्पष्ट होतात. तसेच, भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेचा एक सहज आणि दैनंदिन भाग म्हणून डिजिटल रुपयाचे स्थान यामुळे अधिक दृढ होत आहे.

## जेएसडब्ल्यू समूहाची धडाकेबाज एन्ट्री

**मुंबई:** जेएसडब्ल्यू समूहाची व्यावसायिक इलेक्ट्रिक वाहन कंपनी असलेल्या जेएसडब्ल्यू ग्रीनटेक लिमिटेडने आज ॲम्पस्टार हा ब्रँड सादर केला. कंपनी या ब्रँडअंतर्गत भारतात इलेक्ट्रिक बसेस आणि ट्रक्सची रचना, निर्मिती आणि विक्री करणार आहे. या उपक्रमाद्वारे समूहाने कमर्शिअल मोबिलिटी क्षेत्रात पदार्पण केले आहे.हा ब्रँड एम्पस्टार: जेएसडब्ल्यू द्वारे समर्थित या ओळखीसह बाजारात येईल. एम्पस्टार ची रचना ग्राहकांच्या संपूर्ण प्रवासाचा विचार करून, एक सर्वसमावेशक व्यावसायिक गतिशीलता सेवा म्हणून करण्यात आली आहे. केवळ वाहनांची निर्मितीच नाही, तर चार्जिंग सुविधा, ऑपरेटिंग सोल्युशन्स, आर्थिक सहकार्य आणि विक्री-पश्चात सेवा यांचाही यात समावेश आहे; जेणेकरून चालक आत्मविश्वासाने इलेक्ट्रिक वाहनांचा स्वीकार करू शकतील. ग्राहकांना 150 किलोवॅट ते 500 किलोवॅट क्षमतेचे पॉवर कॉन्फिगरेशन्स निवडण्याचे स्वातंत्र्य असेल. तसेच, थेट खरेदी, लीजिंग, बॅटरी ॲज अ सर्व्हिस आणि मालकी हक्काच्या किंवा संचालनाच्या इतर विविध पर्यायांपैकी निवड करण्याची सुविधाही त्यांना मिळेल.

## गॅलेक्सी वॉचमधील आरोग्यविषयक सुधारीत वैशिष्ट्ये

**गुरुग्राम :** सॅमसंग रिसर्च इन्स्टिट्यूट-नोएडा (एसआरआय-एन) गॅलेक्सी वॉच९ आणि गॅलेक्सी वॉच अल्ट्रा२ मधील आरोग्य आणि फिटनेसविषयक क्षमता विकसित करण्यात हातभार लावत आहे. तसेच, भारतातील परिस्थितीमध्ये या वेअरेबल सॉफ्टवेअरची प्रत्यक्ष चाचणीही घेत आहे. सॅमसंग रिसर्च इन्स्टिट्यूट-नोएडाचे मॅनेजिंग डायरेक्टर क्युंगयुन रू म्हणाले, "स्मार्टवॉचशी संबंधित वैशिष्ट्यांसह डिजिटल आरोग्य आमच्यासाठी महत्त्वाचे क्षेत्र आहे. गेल्या तीन ते चार वर्षांत आम्ही खास भारतासाठी अनेक नवीन सेवा सुरू केल्या आहेत.''

## पर्यावरण संरक्षणाची बांधिलकी पुन्हा व्यक्त केली

**बंगळुरू:** जागतिक पर्यावरण आरोग्य दिनानिमित्त टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने पर्यावरणाचे संरक्षण आणि शाश्वत विकासासाठी आपली बांधिलकी पुन्हा व्यक्त केली. टोयोटा अर्थ चार्टर आणि टोयोटा एन्व्हायर्नमेंटल चॅलेंज 2050 च्या उद्दिष्टांनुसार, टीकेएमने आर्थिक वर्ष 2021 पासून उत्पादन प्रक्रियेसाठी 100% नवीकरणीय विजेचा वापर सुरू केला आहे. यामुळे कंपनीच्या कामकाजातून होणारे हरितगृह वायूंचे उत्सर्जन मोठ्या प्रमाणात कमी झाले आहे. कंपनी काइझेन उपक्रम, आधुनिक तंत्रज्ञान आणि कॉम्प्रेस्ड बायोगॅससारख्या स्वच्छ इंधनांचा वापर करून ऊर्जा बचत आणि कार्यक्षमता वाढवण्यावर सातत्याने भर देत आहे.

## सामाजिक-आर्थिक विकासासाठी सक्षम वीज पारेषण जाळे

**धुळे:** उत्तर महाराष्ट्रात उद्योग, कृषी, लॉजिस्टिक्स, शिक्षण आणि शहरी विकास या क्षेत्रांत वाढत्या संधी निर्माण होत आहेत. तथापि, ही सामाजिक-आर्थिक प्रगती टिकवून ठेवण्यासाठी केवळ विविध क्षेत्रांतील गुंतवणूक आणि पायाभूत सुविधा पुरेशा नाहीत. घरे, शेते, व्यवसाय, कारखाने, रुग्णालये आणि शैक्षणिक संस्थांपर्यंत कोणताही व्यत्यय न येता वीज पोहोचेल याची खात्री करण्यासाठी एक विश्वसनीय आणि सक्षम वीज पारेषण जाळे असणे तितकेच आवश्यक आहे. उत्तर महाराष्ट्रातील एक उदयोन्मुख औद्योगिक आणि आर्थिक केंद्र म्हणून धुळे आपली स्थिती बळकट करत असताना, विश्वसनीय वीज पायाभूत सुविधांचे महत्त्व वाढत आहे. अवधान येथील धुळे एमआयडीसी (MIDC) मध्ये अनेक उत्पादन, व्यावसायिक आणि संबंधित औद्योगिक घटक कार्यरत आहेत; तसेच सिंदखेडा येथील नर्डाना औद्योगिक क्षेत्राचा विकास 'ग्रोथ सेंटर' म्हणून केला जात आहे आणि ब्राह्मणवेल व रायपूरचीही औद्योगिक विकासासाठी निवड करण्यात आली आहे. या क्षेत्रांचा विस्तार होत असताना, उद्योग, कृषी, शीतगृहे, लघु व मध्यम उद्योग आणि सार्वजनिक सेवांसाठी अखंड वीजपुरवठा आवश्यक आहे. एक मजबूत पारेषण जाळे वीज निर्मिती केंद्रांपासून वाढती मागणी असलेल्या क्षेत्रांपर्यंत विजेचा विश्वसनीय पुरवठा करण्यास मदत करू शकते, ज्यामुळे धुळेचा औद्योगिक आणि सामाजिक-आर्थिक विकास शाश्वत राहण्यास मदत होईल.

# राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम व 'मिशन महाग्राम'चा आढावा

### आरोग्य संस्थांमध्ये गुणवत्ता मानकांची प्रभावी अंमलबजावणी करा -अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे



तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यातील आरोग्य संस्थांमध्ये नागरिकांना अधिक दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करता याव्या यासाठी राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानके (NQAS) कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करावी. मूल्यांकनासाठी पात्र आरोग्य संस्थांनी निर्धारित निकषांची पूर्तता करून राज्य व राष्ट्रीय स्तरावरील मूल्यांकनासाठी आवश्यक तयारी काटेकोरपणे करावी, असे निर्देश अपर जिल्हाधिकारी संभाजी अडकुणे यांनी दिले.

राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमांतर्गत नव्याने गठित जिल्हास्तरीय गुणवत्ता आश्वासन समितीची बैठक अपर जिल्हाधिकारी अडकुणे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कमलाकर मुदखेडकर, जिल्हा परिषदेचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशनचे सहमुख्य कार्यकारी अधिकारी दिलीपसिंग बयास यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी व समिती सदस्य उपस्थित होते.

जिल्हा गुणवत्ता नियमन कार्यक्रमांतर्गत मार्गदर्शक सूचनांनुसार अंमलबजावणी करण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत जिल्हा रुग्णालय, सर्व उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, दोन नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, नऊ हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाने तसेच सर्व आरोग्य उपकेंद्रांची निवड करण्यात आली आहे.

निवड करण्यात आलेल्या आरोग्य संस्थांमध्ये सेवांचा गुणवत्ता दर्जा उंचावण्यासाठी समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. या समित्यांमार्फत सर्व संस्थांचे प्राथमिक मूल्यांकन पूर्ण करण्यात आले आहे. तसेच अंतर्गत मूल्यांकन व जिल्हास्तरीय गुणवत्ता आश्वासन कक्षामार्फत मूल्यांकनाची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे.

या मूल्यांकनात ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त करणाऱ्या आरोग्य संस्थांचे पुढील टप्प्यात राज्यस्तरीय चमूमार्फत तर राज्यस्तरीय मूल्यांकनात पात्र ठरणाऱ्या संस्थांचे नंतर राष्ट्रीय स्तरावरील चमूमार्फत मूल्यांकन करण्यात येईल. संबंधित यंत्रणांनी मूल्यांकनातील त्रुटींची पूर्तता करून आरोग्य संस्थांचा गुणवत्ता दर्जा सातत्याने उंचावण्यासाठी प्रयत्न करावेत, अशा सूचनाही अडकुणे यांनी दिल्या.


मिशन महाग्राम'च्या कामांचाही आढावा

यापूर्वी झालेल्या 'मिशन महाग्राम'च्या जिल्हास्तरीय बैठकीतही अपर जिल्हाधिकारी अडकुणे यांनी अभियानांतर्गत सुरू असलेल्या कामांचा आढावा घेतला. ग्रामीण भागात सामाजिक परिवर्तनाला गती देण्याच्या उद्देशाने राज्यात 'मिशन महाग्राम' राबविण्यात येत आहे. या अभियानात कन्नड, गंगापूर व खुलताबाद तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे.

'मिशन महाग्राम'च्या माध्यमातून विविध विभागांच्या समन्वयाने ग्रामीण भागातील विकासकामांना गती देण्यासोबतच सामाजिक परिवर्तनाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी प्रभावीपणे काम करावे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# संधी अधिक प्रयत्न म्हणजे गुणवत्ता : ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. आ. ह. साळुंखे

### एमजीएम विद्यापीठाचा पाचवा दीक्षांत समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न




**छत्रपती संभाजीनगर, दि. २६ :** संधी अधिक प्रयत्न म्हणजे गुणवत्ता. आई-वडिलांनी, शिक्षकांनी आणि समाजाने प्रत्येक व्यक्तीला आपले व्यक्तिमत्त्व फुलविण्याची संधी दिली पाहिजे. ही संधी मिळाल्यानंतर व्यक्तीने अहोरात्र कष्ट करून त्या संधीचे चीज केले पाहिजे आणि त्यातून स्वतःसोबत समाजाचे व मानवजातीचेही कल्याण साधले पाहिजे. आपल्याला संधी मिळते, आपला विकास होतो आणि आपण विकसित होतो, तेव्हा आपल्या आधीच्या असंख्य पिढ्या त्यासाठी खपलेल्या असतात, हे विसरता कामा नये. आपण यशस्वी झाल्यानंतर थोडे मागे वळून पाहिले पाहिजे. अजूनही अज्ञानात खितपत पडलेल्या लोकांना बळ देणे, त्यांना पुढे घेऊन येणे ही आपली जबाबदारी आहे. स्वतःला फुलविण्यापेक्षा इतरांना फुलविण्यासाठी आपण जितके अधिक प्रयत्न करू, तितके आपले मानवी जीवन अधिक सफल झाले, असे समजता येईल, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक प्रा.डॉ.आ.ह.साळुंखे यांनी यावेळी केले.

यावेळी, ज्येष्ठ साहित्यिक प्रा..डॉ.आ.ह.साळुंखे, पद्मविभूषण डॉ.रघुनाथ माशेलकर (दूरदृश्य प्रणालीमार्फत), एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, विद्यापीठाच्या नियामक मंडळाचे सदस्य डॉ.पी.एम.जाधव,डॉ. सुधीर कदम, डॉ.नितीन कदम, भाऊसाहेब राजळे, डॉ.रणजीत कक्कड, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर विविध क्षेत्रातील मान्यवर व विद्यार्थी उपस्थित होते.

# उर्दू माध्यम शिक्षकांचे दोन महिन्यांचे वेतन प्रलंबित; शिक्षक भारतीतर्फे निवेदन

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२६ सप्टेंबर

उर्दू माध्यमातील शिक्षकांचे गेल्या दोन महिन्यांपासून वेतन प्रलंबित असल्याने शिक्षक भारती संघटनेच्या वतीने गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती सोयगाव यांना निवेदन देण्यात आले. प्रलंबित वेतनामुळे शिक्षकांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असून, या गंभीर प्रश्नाची तातडीने दखल घेऊन प्रलंबित वेतन अदा करावे, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.



> शिक्षकांचे प्रश्न हे केवळ कागदावरील प्रश्न नसून त्यांच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाशी संबंधित आहेत.त्यामुळे प्रलंबित वेतनाचा प्रश्न तातडीने सोडवून शिक्षकांना त्यांचा हक्काचा पगार मिळावा अशी भूमिका शिक्षक भारतीच्या वतीने मांडण्यात आली
>
> - किरणकुमार पाटील,
> शिक्षक भारतीचे सोयगाव तालुकाध्यक्ष

विशेषतः शिक्षण सेवकांना प्रलंबित वेतनामुळे होणाऱ्या आर्थिक अडचणी व मानसिक तणावाची जाणीव ठेवून शिक्षक भारतीचे तालुकाध्यक्ष किरणकुमार पाटील यांनी या प्रश्नासाठी पुढाकार घेतला.शिक्षण सेवकांच्या अडचणी समजून घेत त्यांचा प्रश्न प्रशासनापर्यंत प्रभावीपणे पोहोचवून लवकरात लवकर प्रलंबित वेतन मिळावे, यासाठी त्यांनी गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे निवेदन सादर केले.

शिक्षकांच्या प्रश्नांबाबत संवेदनशील भूमिका घेत किरणकुमार पाटील यांनी शिक्षण सेवकांच्या पाठीशी ठामपणे उभे राहून त्यांच्या न्याय्य मागणीसाठी पुढाकार घेतल्याबद्दल शिक्षकांमधून समाधान व्यक्त होत आहे. प्रलंबित वेतनाचा प्रश्न तातडीने मार्गी लागावा आणि शिक्षकांना आर्थिक दिलासा मिळावा, यासाठी प्रशासनाने सकारात्मक कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

## फारोळा येथील ग्रामपंचायत स्वच्छता पंधरवाडा सुरू

बिडकिन दि २६ सप्टेंबर पैठण तालुक्यातील फारोळा येथे १७ सप्टेंबर ते २ आक्टोंबर दरम्यान स्वच्छता पंधरवाडा अभियान राबविण्यात येत आहे.या मोहीमेत प्रशासक .बी.डि.राठोड ग्रामपंचायत अधिकारी आशाताई तुपे.दिलीप गोरे,गणेश गायकवाड,तेजस जाधव,संजय धुमाळ,रविंद्र पवार,मंगेश धुमाळ आदींनी सहभाग घेतला आहे.याअंतर्गत गावात पाणीपुरवठा करण्यासाठी उभारण्यात आलेल्या टाक्या, पाणी पुरवठा संबंधित परीसर,विहिरी, पिण्याच्या पाण्याचे स्रोत,अंगणवाडी शाळा ग्रामपंचायत कार्यालय टाक्या व परिसर स्वच्छ करून पाणी नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात येत आहे.ग्रामस्थांनी सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकल्यास ३ हजार रुपये दंड ठोठावण्याचा व आदेशानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल असा इशारा ग्रामपंचायत कार्यालय कडून देण्यात आला आहे.

शेतकरी व पशुधणासाठी तात्काळ उपाययोजना राबवा.. डॉ.कल्याण काळे

तभा वृत्तसेवा



**पैठण दि २६ :-** संपूर्ण मराठवाड्यात दुष्काळाने थैमान घातल्याने शासनाने शेतकरी दुष्काळ घोषित करून शेतकरी व पशुधणासाठी तात्काळ उपाययोजना राबवावी नसता महाविकास आघाडीच्या वतीने भव्य आंदोलन करण्यात येईल तसेच वेळ पडल्यास मराठवाड्यात मंत्र्यांना फिरू देणार नाही अशी प्रतिक्रिया जालना लोकसभा संघांचे खासदार डॉ. कल्याण काळे यांनी दिली. पैठण तालुक्याचा दुष्काळ भागी दौरा करून तहसील कार्यालयात नायब तहसीलदार यांना निवेदन देऊन ही मागणी कारण्यात आली यावेळी माजी मंत्री अनिल पटेल,जिल्हाध्यक्ष किरण पाटील डोणगांवकर, जिल्हा उपाध्यक्ष जगन्नाथ काळे, जिल्हा उपाध्यक्ष दिलीप भोसले,प्रभारी मुसा पटेल,तालुकाध्यक्ष रमेश मुळे,राजेश डोंगरे,संभाजी काटे आदींची उपस्थिती होती.

पैठण तालुक्यात दुष्काळ घोषित करावा,शेतकऱ्यांकडील कर्ज वसुलीस स्थगिती व कर्जमाफी द्यावी,गुरांसाठी चारा छावण्या सुरु कराव्यात,रोजगार हमी योजनेतर्गत मागेल त्याला काम उपलब्ध करून द्यावे,जायकवाडी धरण्याच्या पाण्याचे नियोजन करून पाणी उपलब्ध करून द्यावे,पाणी टंचाई गावांना मागणीनुसार तात्काळ पाणी टँकर सुरु करावे अश्या विविध मागण्या यावेळी कारण्यात आल्या.जेष्ठ नेते ,सदानंद खडसन, युवक अध्यक्ष रवींद्र पाटील आमले, किशोर दसपुते, शेखर देशमुख, लतीफ सय्यद, राहुल सावंत, हसन पठाण, गणेश गायकवाड आदी निवेदन देतांना हजर होते.

## सिल्लोड येथे बुलडाणा अर्बनतर्फे श्री गणेश उत्सवानिमित्त महाप्रसाद (भंडारा) संपन्न



तभा.वृत्तसेवा

**सोयगाव,दि.२६ सप्टेंबर :** बुलडाणा अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी मर्यादित, बुलडाणा यांच्या वतीने सालाबादप्रमाणे याही वर्षी श्री गणेश उत्सवानिमित्त महाप्रसाद (भंडारा) कार्यक्रमाचे आयोजन रविवार,दि. 20 सप्टेंबर 2026 रोजी करण्यात आले.सदर कार्यक्रम संस्थेच्या स्व-मालकीच्या बुलडाणा अर्बन वेअर हाऊस गोदाम,भोकरदन रोड, सिल्लोड येथे मोठ्या उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाचे आयोजन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राधेश्यामजी चांडक (भाईजी), संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुकेश झंवर तसेच बुलडाणा अर्बन चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्षा कोमलताई झंवर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. याप्रसंगी विभागीय कार्यालय सिल्लोड येथे कासट सर, सरव्यवस्थापक बुलडाणा अर्बन यांच्या उपस्थितीत तसेच सिल्लोड विभागातील सर्व शाखा संचालक व विभागातील इतर शाखांचे शाखा संचालक यांच्या हस्ते श्री गणेशाची सामूहिक आरती व विधिवत पूजा करण्यात आली.

## खासदारांना स्वीडन कुठं ते माहित नाही ! ; डॉ सुजय विखे पाटील

**शिर्डी (प्रतिनिधी) :** खासदारांचे काही ठरलेले डायलॉग आहेत. त्यांना स्वीडन कुठे आहे, हेही माहिती नाही, त्यामुळे त्यांनी या विषयावर भाष्य करू नये. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, मागील दोन वर्षांत या जिल्ह्याच्या विकासासाठी एक रुपयाचाही निधी आणता आला नाही. जिल्ह्यासाठी ठोस काम करता आलं नाही. त्यामुळे दुसऱ्यांच्या कौटुंबिक वादात किंवा कौटुंबिक संवादात पडून त्याचं राजकारण करणं, ही विचारसरणीच या जिल्ह्यासाठी धोकादायक आहे. राजकीय व्यक्तीचं राजकीय आणि व्यक्तिगत असं दोन वेगळं आयुष्य असतं. राजकीय आयुष्यात पक्ष असतात, पक्षाच्या भूमिका असतात आणि आरोप-प्रत्यारोपही होतात. मात्र, व्यक्तिगत आयुष्याची एक मर्यादा असते.

गेल्या काही वर्षांत खासदारांवर अनेक आरोप झाले. महिलांशी संबंधित आरोप झाले, कॉल रेकॉर्डिंगही समोर आली. मात्र, मी कधीही त्या मुद्द्यांचा राजकीय फायदा घेऊन भाष्य केलेलं नाही.

**दि अकोला अर्बन को-ऑप. बँक लि., अकोला**
॥ सहकारेण जनकल्याणम् ॥
(मल्टिस्टेट शेड्युल्ड बँक)
प्रशासकीय कार्यालय : 'जनकल्याण' ५८/५९ तोष्णीवाल ले आऊट, मूर्तीजापूर रोड अकोला

**टेंडर सूचना**

बँकेच्या प्रशासकीय कार्यालय व १० शाखांकरिता SOLAR PANAL लावणे करीता टेंडर मागविण्यात येत आहे. या टेंडर बद्दल सर्व माहितीची प्रत बँकेच्या वेबसाईट www.akolaurban.bank.in वर Tender & Auction मध्ये उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी मो.क्र. 7767806508 वर चौकशी करावी.

ता. २६.०९.२०२६

मुख्य कार्यकारी अधिकारी
दि अकोला अर्बन को–ऑप बँक लि., अकोला

# ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थ्यांचा श्री घृष्णेश्वर विद्यालयात सत्कार



तभा वृत्तसेवा

**खुलताबाद प्रतिनिधी**

**खुलताबाद :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता, जिद्द आणि कष्ट करण्याची तयारी असेल तर ते कोणत्याही क्षेत्रात मोठे यश संपादन करू शकतात, हे श्री घृष्णेश्वर विद्यालय, खुलताबाद येथील विद्यार्थ्यांनी आपल्या कर्तृत्वातून सिद्ध केले आहे.

विद्यालयातील इयत्ता बारावीचे विद्यार्थी *दानिश शेख* आणि *संघर्ष नागे* यांनी वैद्यकीय क्षेत्रातील *एमबीबीएस* अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी पात्रता मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले. त्याचबरोबर विद्यालयाचा विद्यार्थी हर्षवर्धन बाळासाहेब नागे याची ज्युदो-कुस्ती (ग्रीको-रोमन) स्पर्धेसाठी *ब्राझील* येथे होणाऱ्या अंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ग्रामीण भागातील या विद्यार्थ्यांच्या यशामुळे विद्यालयासह संपूर्ण परिसराचा गौरव झाला आहे.

या गुणवंत विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करण्यासाठी श्री घृष्णेश्वर विद्यालयाच्या वतीने गुणवंत सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य संजय वरकड होते. प्रमुख पाहुण्या म्हणून श्रीमती ललिता मेवाळ, उच्च माध्यमिक विभागाचे पर्यवेक्षक परमेश्वर हजारे तसेच माध्यमिक विभागाचे पर्यवेक्षक विनोद नागपुरे रवींद्र सावजी यांची उपस्थिती होती.

यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचे पालक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा शाल, पुष्पहार व सत्कारचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे कौतुक करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी शिक्षण आणि क्रीडा क्षेत्रात मिळवलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. योग्य मार्गदर्शन, सातत्यपूर्ण अभ्यास आणि कठोर परिश्रम यांच्या जोरावर ग्रामीण विद्यार्थीही राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवू शकतात, असा संदेश या विद्यार्थ्यांच्या यशातून मिळाला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आयोजन विजयानंद गायकवाड यांनी केले, तर आभार प्रदर्शन विनोद नागपुरे यांनी मानले. कार्यक्रमानंतर गुणवंत विद्यार्थ्यांची खुलताबाद शहरातून उत्साहपूर्ण फेरी काढण्यात आली. या फेरीत नागरिकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांचे अभिनंदन केले.

विवेकानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अक्षय शिसोदे पाटील, उपाध्यक्ष आदरणीय अमर शिसोदे पाटील, सचिव आदरणीय यशोद शिसोदे पाटील, सहसचिव आदरणीय श्रीमंतराव शिसोदे पाटील, कोषाध्यक्ष आदरणीय तुषार शिसोदे पाटील तसेच प्रशासकीय अधिकारी प्रभाकरराव मोरे पाटील यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश म्हणजे मेहनत, चिकाटी आणि योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर मोठी स्वप्ने साकार करण्याची प्रेरणादायी कहाणी ठरली आहे. याप्रसंगी संपूर्ण शिक्षक शिक्षक कर्मचारी उपस्थित होते

**जाहीर प्रगटन**

**जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र.2026/भुसुधार/सिलींग/मौ, पेंढापुर /रूपांतर/ सीआर-57/2026 दिनांक 03/09/2026

सर्व जनतेस जाहिररीत्या कळविण्यात येते की, श्रीमती कांताबाई काशिनाथ पंडीत, श्री भाऊसाहेव काशिनाश पंडीत, श्रीमती रंजना बाळु पंडीत, श्री रोहित बाळु पंडीत (मयत मार्फत वारसदार रंजना बाळु पंडीत), कु अंजली बाळु पंडीत, कु अनिकेत बाळु पंडीत (अल्पवयीन नै. पालक आई रंजना बाळु पंडीत) रा. सर्व पेंढापुर ता. गंगापुर न. छत्रपती संभाजीनगर येथील गट नं. 52 मधील त्यांचे मालकीची जमीन क्षेत्र 1 हे 75 आर शेत जमीन महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा- सिलींग) अधिनियम, 1961 अन्वये निर्बंधित सत्ताप्रकार भोगवटादार वर्ग 2 ची जमीन महाराष्ट्र शासन अधिसूचना दिनांक 04 में 2026 अन्वये केलेल्या सुधारणेतील तरतुदीनुसार भोगवटादार वर्ग-1 मध्ये रूपांतर करणे बाबत दिनांक 21/07/2026 रोजी अर्ज सादर केलेला आहे.

तेव्हा सदरची महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा- सिलीग) अधिनियम, 1961 अन्वये निबंधीत सत्ताप्रकार भोगवटादार वर्ग-2 ची जमीन महाराष्ट्र शासन अधिसूचना दिनांक 04 मे 2026 अन्वये केलेल्या सुधारणेतील तरतुदीनुसार भोगवटादार वर्ग-1 मध्ये रूपांतर करण्यास कोणाचा काही आक्षेप / उजर / तक्रार इत्यादी असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून 15 दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह आक्षेप अर्ज सादर करावा.

विहीत मुदतीत कुणाचा आक्षेप / उजर / तक्रार इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरचे हस्तांतरणाच्या व्यवहारास कुणाचाही आक्षेप नाही, असे समजण्यात येवून सदर प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच सदर प्रकरणात विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप / उजर / तक्रार इत्यादी विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

संगीता राठोड
उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन)
छत्रपती संभाजीनगर

**जाहीर प्रगटन**

**मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब न्यायालय वैजापूर ता. वैजापूर जि. छ. संभाजीनगर**

क्रि.एम.ए.नं. २८८/२०२६

अर्जदार - अर्चना पि. अरुण शिंदे, (लग्नानंतरचे नाव अर्चना भ्र. महेश गुडदे) वय ३५ वर्षे, धंदा व्यवसाय रा. लक्ष्मी कॉलनी, गंगापूर, ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार - ग्रामसेवक, ग्रामपंचायत एकोडीसागज, ता. वैजापूर जि. छत्रपती संभाजीनगर

प्रकरण - जन्म-मृत्यू अधिनियम १९६९ च्या कलम १३(३) प्रमाणे.

ज्याअर्थी, अर्जदाराने या न्यायालयात त्यांचे विधिज्ञ एम.बी. गुडदे यांच्या मार्फत अर्ज सादर केला व सदर अर्जामध्ये नमुद केले आहे की, अर्जदार यांचा जन्म मौजे एकोडी सागज ता. वैजापूर जि. छत्रपती संभाजीनगर येथे वडील नामे अरुण त्रिंबक शिंदे व आई नामे सौ. आशाबाई अरुण शिंदे यांच्या राहत्या घरी रात्री दि.०३/०५/१९९१ रोजी झालेला आहे. परंतू अर्जदार यांचे आई-वडील यांच्या कायदयाच्या अज्ञानामुळे अर्जदाराच्या या जन्माची नोंद गैरअर्जदाराच्या कार्यालयात नोंदविण्यात आलेली नाही. परंतू आता अर्जदार हीस जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता असून तीच्या जन्माची नोंद गैरअर्जदाराच्या कार्यालयात उपलब्ध नाही. म्हणून अर्जदाराने तीच्या जन्माची नोंद गैरअर्जदाराचे कार्यालयात घेणेबाबत आदेश मिळणे कामी या मा. न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदाराच्या प्रस्तूत अर्जास व त्यातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधिज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतर दाखल झालेला आक्षेप-उजर विचारात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदाराच्या हक्कात त्यांनी मागणी केल्या प्रमाणे योग्य ते कायदेशीर आदेश पारित करतील.

करीता हे प्रगटन माझे सही व शिक्यानी आज दिनांक २१/०९/२०२६ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक. सहाय्यक अधिक्षक
न्यायालय वैजापूर

**मा. दिवाणी न्यायाधीश, क- स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

दिवाणी कि. अर्ज क्र. ३२९/२०२५ नि.

अर्जदारः-१) कमलबाई मोतीराम घनघाव वय-७२वर्ष धंदा- घरकाम २) लता राजेंद्र घनघाव वय-४०वर्ष धंदा घरकाम ३) गायत्री राजेंद्र घनघाव वय-२० वर्ष धंदा-शिक्षण ४) पवन राजेंद्र घनघाव वय-१८वर्ष धंदा-शिक्षण वरील १ ते ४ रा.जरंडी, ता. सोयगाव जि. छ. संभाजीनगर ५) प्राजक्ता विजय पाटील वय-२४ वर्ष धंदा-घरकाम रा.सामरोद ता. जामनेर, जि. जळगाव ६) वैष्णवी ज्ञानेश्वर ढमाले वय-२२-वर्ष धंदा-घरकाम रा.कवली, ता. सोयगाव जि.छ.संभाजीनगर

-: विरुध्द :-

गैरअर्जदार :- कोणीही नाही

प्रकरण:- वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड.एस.पी. सुर्यवंशी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र.१ चा मुलगा व अर्जदार क्र. २ यांचे पती व अर्जदार क्र. ३ ते ६ यांचे वडील कै. राजेंद्र मोतीराम घनघाव (पाटील) यांचा दिनांक-०६/०२/२०२५ रोजी मौजे जरंडी ता. सोयगाव, जि.छ. संभाजीनगर येथे राहत्या घरी मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ६ हे वारस आहेत असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ ते ६ हे कै. राजेंद्र मोतीराम घनघाव (पाटील) यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ ते ६ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ ते ६ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख ६/११/२०२६ आज दि. २३/९/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक सहा. अधीक्षक
दिवाणी न्यायालय क स्तर सोयगांव

## अग्रलेख

# ‘स्वायत्तते’ची सत्त्वपरीक्षा!

सातत्याने सभोवती भिरभिरणारे संशयाचे भोवरे, आरोपांची राळ, प्रश्नचिन्हांचा गराडा आणि पारदर्शकपणावर उमटणारे शंकेचे सावट यांच्या गर्तेत सापडलेल्या केंद्रीय निवडणूक आयोगाच्या सत्त्वपरीक्षेचा काळ आता सुरू झाला आहे. केवळ राजकीय टीकेचे प्रहार झेलणाऱ्या आणि त्यातून पसरलेल्या संभ्रमातून बाहेर पडण्याची कसरत करणाऱ्या निवडणूक आयोगात सारे काही आलबेल नाही, या शंकेला वास्तवाचा आधार दिसू लागल्याने, आयोगाच्या घटनात्मक जबाबदारीलाच आव्हान दिले गेले आहे. निवडणूक आयोगाभोवतीचे वादाचे वलय म्हणजे केवळ सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील राजकीय संघर्ष राहिलेला नाही. आता आयोगास जनतेसमोर जाऊन आपले निर्दोषत्व सिद्ध करावे लागणार आहे. लोकशाही व्यवस्थेत निवडणुका ही परिवर्तनाची प्रक्रिया असते, असे मानले जाते. ही प्रक्रिया पारदर्शक असावी, अशी अपेक्षा असते. निवडणूक आयोग हा या खात्रीचा संरक्षक मानला जातो. म्हणूनच निवडणूक आयोगावरचा संशय हा केवळ एखाद्या सरकारी यंत्रणेवरील संशय ठरत नाही, तर लोकशाहीवरील विश्वासाच्या अस्तित्वाचा प्रश्न ठरतो. गेल्या सुमारे १० महिन्यांपासून निवडणूक आयोगाच्या अंतर्गत धुमसत असलेले कथित वादळ आता आयोगाच्या भिंती ओलांडून बाहेर पडल्याने संशयातीत असण्याच्या अपेक्षेची कसोटी पूर्ण करण्याचे आव्हान आयोगासमोर उभे राहिले आहे.

संसदेच्या, राज्याराज्यांतील विधिमंडळांच्या तसेच राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपतींच्या निवडणुकांवर देखरेख ठेवणे, निवडणूक प्रक्रियेस लोकशाहीची ताकद देणारी दिशा देणे व या प्रक्रियेचे नियंत्रण करणे ही निवडणूक आयोगास राज्यघटनेने बहाल केलेली व्यापक जबाबदारी असते. आयोग ही एक स्वायत्त घटनात्मक संस्था आहे आणि या जबाबदारीचे पालन करण्याकरिता आवश्यक असलेल्या बहुसदस्य रचनेतील निर्णयप्रक्रियेत मुख्य आयुक्तांएवढेच समान अधिकार अन्य आयुक्तांसही असतात. मतदार यादी अचूक असणे ही मुक्त आणि निष्पक्ष निवडणुकीची पूर्वअट आहे, याबाबत फारसे दुमत असण्याचे कारण नाही. सर्वोच्च न्यायालयानेही या प्रक्रियेच्या घटनात्मक वैधतेस मान्यता देताना, अचूक आणि विश्वासार्ह मतदार यादीचे महत्त्व अधोरेखित केले आहे. त्यामुळे ही प्रक्रिया असावी किंवा नाही हा राजकीयदृष्ट्या तापलेला मुद्दा महत्त्वाचा नसला, तरी आयोगाकडून सुरू असलेली ही प्रक्रिया किती पारदर्शक आणि विश्वासार्ह आहे, हा प्रश्न मात्र अत्यंत महत्त्वाचा ठरला आहे. राजधानी दिल्लीतील मतदार याद्यांच्या पुनर्रचनेसंदर्भात मतदारांवर बजावल्या गेलेल्या नोटिसांबाबत प्रश्न उपस्थित करताना सर्वोच्च न्यायालयाने यावर केलेली टिप्पणी हे या प्रक्रियेवरील संशयाचे महत्त्वाचे मूळ ठरते. या नोटिसा यांत्रिक पद्धतीने दिल्या गेल्या असाव्यात, असे निरीक्षण नोंदवून न्यायालयाने आयोगाकडून स्पष्टीकरण मागविले, तेव्हा या प्रक्रियेवर अगोदरच उमटलेली प्रश्नचिन्हे गडद झाली. पश्चिम बंगालमध्ये तर हा प्रश्न गुंतागुंतीचा झाला. अर्थात, असे प्रश्न म्हणजे कोणत्या गैरप्रकाराचा पुरावा ठरत नसला, तरी एवढ्या मोठ्या संख्येने नागरिकांच्या मतदानाच्या अधिकाराशी संबंधित असलेल्या प्रक्रियेतील प्रत्येक निर्णयामागची पद्धत स्पष्ट, तपासता येण्याजोगी आणि नागरिकाला समजणारी असणे आवश्यकच असते. आता तर आयोगाच्या अंतर्गत कार्यपद्धतीबाबतही प्रश्न उपस्थित झाला आहे. याच कार्यपद्धतीबाबत निवडणूक आयुक्त सुखबीरसिंह संधू आणि विवेक जोशी यांनी गेल्या १० महिन्यांत आयोगातील काही निर्णयांवर किमान १४ वेळा लेखी आक्षेप नोंदविले आणि आयोगाच्या अंतर्गत कार्यपद्धतीत सारे काही घटनात्मकरीत्या सुरू नसावे या आक्षेपांस संशयाची साथ मिळाली. यासंदर्भातील वृत्तांवर आयोगाने त्याबाबत स्पष्टीकरणात्मक टिप्पणी जारी केली असली, तरी अंतर्गत मतभेदांचा मुद्दा स्पष्टपणे नाकारलेला नाही. घटनात्मक संस्थेतील अंतर्गत मतभेद लोकशाहीत अमान्य करण्याचे कारण नाही; उलट मतभिन्नता हे संस्थात्मक आरोग्याचे लक्षण असू शकते. परंतु मतभेद कोणत्या प्रक्रियेत मांडले गेले, त्यांची दखल कशी घेतली गेली आणि अंतिम निर्णय कोणत्या कारणांवर आधारित होता, हेदेखील उघड होणे आता गरजेचे आहे. केवळ कायदेशीर अधिकाराहूनही, नैतिक विश्वासार्हता ही निवडणूक आयोगाची खरी ताकद आहे. याच संदर्भात निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीचा प्रश्नही महत्त्वाचा ठरत आहे. निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीबाबतच्या कायद्यास आव्हान देणाऱ्या याचिकांवर सध्या सुनावणी सुरू आहे. ही प्रक्रिया किती विश्वासार्ह आहे, हा मुद्दाही यामुळे ऐरणीवर आला आहे.

लोकशाहीतील संस्थात्मक स्वायत्ततेची एक गंमत असते. ती कायद्यात लिहिता येते; पण त्याविषयीचा विश्वास कायद्याने किंवा सरकारी आदेशाने निर्माण करता येत नाही. न्यायालयाला किंवा निवडणूक आयोगाला स्वायत्त म्हटल्याने त्यावरील विश्वास निर्माण होत नाही. त्या संस्थेच्या प्रत्येक कृतीतून स्वायत्तता जाणवली पाहिजे. नव्या मतदारयाद्या शुद्ध, अचूक आणि अद्ययावत असतील याची हमी देणे, या प्रक्रियेत कोणत्याही पात्र मतदारांवर अन्याय होणार नाही याविषयी जनतेच्या मनात विश्वास रुजविणे ही आव्हाने आयोगास पेलावी लागतील. त्या प्रक्रियेत एखाद्या पात्र नागरिकाचे नाव चुकून वगळले गेले तर त्याचा परिणाम केवळ एका डेटाबेसमधील चुकीपुरता राहत नाही. तो नागरिकाच्या घटनात्मक अधिकाराशी संबंधित प्रश्न बनतो.

निवडणूक आयोगावर राजकीय पक्षांकडून आरोप होणे नवीन नाही. राजकारणात असे आरोप वारंवार होत असतात. तरीही प्रत्येक आरोप खरा आहे असे मानणे किंवा प्रत्येक आरोपांचा राजकीय कट म्हणून खिल्ली उडविणे या दोनही बाबी अयोग्य आहेत. त्यामुळेच आरोपांची सत्यता तपासण्याची प्रक्रिया पारदर्शक असणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रत्येक निर्णयाबाबतचे पारदर्शक स्पष्टीकरणही आयोगाकडे असावयास हवे. तसे नसेल तर संशय, संभ्रम आणि प्रश्न अधिक गडद होण्यास वाव राहतो आणि अशा संशय किंवा संभ्रमाची किंमतही तितकीच मोठी असते. कारण निर्णयावरील विश्वास हीच या यंत्रणेची खरी ताकद असते. आयोगाने जाहीर केलेले निवडणुकीचे निकाल मान्य करण्यासाठी आवश्यक असलेला हाच विश्वास अलिकडे पणाला लागलेला दिसतो. राजकीय पक्षांनी असे निकाल मान्य करणे किंवा आपल्या मताचा योग्य आदर झाल्याची मतदाराची निःशंक खात्री असणे हेच या विश्वासाचे मूळ असताना, आयोगांतर्गत मतभेदांमुळे त्या मुळावरच घाव घातल्याची भावना वाढीस लागण्याची भीती आहे. कोणतीही घटनात्मक संस्था प्रत्येक राजकीय आरोपाला उत्तर देत राहिली किंवा टीकेवर प्रतिक्रिया व्यक्त करू लागली, तर तिची प्रतिष्ठा कमी होईल. परंतु प्रक्रियेविषयी तथ्यात्मक प्रश्न उपस्थित झाले असतील तर त्यांची तथ्यात्मक उत्तरे देणे ही अशा संस्थेची ताकद असते. त्यामुळे मतदारांच्या मनातील किंवा राजकीय पक्षांनी उपस्थित केलेल्या प्रत्येक प्रक्रियात्मक कार्यशैलीला योग्य कृतीने सामान्यांना पटेल असे उत्तर देणे ही आयोगाच्या विश्वासार्हतेची कसोटी ठरणार आहे. व्यवस्था आणि यंत्रणांवरील विश्वास हा लोकशाहीचा पाया असतो. त्याला तडा गेला तर लोकशाहीच्या नैतिकतेवर प्रश्नचिन्हे उमटू शकतात. म्हणूनच आज आयोगाला दोषी ठरविण्यापेक्षा किंवा निर्दोषत्वाचा दाखला देण्यापेक्षा, आयोगाकडून विश्वासार्हतेची हमी मिळविणे अधिक गरजेचे आहे. जनतेचा विश्वास ही निवडणूक आयोगाची सर्वांत मोठी ताकद आहे. तीच कमकुवत झाली, तर ती पुन्हा मिळवण्यासाठी केवळ स्पष्टीकरणे पुरेशी ठरणार नाहीत. ■

## निमित्त

**प्रकाश देशपांडे**

# एक स्वर ‘वंदे मातरम्’चा

‘वंदे मातरम्’चा जन्म १८७५ ला झाला. म्हणजेच बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी हे गीत लिहून १५० वर्षे झाली आहेत. त्यानिमित्त विद्या भारतीने संपूर्ण भारतात ‘नमामि भारतम्’ कार्यक्रमाचे आयोजन केले असून, दि. २५ सप्टेंबर रोजी विद्या भारती संबंधित तसेच अन्य शैक्षणिक संस्थांचे विद्यार्थी सामूहिकरीत्या एका लयीत, एका स्वरात आणि एकाच वेळी वंदे ‘मातरम्’चे गायन करणार आहेत. भारत मातेप्रति निष्ठा आणि तिच्या भक्तीचे जागरण करून देणारा हा विद्या भारतीचा उपक्रम प्रशंसनीय असा आहे. विद्या भारतीच्या जवळपास २४,००० शाळांमधील विद्यार्थी अंदाजे ३०,००० ठिकाणांहून गायन करतील आणि कोट्यवधी लोक यात सहभागी होतील.

**नमामि भारतम्**

संपूर्ण वंदे मातरम् सामूहिक म्हणणे तसे कठीण आहे. निरनिराळ्या कार्यक्रमांतून एकटा गायक किंवा गायिका ते गाते. ते श्रवणीय ठरते. श्रोते श्रवण करतात, परंतु हा समूह त्या गायनात सहभागी होऊ शकत नाही. कारण एकल गायक मुक्त गात असल्यामुळे समूहात शब्द मागे पुढे होण्याची शक्यता अधिक असते. तसेच पहिल्या कडव्यानंतरची कडवी फारशी प्रचलित नसल्यामुळे, ती समूहास म्हणता येत नाहीत. म्हणूनच सामूहिकरीत्या गायनाचे महत्त्व लक्षात घेता विद्या भारतीचा हा उपक्रम अभिनंदनीय आहे.

यापूर्वीही असे सामूहिक गायनाचे कार्यक्रम झाले आहेत. ‘वंदे मातरम्’च्या शतकोत्तर रोप्य महोत्सवाच्या सांगता समारंभाच्या निमित्ताने १५ डिसेंबर २००० रोजी पुण्यातील नेहरू स्टेडियम येथे मराठी व अन्य माध्यमांच्या ६५ शाळांतील ११००० विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे ‘वंदे मातरम्’चे




गायन केले होते. पुण्यातील तत्कालीन संगीत शिक्षक अजय पराड यांनी बॅण्डच्या ठोक्यावर गाता येईल अशी भैरवीतील संगीत रचना तयार केली होती. समूह गायनाच्या क्षेत्रातील हा एक विक्रम होता.

२००६ मध्ये तत्कालीन केंद्रीय मनुष्य विकास मंत्री अर्जुन सिंग यांनी ७ सप्टेंबर हा ‘वंदे मातरम्’चा जन्मदिन म्हणून साजरा करावा असा आदेश काढला होता. नागपूरची मैत्री परिवार ही संस्था त्यानिमित्ताने दरवर्षी वंदे मातरम् समूह गायनाचा कार्यक्रम आयोजित करीत आली आहे. ७ सप्टेंबर २००९ रोजी नागपूर शहरातील ११ प्रमुख चौकांत, एकाच वेळी १२५ शाळांतील ४६,००० विद्यार्थ्यांनी संपूर्ण ‘वंदे मातरम्’चे गायन केले होते. प्रा. संजय भेंडे, चंदू पेंडके, प्रमोद पेंडके या मंडळींनी या कार्यक्रम आयोजनात पुढाकार घेतला होता. संगीत शिक्षक श्याम देशपांडे यांनी संगीत दिग्दर्शन केले होते. तसाच कार्यक्रम पुन्हा ७ सप्टेंबर २०१० व २०११ रोजी नागपूरच्या यशवंत स्टेडियमवर झाला होता. यावेळी ४० हजार विद्यार्थ्यांनी एकाच वेळी संपूर्ण ‘वंदे मातरम्’चे गायन केले होते. नागपूरकरांनी या कार्यक्रमास भरभरून प्रतिसाद दिला होता.

नागपूर येथील राष्ट्र निर्माण समिती दरवर्षी १४ ऑगस्टला अखंड भारत दिनाच्या दिवशी सामूहिक वंदे मातरम् गायनाचा कार्यक्रम स्थानिक सक्करदरा चौकात घेत असते. या भागातील शाळांचे जवळपास ३००० विद्यार्थी समूह गायनात सहभागी होत असतात.

त्याचप्रमाणे विदर्भातील अन्य काही संस्थांनी ‘वंदे मातरम्’चे गायन आयोजित केले होते. यामध्ये अकोला येथे ७ जानेवारी २०१२ रोजी ३० शाळांमधील ६००० विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे वंदे मातरम्चे गायन केले होते. हा कार्यक्रम अकोल्यातील अक्षय सार्वजनिक वाचनालय आणि अभ्यासिका यांनी आयोजित केला होता. अमरावती येथील हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ संस्था, जी क्रीडा अध्यापनासाठी प्रसिद्ध आहे, तेथे विजयादशमीच्या दिवशी दरवर्षी होणाऱ्या क्रीडा प्रात्यक्षिकांच्या कार्यक्रमात संस्थेचे विद्यार्थी बहुसंख्येने वंदे मातरमचे सामूहिक गायन करीत असतात.

राष्ट्र सेविका समितीच्या सेविकांचे तीन दिवसाचे शिबिर मार्च २०१० मध्ये पुण्यात भरले होते. या कार्यक्रमाच्या समारोपाला उपस्थित २५०० महिलांनी संघाच्या पद्धतीने देस रागातील संपूर्ण ‘वंदे मातरम्’चे एकत्रित गायन केले होते. ही रचना समूह गायनास कठीण होती. न्यू इंग्लिश स्कूल रमण बागच्या मैदानावर शब्दांमध्ये मागेपुढे न होता तसेच तालवाद्यांची साथ नसतानाही एरवी एकल पद्धतीने गायिले जाणारे ‘वंदे मातरम्’ सुरेल स्वरात गायिले गेले होते.

संपूर्ण वंदे मातरम् शब्दांच्या दृष्टीने व तालाच्या दृष्टीने गायला कठीण असले तरीही चांगले प्रयत्न केल्यास ते उत्तम समूह स्वरात बसविणे शक्य होऊ शकते, ते उत्तम प्रकारे गायिले जाऊ शकते, हे सिद्ध झाले आहे. ■

नागपूर/९३७१४२८१६८

## वेध

**प्रफुल्ल व्यास**

# विघ्नहर्त्या, विघ्नांची मालिका थांबव रे आता!

गणराया, तू आज भक्तांचा निरोप घेणार आहेस. बाप्पा, तू यावर्षी १२ दिवस मुक्कामी होतास. दोन दिवसांचा बोनस दिला. तू मुक्कामी असल्यानं वातावरण भारावून गेले होतं. आज सायंकाळनंतर गर्दी ओसरेल, मंडप रिकामे होतील, सजावटी उतरतील! उत्सव संपेल आणि आमची पुन्हा रोजची आयुष्यासोबतची लढाई सुरू होईल. बाप्पा, यावर्षी खरं तर तुझ्या आगमनाची नांदीच ‘डीजे’च्या चर्चेने झाली. आवाज किती असावापासून सुरू झालेली ही चर्चा गुलाल आणि पुढे आता शेवटच्या टप्प्यात फटाक्यावर पोहोचली. होय, बाप्पा, अति झाली की कुठेतरी माती होतेच! तो तर तूच आखून दिलेल्या सृष्टीचा नियम आहे. आम्ही सर्वच नियम तोडून टाकले होते. कदाचित तुलाही त्याचा त्रास होत होता. तू नेहमीप्रमाणे संधी दिली असेल. पण, आम्हालाच अक्कल उशिरा आली असेच म्हणावे लागेल. डीजेचा आवाज कमी करण्यासाठी कायद्याचा आधार घ्यावा लागला. बाप्पा, डीजे हा विषय आता आला. तसा आम्हीच मर्यादेत असतो तर आलाही नसता. पण, डीजेशिवाय अशा अनेक समस्या समाजात आहेत त्याकडेही तू लक्ष घालण्याची गरज आहे. शेतकरी आत्महत्या हा विषय फार गंभीर आहे, उत्पादित मालाला भाव नाही हा त्याहीपेक्षा गंभीर विषय आहे. बाप्पा, आम्ही जसजसे पुढे जाऊ न तसतसे अजून भयंकर डोळ्यांपुढे येईल. बेरोजगारी, महागाई, शिक्षण, वृद्ध आई-वडिलांना वृद्धाश्रमात टाकणे, अंधश्रद्धा, राजकारणात टोकाचे आरोप, आर्थिक विवंचना, व्यसनाधिनता, समाजात नव्याने तयार होत असलेल्या दरीने मुलामुलींचे विवाह, बलात्कार, एखाद्या आंबटशौकिनालाही लाज वाटेल अशी फॅशन... बाप्पा, अरे खूप मोठी यादी आहे समस्यांची! आता तर पेपरफूट ही एक नवीनच समस्या! तरी बघ, आज त्या पेपर फोडणाऱ्या मोटेगावकराच्या मुलावर दोन वर्षांची बंदीचा निर्णय घेतला. असा धाक निर्माण करण्याची विवेकबुद्धी तू दिली हे जरा बरेच झाले! पण, समस्यांची यादी न संपणारीच म्हणावी लागले. सत्ताधारी आपली कामं करीत आहेत. विरोधक त्यांचे विरोध करण्याचे काम करीत आहेत. पण, या सर्वांमध्ये काही झाँरीतील शुक्राचार्य आहेत ते म्हणजे प्रत्यक्षात प्रशासनात काम करणारे अधिकारी-कर्मचारी! विघ्नराजेंद्र प्रशासन एक वेगळीच समस्या आहे बरं! प्रशासनातील प्रत्येकाने आपल्या वेळेत आणि नियोजित कामं केली तर अनेक समस्या सुटलेल्या असतील. पण, समस्या सुटूच नयेत, असे प्रशासनातील काहींना वाटते आणि सारा समाज मग वेठीस धरला जातो. त्यांनाही तू बुद्धी दे विनायका! अरे, लंबोधरा आम्ही डीजेच्या निमित्ताने बाहेरचा आवाज मोजायला शिकलो. पण, मनातल्या गोंधळाचे उत्तरच शोधले नाही. गणेशा, तू बुद्धीचा देव आहेस. विघ्नहर्ता म्हणून तुझी पूजा करतो. बाप्पा, आज विघ्नांची यादी वाढतच जात आहे. स्वतःला सिद्ध करण्याच्या नादात अनेक गोष्टी आम्हीच ओढवून घेतल्या. त्याला तू तरी काय करशील म्हणा! पण, शेवटी आमची भिस्त तर तुझ्यावरच आहे. आम्ही मातीच्या गणेशाचे विसर्जन करणार आहोत. तू तर चराचरात आहेत. तुला सर्व ठाऊकही आहे. पण, बाप्पा, आता अंत पाहू नको... देवा गणनायका नैसर्गिक संकटाला आम्ही कारणीभूत आहोत, हे आम्ही समजून गेलो आहोत. पण, देवा गणेशा समजूनही तुलाच तर घ्यायचे आहे ना! ‘अपराध आमचे कोट्यानू कोटी’ क्षमा कर! बघ यावर्षी तू मुक्कामाला असतानाही पावसाने पाठ फिरवली. यावर्षीचे जल संकट कसे तरी निघून जाईल. बाप्पा! पुढच्या वर्षी तुझी मूर्ती साकारण्यासाठी कुंभारालाही पाणी मिळाले नाही तर कसे होईल? दया कर बाप्पा! शेतकरी राब राब राबतो. उन्हाळ्यात त्याने घामाचे ‘अत्तर’ करून पावसाळ्यात त्याचा दरवळ होण्याचे स्वप्न पाहिले तर अगदी अर्धा महाराष्ट्रच कोरड्या दुष्काळाच्या छायेत गेला. सांग कशी पिकवावी शेती? कशीतरी पिकवली तर उत्पादित मालाला भाव नसतो आणि शेतकऱ्याच्या घरचा माल संपला की बाजारात तेजी येते. बाप्पा, आम्ही अन्न पिकवणाऱ्याला राजा म्हणतो! पण, त्यालाही लाचारीचे जीवन जगावे लागत आहे. ‘गजवक्रा’ तूही म्हणशील, १२ दिवस आराधना करताना प्रत्येक भक्त काही ना काही मागत होता आणि जाता जाताही समाजावर येत असलेले विघ्न निवारण्याची मोठी यादीच सादर केली. बाप्पा, डोळ्यात पाणी आणून आम्ही तुला निरोप देतो आहे. शेतकऱ्यांच्या आसवांचे रूपांतर बरसणाऱ्या पावसात होऊ दे! विघ्नहर्ता श्री गणेशा पुढच्या वर्षी लवकर येण्याचा आग्रह आम्ही केलाच आहे. लवकर ये... येताना ही समस्यांची यादी तुझ्या त्या वाहनाला म्हणजे मूषकाला जरा कुरतडायला लाव... आम्ही आनंदात असलो की, तुझे स्वागतही तेवढ्याच आनंदात करतो बरं का... ■

९८८१९०३७६५

## अर्थविशेष

**ॲड. हितेश पारसे**

# कर नियोजन वर्षाच्या सुरुवातीपासूनच

(उत्तरार्ध)

**७. आगाऊ कराचा अंदाज तिमाही पद्धतीने घ्या**

व्यावसायिक, डॉक्टर, वकील, सल्लागार, व्यापारी, बांधकाम व्यावसायिक, गुंतवणूकदार आणि मोठ्या प्रमाणावर भांडवली नफा मिळविणाऱ्या व्यक्तींनी आगाऊ कराकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. अनेकदा करदात्याला वर्षाच्या शेवटी मोठी करदेयता समोर येते. ही परिस्थिती टाळण्यासाठी प्रत्येक तिमाहीत स्वतःला काही प्रश्न विचारावेत –

आतापर्यंत माझे उत्पन्न किती झाले? वर्षाच्या अखेरीस अपेक्षित उत्पन्न किती आहे? मला भांडवली नफा झाला आहे का? माझ्याकडून किती करकपात झाली आहे? आणखी किती आगाऊ कर भरावा लागेल? यामुळे वर्षाच्या शेवटी अचानक मोठी रक्कम कर म्हणून भरण्याची वेळ येण्याची शक्यता कमी करता येते.

**८. ‘कर दिनदर्शिका’ तयार करावी :** व्यावसायिकांसाठी कराच्या विविध तारखा लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी वर्षाच्या सुरुवातीलाच कर दिनदर्शिका तयार करावी. त्यामध्ये –करकपात, करसंकलन, वस्तू व सेवा कर, आगाऊ कर, लेखापरीक्षण, आयकर विवरणपत्र, व्यावसायिक कर, कंपनी कायद्याशी संबंधित अनुपालन, लागू असल्यास, इतर वैधानिक देय तारखा यांचा समावेश करता येईल. कर अनुपालन हे वर्षअखेरीस करण्याचे काम न राहता महिन्याला किंवा तिमाहीला करण्याची सवय लावणे आवश्यक आहे.

**९. जुना कायदा आणि नवीन कायदा यांच्यातील संक्रमण समजून घ्या :** नवीन आयकर कायदा लागू झाला म्हणजे जुन्या कायद्यानुसार सुरू असलेली सर्व प्रकरणे संपली, असे नाही. १ एप्रिल २०२६ पूर्वीच्या कालावधीशी संबंधित काही मूल्यांकन, अपील, दुरुस्ती किंवा इतर कार्यवाही संक्रमणकालीन तरतुदींनुसार जुन्या कायद्याखाली सुरू राहू शकते. म्हणून एखाद्या करदात्याच्या बाबतीत एकाच वेळी दोन वेगवेगळ्या कायदेशीर चौकटी लागू असू शकतात - जुन्या कालावधीसाठी आयकर अधिनियम, १९६१ आणि नवीन कालावधीसाठी आयकर अधिनियम, २०२५. त्यामुळे जुनी प्रलंबित प्रकरणे, आयकर विभागाच्या सूचना, अपील किंवा इतर कार्यवाही याकडे दुर्लक्ष करणे योग्य नाही.

**१०. मोठ्या आर्थिक व्यवहारांची नोंद स्वतःहून ठेवा :** आज करव्यवस्था मोठ्या प्रमाणावर माहितीवर आधारित होत आहे. त्यामुळे करदात्याने मोठ्या व्यवहारांची स्वतःहून नोंद ठेवणे आवश्यक आहे.

उदाहरणार्थ - मोठ्या रकमेची बँक जमा, मालमत्ता खरेदी, मालमत्ता विक्री, समभागांची मोठ्या प्रमाणावर खरेदी-विक्री, सामूहिक गुंतवणूक योजनांमधील व्यवहार, मोठ्या रकमेची कर्जे, कुटुंबातील मोठ्या रकमांचे हस्तांतरण, परदेशात पैसे पाठविणे, मोठ्या प्रमाणावर रोख किंवा बँक व्यवहार. अशा व्यवहारांसाठी संबंधित कागदपत्रे आणि पैशांच्या स्रोताची स्पष्ट नोंद ठेवणे भविष्यात अत्यंत उपयोगी ठरते.

**११. ‘व्यवहार करण्यापूर्वी कराचा विचार’ ही नवी सवय लावा :** आपल्या देशात अनेकदा व्यवहार आधी केला जातो आणि कराचा प्रश्न नंतर विचारला जातो. उदाहरणार्थ, एखादी व्यक्ती मालमत्ता विकते आणि त्यानंतर भांडवली नफ्यावरील कर किती येईल हे विचारते. एखादा व्यावसायिक मोठी गुंतवणूक करतो आणि त्यानंतर तिचा करपरिणाम समजून घेतो. एखाद्या कुटुंबात मालमत्तेचे हस्तांतरण केले जाते आणि त्यानंतर त्यावरील कराचा विचार केला जातो. ही पद्धत बदलणे आवश्यक आहे.

व्यवहारापूर्वी तीन प्रश्न विचारावेत –

१. या व्यवहाराचा कर परिणाम काय आहे? २. कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत? ३. व्यवहाराची रचना कायदेशीर आणि करदृष्ट्या योग्य आहे का? या तीन प्रश्नांची उत्तरे मिळाल्यानंतर व्यवहार करणे अधिक सुरक्षित ठरते.

**१२. कर नियोजन आणि करचुकवेगिरी यातील फरक समजून घ्या :** करनियोजन म्हणजे कायद्याने उपलब्ध असलेल्या सवलती, वजावटी, गुंतवणुकीचे पर्याय आणि योग्य आर्थिक नियोजनाचा वापर करून कराची योग्य रचना करणे. मात्र उत्पन्न लपविणे, खोटे खर्च दाखविणे, बनावट कागदपत्रे तयार करणे किंवा चुकीची माहिती देणे ही करनियोजनाची साधने नाहीत. कायदेशीर करनियोजन म्हणजे करकायदा समजून घेऊन त्यानुसार आर्थिक निर्णय घेणे. नवीन करव्यवस्थेत पारदर्शकता, माहितीची देवाणघेवाण आणि डिजिटल तपासणी वाढत असल्याने चुकीची माहिती देण्याचा धोका अधिक गंभीर होऊ शकतो.

**१३. करसल्लागाराची भूमिकाही बदलत आहे :** पूर्वी करसल्लागाराकडे प्रामुख्याने आयकर विवरणपत्र भरणे, कराची गणना करणे किंवा आयकर विभागाच्या नोटिशीला उत्तर देण्यासाठी संपर्क केला जात असे. मात्र आज करसल्लागाराची भूमिका अधिक व्यापक झाली आहे. करसल्लागाराने करदात्याला केवळ “किती कर भरायचा?” हे सांगण्याऐवजी, “व्यवहार कसा करावा?” “गुंतवणूक कशी करावी?” “मालमत्ता हस्तांतरणाचा करपरिणाम काय?” “भांडवली नफ्याचे नियोजन कसे करावे?” “कर अनुपालन कसे व्यवस्थित ठेवावे?” याबाबत मार्गदर्शन करणे आवश्यक होत आहे. म्हणूनच भविष्यात करसल्ला हा केवळ विवरणपत्र भरण्यापुरता मर्यादित न राहता आर्थिक निर्णयप्रक्रियेचा एक महत्त्वाचा भाग बनणार आहे.

**१४. २०२६-२७ पासून प्रत्येक करदात्याने कोणत्या दहा सवयी लावून घ्याव्यात?**

१. वर्षाच्या सुरुवातीलाच करनियोजन करा.
२. वार्षिक माहिती विवरण आणि करदात्याचा माहिती सारांश तपासा.
३. मोठ्या आर्थिक व्यवहारांची स्वतंत्र नोंद ठेवा.
४. मालमत्ता खरेदी-विक्रीपूर्वी करपरिणाम तपासा.
५. करकपात आणि करसंकलनाची नियमित जुळवणी करा.
६. आगाऊ कराचा अंदाज तिमाही पद्धतीने घ्या.
७. आयकर विभागाच्या संकेतस्थळावरील सूचना नियमित तपासा.
८. जुन्या प्रलंबित करप्रकरणांकडे दुर्लक्ष करू नका.
९. लेखा व वेतन प्रणाली नवीन कायद्यानुसार अद्ययावत करा.
१०. कर अनुपालन हे वर्षभराचे काम समजा.

**निष्कर्ष :** आयकर अधिनियम, २०२५ हा केवळ कायद्यातील बदल नाही; तर करदात्याच्या आर्थिक शिस्तीमध्ये बदल करण्याची एक संधी आहे. गेल्या अनेक दशकांमध्ये भारतीय करव्यवस्था मोठ्या प्रमाणावर बदलली आहे. कागदी नोंदींपासून डिजिटल विवरणपत्रापर्यंत, प्रत्यक्ष कार्यालयीन प्रक्रियेपासून ऑनलाईन आणि माहितीआधारित प्रक्रियेपर्यंत करव्यवस्थेचा प्रवास झाला आहे. आता करदात्याची जबाबदारीही बदलत आहे. पूर्वी वर्षातून एकदा विवरणपत्र भरून कराचे काम पूर्ण झाल्याची भावना असायची. आता मात्र उत्पन्न, गुंतवणूक, मालमत्ता, बँक व्यवहार, करकपात आणि इतर आर्थिक व्यवहार यांची वर्षभर योग्य नोंद ठेवणे आवश्यक होत आहे. म्हणूनच आर्थिक वर्ष २०२६-२७ पासून प्रत्येक करदात्याने स्वतःला एक साधा प्रश्न विचारायला हवा – “मी फक्त कर भरतो आहे की माझ्या करव्यवहारांचे योग्य नियोजनही करतो आहे?” कारण नवीन करयुगात केवळ किती कर भरला हे महत्त्वाचे राहणार नाही; तर उत्पन्न कसे नोंदविले, व्यवहार कसे केले, कागदपत्रे कशी जतन केली आणि कर अनुपालन किती शिस्तबद्ध ठेवले हे देखील तितकेच महत्त्वाचे ठरणार आहे. कर वाचविण्यापेक्षा कराचे योग्य नियोजन, कर भरण्यापेक्षा कराचे योग्य अनुपालन आणि व्यवहार झाल्यानंतर विचार करण्यापेक्षा व्यवहारापूर्वी करपरिणाम समजून घेणे- हीच आर्थिक वर्ष २०२६-२७ पासूनच्या नव्या करयुगाची खरी गरज आहे. ■

९०९६३३२३५३

(लेखक कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार आहेत.)

### गणेशोत्सव मंडळांचे आभार!

यावर्षी नागपूरमधील शंकरनगर, अभ्यंकरनगर, माधवनगर आदी ठिकाणच्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना भेट देऊन गणपती बाप्पाचे दर्शन घेतले. यावेळी एक गोष्ट विशेषतः मनाला भावली- नव्या पिढीचा उत्सवातील सक्रिय सहभाग. कुठे लहान मुले चप्पल व्यवस्था सांभाळताना दिसली, कुणी पार्किंगची जबाबदारी घेत होते, कुणी प्रसाद वाटत होते तर कुणी भाविकांचे स्वागत करीत होते. उगीच गप्पा मारत उभे न राहता ही मुले जबाबदारीने काम करताना दिसली. हे पाहून मनापासून आनंद झाला. मंडळांचे देखावेही उत्तम असून १२ ज्योतिर्लिंग, दशावतार यांसारख्या विषयांद्वारे मुलांना आपल्या धर्म-संस्कृतीची माहिती दिली जात आहे. मुलांचा सात्त्विक पेहराव, शिस्त आणि उत्साह पाहून पुढील पिढीही संस्कारक्षम आणि जबाबदार घडत आहे, याचे समाधान वाटले. पुढील पिढी सात्त्विक, धर्मनिष्ठ आणि राष्ट्रनिष्ठ घडविण्याची जबाबदारी सार्वजनिक मंडळे निश्चितच उत्तम प्रकारे पार पाडतील, यात शंका नाही. या १२ दिवसांत केवळ दर्शन न घेता, आपल्या कृतीतून गणपती बाप्पाची कृपा कशी संपादन करता येईल, याचा विचार भक्तांनी आणि मंडळांनी करूया. सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचे मनःपूर्वक आभार!

**रेणुका हरदास**/नागपूर

■■■

### महाप्रसादाचा अपव्यय टाळा

सध्या सगळीकडे गणरायाच्या आगमनाने उत्साह आला आहे. एक प्रकारची नवीन ऊर्जा हा उत्सव घेऊन येतो. सार्वजनिक गणेशोत्सवात अनेक लोकांच्या भेटी होतात. काही ठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. आजकाल सगळीकडे एक मोठे आकर्षण असते ते म्हणजे प्रसादाचे. आधी पण ठिकठिकाणी गणपती बसायचे, पण प्रसाद किंवा महाप्रसाद याचे फॅड नव्हते. केवळ हातावर प्रसाद दिला जायचा. आजकाल परिस्थिती बदलली आहे. उत्सवाच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर प्रसादाचे वाटप केले जाते. महाप्रसाद आयोजित केला जातो. थोड्या वेळाने त्याच ठिकाणी कुठे खरकटे, पेपर प्लेट्स, चमचे, ग्लासेस पडलेले आढळून येतात. लग्न, रिसेप्शन, महाप्रसाद या ठिकाणी आपण जातो तेव्हा प्रत्येकाने स्वतः पुरती हेच ठरवावे की, मी अन्नाचा एकही कण पानात टाकणार नाही. मला हवे तेवढेच वाढून घेईन. परंतु चित्र उलटे दिसते. अशा वेळी दुसऱ्या दिवशी बऱ्याच प्लेट्समध्ये अन्न टाकलेले आढळून येते. सर्व संतांनी आपल्याला हीच शिकवण दिली आहे की, अन्न हे पूर्ण ब्रह्म आहे. त्याचा एकही कण वाया जाऊ देऊ नये तेव्हाच खरा गणेश उत्सव साजरा होईल. जेव्हा आपण महाप्रसादाला जातो तेव्हा फार मोठे अन्न लोकांनी पानात टाकलेले दिसून येते. व्यवस्थापक वारंवार याबाबत सूचना करीत असतात. तरीदेखील याकडे दुर्लक्ष करताना दिसतात. ही गोष्ट फक्त महाप्रसाद किंवा कार्यप्रसंगीच अमलात आणावी असे नाही तर रोजच्या दैनंदिन जीवनातही स्वतःपुरती पक्की ठरवावी आणि अन्नाची नासाडी टाळावी.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

■■■

## वाचक पत्रे

### विसर्जन करताना सावधगिरी बाळगा



गणपती स्थापनेच्या दीड दिवसापासून गणपती बाप्पाच्या विसर्जनाला सुरुवात झालेली आहे. त्यामुळे बाप्पाचे विसर्जन करताना सर्वांनीच सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. कारण गणपती विसर्जन करताना नदी, तलाव, विहीर, समुद्र किनारा याठिकाणी कळत-नकळत आपल्या चुकांमुळे दुर्घटना होऊ शकते आणि अशा प्रकारच्या यापूर्वी अनेकदा घडल्या आहेत.

मागील वर्षी राज्यभरात वेगवेगळ्या जिल्ह्यात गणेश विसर्जनाला गालबोट लागले व १५ पेक्षा जास्त जणांचा मृत्यू झाला. त्यामुळे गणेश विसर्जन करताना सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे लहान मुलांना विसर्जन स्थळापासून दूरच ठेवावे. गणेश विसर्जनासाठी तलावांवर बंदी आहेच; परंतु प्रशासनाने जे गणेश विसर्जनाचे ठिकाण दिले आहे किंवा प्रशासनाने बनवलेल्या कृत्रिम तलाव यामध्ये विसर्जन करायला हवे. यदाकदाचित एखादी अकस्मात घटना घडली तर प्रशासन आपल्या मदतीला धावून येऊ शकते. त्यामुळे प्रशासनाचे नियम पाळून सर्वांनी गणेश विसर्जनाचा आनंद घ्यावा व सावधगिरी बाळगावी. जेथे जेथे कृत्रिम तलावांची व्यवस्था केलेली आहे, त्या-त्या ठिकाणी त्याचा उपयोग सर्वांनीच केला पाहिजे. त्याचप्रमाणे निर्माल्य तलाव, विहीर, नदी, समुद्र किनारा यामध्ये न टाकता प्रशासनाने निर्माल्याची व्यवस्था ज्या-ज्या ठिकाणी केली आहे त्या-त्या ठिकाणीच टाकावे. यामुळे प्रदूषणावर आवर घातला येईल व पाणी दूषित होण्यापासून वाचेल. ■

**रमेश लांजेवार**/९९२१६९०७७९

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## पदवीधर मतदार संघ द्विवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २६ सप्टेंबर : भारत निवडणूक आयोग आणि मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशानुसार ०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. निवडणूक कार्यक्रमाच्या वेळापत्रकानुसार २९ सप्टेंबर २०२६ रोजी निवडणुकीची अधिसूचना प्रसिद्ध केली जाणार असून, ६ ऑक्टोबर २०२६ ही उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख असणार आहे. यानंतर ७ ऑक्टोबर २०२६ रोजी प्राप्त उमेदवारी अर्जांची छाननी केली जाईल आणि ९ ऑक्टोबर २०२६ पर्यंत उमेदवारांना आपले अर्ज मागे घेता येतील.

प्रत्यक्ष मतदानाची प्रक्रिया २३ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत पार पडणार असून, २७ ऑक्टोबर २०२६ रोजी मतमोजणी होणार आहे, अशी माहिती लातूरच्या उपविभागीय अधिकारी श्रीमती रोहिणी नऱ्हे-विरोळे आणि तहसीलदार सौदागर तांदळे यांनी दिली आहे.



# विविध वृत्त.....

## २९ सप्टेंबर रोजी भटके विमुक्त हक्क व प्रमाणपत्र अभियान

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २६ सप्टेंबर : राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या ज्या नागरिकांना सर्वसाधारण रहिवास ठिकाण निश्र्चित नसल्याने मूलभूत अधिकार आणि शासकीय योजनांचे लाभ मिळण्यास अडचणी येतात, अशा नागरिकांना मदत करण्यासाठी राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता अभियानांतर्गत भटके विमुक्त हक्क व प्रमाणपत्र अभियान ही विशेष मोहीम राबवली जात आहे. महसूल विभाग आणि इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर तालुक्यात सहा ठिकाणी २९ सप्टेंबर २०२६ रोजी विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

या अभियानांतर्गत नागरिकांना ओळखपत्रे आणि विविध शासकीय दाखले मिळवून देण्यासाठी मदत केली जाणार आहे. लातूर तालुक्यातील शामनगर-चंदनवाले, वैशाली नगर-राजगौंड, महादेव नगर-वैंदु, भोईवस्ती-भोई समाज, वडारवस्ती (खाडगाव रोड-वडार समाज) आणि मुरुड-वेदू समाज या ठिकाणी हे शिबीर पार पडणार आहे. या शिबीर नियोजनासाठी इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे भागवत केंद्रे यांची समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

या शिबिरांमध्ये महसूल विभागामार्फत संकीर्ण विभागाद्वारे जात प्रमाणपत्र, रहिवास दाखला, उत्पन्नाचा दाखला, नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र आणि अधिवास दाखला यांसारखे विविध दाखले वितरीत केले जातील. तसेच पुरवठा विभागामार्फत नवीन रेशन कार्ड काढणे व दुरुस्तीचे अर्ज स्वीकारले जातील, संजय गांधी योजना विभागामार्फत संजय गांधी निराधार योजना आणि श्रावणबाळ अर्थसहाय्य योजनेची माहिती देऊन अर्ज घेतले जातील, तर निवडणूक विभागाकडून मतदान कार्ड काढणे आणि नोंदणीविषयक माहिती व अर्ज स्वीकारले जातील. तरी विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या जास्तीत जास्त नागरिकांनी २९ सप्टेंबर रोजी आयोजित या शिबिरांचा लाभ घ्यावा, असे आवाहन लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे यांनी केले आहे.

## सेवा संकल्प अभियान' महिला शेतकऱ्यांना मिळणार स्वतंत्र प्रमाणपत्र

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.२६ सप्टेंबर : नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा २.० अंतर्गत सन २०२६ हे वर्ष महिला शेतकरी सशक्तीकरण वर्ष म्हणून घोषित करण्यात आले असून या पार्श्र्वभूमीवर 'महिला शेतकरी कायदा - २०२६ ची प्रभावी अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. या अंतर्गत शेती करणाऱ्या महिला, महिला शेतमजूर आणि शेतीपूरक व्यवसाय करणाऱ्या महिलांना 'महिला शेतकरी' म्हणून एक नवीन आणि स्वतंत्र ओळख मिळणार असून तसे अधिकृत प्रमाणपत्र त्यांना प्रदान केले जाणार आहे. हे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर ग्रामीण भागातील महिला अधिक सक्षम बनून आपल्या हक्काच्या शासकीय योजनांचा थेट लाभ सहजपणे घेऊ शकतील.

या अनुषंगाने सेवा संकल्प अभियानांतर्गत ग्रामीण भागात युवक मंडळ, ग्रामपंचायत, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, शिक्षक, उमेद, माविम, महिला बचत गट, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि एनजीओ यांच्या सक्रिय सहकार्यातून विविध जनजागृती उपक्रम आयोजित केले जात आहेत. यामध्ये देखावे, खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम, शालेय प्रभात फेऱ्या आणि विशेष ग्रामसभांच्या माध्यमातून महिला शेतकरी कायद्याविषयी व्यापक जागृती केली जात आहे.

अभियान काळात कृषी विभागाचे सर्व क्षेत्रीय प्रशिक्षित अधिकारी व कर्मचारी हे नियोजित बैठका, शेतीशाळा, बचत गट बैठका आणि एफपीओच्या बैठकांना प्रत्यक्ष भेट देऊन उपस्थित महिला शेतकऱ्यांशी संवाद साधत आहेत. या संवादादरम्यान महिला शेतकऱ्यांना मिळणारे विविध लाभ, त्यासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे व प्रक्रिया तसेच कृषी विभागाच्या विविध घटकांसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची पद्धत याविषयी सविस्तर माहिती दिली जात असून पात्र महिला शेतकऱ्यांनी वेळेत ऑनलाईन अर्ज व कागदपत्रांची पूर्तता करावी यासाठी त्यांना मार्गदर्शन केले जात आहे.

ग्रामीण भागातील महिलांना आर्थिक व सामाजिकदृष्ट्या सबल बनवणारी ही मोहीम त्यांच्यासाठी खऱ्या अर्थाने संजीवनी ठरत असून गावपातळीवर या अभियानाला अत्यंत उत्तम प्रतिसाद मिळत आहे. तरी जिल्ह्यातील सर्व पात्र महिलांनी प्रमाणपत्र प्राप्तीसाठी व शासकीय योजनांच्या लाभासाठी आपल्या गावातील संबंधित मंडळ कृषी अधिकारी, उप कृषी अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी, समूह सहाय्यक किंवा 'कृषी ताई' यांच्याशी तातडीने संपर्क साधावा, असे आवाहन लातूरचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दिलीप जाधव यांनी केले आहे.

## भारत युवा नेतृत्व संवाद २०२७ मध्ये जिल्ह्यातील युवक-युवतींनी सहभागी होण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २६ सप्टेंबर : केंद्र सरकारच्या युवा कार्य व क्रीडा मंत्रालयाच्या 'माय भारत' या उपक्रमांतर्गत 'विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग २०२७ - महाराष्ट्र' या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. महाराष्ट्रातील तरुणांनी भारताचे भविष्य घडवण्यासाठी पुढे यावे या संकल्पनेवर आधारित या उपक्रमात लातूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवक-युवतींनी उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन आपले कल्पक विचार, नेतृत्वगुण, सर्जनशीलता आणि विकसित भारतासाठीच्या संकल्पना मांडाव्यात, असे आवाहन लातूरचे जिल्हा क्रीडा अधिकारी जयराज मुंढे यांनी केले आहे.

या उपक्रमात सहभागी होण्यासाठी १७ ऑगस्ट २०२७ रोजी १५ ते २९ वर्षे वयोगटातील युवक-युवती पात्र असणार आहेत. लातूर जिल्ह्यातील विविध शिक्षण संस्थांमध्ये शिक्षण घेणारे तसेच विविध क्षेत्रांत कार्यरत असलेले युवक-युवती यासाठी नोंदणी करू शकतात. स्पर्धेमध्ये विविध क्षेत्रांना वाव देणारे प्रमुख प्रकार समाविष्ट करण्यात आले आहेत. यामध्ये विकसित भारतासाठी नावीन्यपूर्ण कल्पना मांडण्यासाठी 'विकसित भारत चॅलेंज ट्रॅक', लोककला, लोकगीत, चित्रकला व लेखनासाठी 'कल्चरल ट्रॅक', दैनंदिन जीवनातील समस्यांवर तंत्रज्ञानाधारित उपाय शोधण्यासाठी 'डिझाईन फॉर भारत', सामाजिक व विकासात्मक समस्यांवर तांत्रिक उत्तरे शोधण्यासाठी 'हॅक फॉर सोशल कॉझ', युवा उद्योजकांच्या व्यावसायिक कल्पनांसाठी 'युथ आंत्रेप्रेन्यूअर चॅलेंज' आणि नेतृत्व, सार्वजनिक कर्तव्य व धोरणात्मक विचार मांडण्यासाठी 'युथ पार्लमेंट' अशा विविध स्पर्धांचा समावेश आहे.

# दुष्काळाची घोषणा झाली, अंमलबजावणी कधी : आ. आदित्य ठाकरे

तभा वृत्तसेवा

औसा दि.२६ सप्टेंबर : गेल्या वर्षी अतिवृष्टी झाल्याने पिकांचे नुकसान झाले होते.त्यामुळे शासनाला दुष्काळ व मदत जाहीर करावी लागली होती.यंदा अल निनोमुळे कोरडा दुष्काळ पडल्याने शेतकरी हतबल झाला आहे.मोठ्या संकटात सापडला आहे.सत्तार्धाय़ांनी केलेल्या पिकांच्या पाहणी दरम्यान दुष्काळाची तीव्रता ओळखून आश्र्वासनं दिली.आज सरकारने गेल्या वर्षी प्रमाणे यावर्षीही दुष्काळ जाहीर केला आहे. मदत कधी देणार हेच सांगितले नाही.यामुळे याची अमंलबजावणी कधी होणार.....? असा सवाल उपस्थित करून का गेल्या वर्षी प्रमाणेच मदत मिळणार अशी खरमरीत टीका शिवसेनेचे आ.आदित्य ठाकरे यांनी केली.



औसा तालुक्यातील तावशी ताड येथे सोयाबीन पिकाची पाहणी शनिवार दि.२६ रोजी केली. यानंतर ते उपस्थित शेतकऱ्यांशी बोलत होते.आ. अंबादास दानवे,आ. प्रवीण स्वामी, बजरंग जाधव, सुरेश भुरे, जयाताई उटगे, दिनेश जावळे, बालाजी रेड्डी, विष्णू साठे, तानाजी जाधव, पाचपुते आदी उपस्थित होते.

आ.आदित्य ठाकरे म्हणाले, गेल्या तीन वर्षांपासून महाराष्ट्रात दुष्काळाचे सत्र सुरू आहे.सततच्या नुकसानीमुळे शेतकरी हतबल, निराश झाला आहे. यामध्ये गेल्या वर्षी अतिवृष्टीत झालेल्या नुकसानीची पाहणी सत्ताधाऱ्यांनी केली होती. त्याचबरोबर नदीच्या पुरामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी केली होती. त्यावेळी शेतकर्य़ांना नुसता दिलासा देण्यासाठी जीआर काढला.वर्ष गेले. परंतू अजून शेतकर्य़ांपर्यंत मदत पोहोचली नाही. राज्यसरकार आश्र्वासन देतं आणि आदेश काढणं मात्र अमंलबजावणी करीत नाही.हे सरकार शेतकऱ्यांशी खोटे बोलत आहे. असा घणाघाती आरोप आ. आदित्य ठाकरे यांनी यावेळी केला.

आ.ठाकरे म्हणाले, पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज आम्हाला आदेश दिले असून माझ्या शेतकऱ्यांच्या बांधावर तुम्ही जाऊन आधार द्या.अन्नदाता टिकला तरच देश टिकणार आहे. पक्षाच्या माध्यमातून केंद्र उभारून मदत करणार असल्याचा दिलासा द्या.असे सांगितले असून तो निरोप घेऊन आम्ही आलो आहे.सरकारला माहित आहे. राज्यात दुष्काळ पडला आहे.म्हणून २६५ तालुक्यात दुष्काळ जाहीर करून प्रश्र्न सुटणार नाहीत.तर कोणत्या तालुक्याला काय मदत करणार हे सांगितले पाहिजे.कारण घोषणा खुप होतात.मदत कधी मिळणार. या मदतीवर तरूणांच्या शिक्षणाचे, शेतकऱ्यांच्या जगण्याचे प्रश्र्न उभा आहेत.यामुळे खास करून शेतकर्य़ांचे प्रश्र्न सोडविण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे स्पष्ट मत आ. आदित्य ठाकरे यांनी यावेळी व्यक्त केले.

### माफी चोरांना तर मुक्ती शेतकऱ्यांना असते : आ. आदित्य ठाकरे

शासनाने शेतकऱ्यांना कर्जमाफीची घोषणा केली. पण अद्याप कर्जमाफी शेतर्क़्यांपर्यंत पोहंचली नाही.माफी ही चोरांना असते.हे शेतकरी चोर नाहीत.अन्नदाते आहेत. ज्या घोषणा केलात त्या तरी पुर्ण करा. असा सल्ला देत घोषणे प्रमाणे शेतकऱ्यांना कर्जमुक्ती द्यावी.असे आवाहन आ.आदित्य ठाकरे यांनी केले.

### आम्ही तुमच्या सोबतच : आ. आदित्य ठाकरे

गेल्या सहा दिवसांपासून छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजय घाडगे शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी उपोषण करीत आहेत. यांची उपोषण स्थळी जाऊन भेट घेतली. तुम्ही ज्या मागण्यांसाठी उपोषण करीत आहात. त्याचा जीआर आज शासनाने काढला आहे. यामध्ये तुमचे समाधान झाले असेल तर आम्ही सोबत आहोत. आणि समाधान झाले नाही म्हणून तुम्ही उपोषण सुरू ठेवणार असाल तर आम्ही तुमच्या सोबत आहोत. असे आश्वासन आ. आदित्य ठाकरे यांनी जाहीरपणे दिले.

## लातूर जिल्ह्यात गणरायाला डीजेमुक्त वातावरणात निरोप

## पारंपरिक वाद्यांच्या गजरात गणेश विसर्जन; लातूर पोलिसांकडून गणेश मंडळांचे कौतुक

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २६ सप्टेंबर : लातूर जिल्हा पोलीस दलाच्या वतीने यावर्षी गणेशोत्सवाच्या पार्श्र्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व गणेश मंडळांना डीजे-डॉल्बीला फाटा देत पारंपरिक वाद्यांच्या गजरात गणरायाला निरोप देण्याचे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला जिल्ह्यातील जवळपास सर्वच गणेश मंडळांनी उत्स्फूर्त व सकारात्मक प्रतिसाद देत पारंपरिक वाद्यांच्या गजरात गणरायाला निरोप दिला. गणेश विसर्जनाच्या माध्यमातून सामाजिक सलोखा, शिस्त आणि पर्यावरणपूरक उत्सवाची परंपरा जपण्याचा प्रयत्न यंदा जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात दिसून आला. ध्वनी प्रदूषणाचे दुष्परिणाम लक्षात घेऊन गणेश मंडळांनी डीजे-डॉल्बीऐवजी ढोल-ताशा, लेझीम, झांज पथक यांसह विविध पारंपरिक वाद्यांना प्राधान्य दिले. त्यामुळे गणेश विसर्जन मिरवणुका उत्साहपूर्ण वातावरणात पार पडतानाच पारंपरिक संस्कृतीचे दर्शनही घडले.यासोबतच यावर्षी लातूर जिल्ह्यातील अनेक गणेश मंडळांनी



समाजाभिमुख उपक्रमांना प्राधान्य दिले. लातूर जिल्हा पोलीस दलाच्या वतीने करण्यात आलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत विविध गणेश मंडळांनी रक्तदान शिबिरांचे आयोजन केले. रक्तदान करणाऱ्या रक्तदात्यांना सुरक्षा कवच म्हणून हेल्मेट भेट देण्यात आले. रक्तदानातून जीवनदान आणि हेल्मेटच्या माध्यमातून रस्ते सुरक्षेचा संदेश देत गणेश मंडळांनी समाजात जनजागृती करण्याचे महत्त्वपूर्ण काम केले.

यंदाच्या गणेशोत्सवात विविध गणेश मंडळांच्या माध्यमातून ५ हजारांपेक्षा अधिक हेल्मेटचे वाटप करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, हेल्मेट वाटपाबरोबरच दुचाकी चालविताना हेल्मेट वापरणे किती आवश्यक आहे, याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली. गणेशोत्सवासारख्या उत्सवाला सामाजिक उपक्रमांची जोड देत मंडळांनी समाजाप्रती असलेली आपली जबाबदारी अधोरेखित केली. गणेशोत्सव शांततेत, शिस्तीत आणि सामाजिक बांधिलकी जपत साजरा करण्यासाठी लातूर जिल्हा पोलीस दलाच्या वतीने सातत्याने आवाहन करण्यात आले होते. त्याला गणेश मंडळांनी दिलेला प्रतिसाद हा निश्र्चितच कौतुकास्पद असून, डीजे-डॉल्बीला फाटा देऊन पारंपरिक वाद्यांना दिलेले प्राधान्य आणि रक्तदानासह हेल्मेट वाटपाचे सामाजिक उपक्रम ही लातूर जिल्ह्याच्या गणेशोत्सवाची गौरवशाली बाजू ठरली आहे. लातूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी डीजेमुक्त व पारंपरिक पद्धतीने गणरायाला निरोप देणाऱ्या तसेच रक्तदान शिबिरांचे आयोजन करून हेल्मेट वाटपाच्या सामाजिक उपक्रमात सहभागी झालेल्या सर्व गणेश मंडळांचे मनःपूर्वक कौतुक केले आहे. गणेश मंडळांनी दाखविलेली सामाजिक बांधिलकी, नागरिकांमध्ये निर्माण केलेली जनजागृती आणि प्रशासनाला दिलेले सहकार्य ही बाब निश्र्चितच प्रशंसनीय असल्याचे त्यांनी नमूद केले.यापुढील काळातही लातूर जिल्ह्यात गणेशोत्सवाची ही शांतता, शिस्त, पारंपरिक संस्कृती आणि सामाजिक बांधिलकीची गौरवशाली परंपरा अखंडित राहावी, अशी अपेक्षाही पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी व्यक्त केली आहे.

## वसुंधरा पायी दिंडीचे आज लातुरात आगमन

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २६ सप्टेंबर : अध्यात्म पर्यावरण रक्षणाचा जागर करत निघालेल्या वसुंधरा पायी दिंडीचे रविवार दि. २७ सप्टेंबर रोजी लातूर जिल्ह्यात आगमन✻ होत आहे.



अध्यात्माची ऊर्जा आणि वसुंधरा रक्षणाचा संकल्प घेऊन जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्रचार्यजी महाराज (दक्षिणपीठ श्रीक्षेत्र नाणीजधाम ) यांच्या प्रेरणेतून साकारलेली या वसुंधरा पायी दिंडीचे यंदाचे हे तिसरे वर्ष आहे. अध्यात्मिक, संस्कार,सामाजिक बांधिलकी आणि निसर्ग रक्षणाचा संदेश घेऊन दिनांक ११ सप्टेंबर रोजी पूर्व विदर्भातील नेरला जिल्हा नागपूर येथून या दिंडीचा शुभारंभ झाला. जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्रचार्यजी यांच्या सिद्ध पादुका एका रथावर विराजमान करून भक्तीभाव व नामस्मरणाच्या गजरात वसुंधरा पायी दिंडी मार्गक्रम करीत आहे. या दिंडीत महिला व पुरुष भक्तांचा मोठ्या प्रमाणात सहभाग आहे.रविवार दि.२७ सप्टेंबर या दिवशी लातूर जिल्ह्यात या दिंडीचे आगमन होत आहे.

या दिंडीत ७०० हुनअधिक धामयात्रीसह विविध ठिकाणाहून सहभागी होणारे हजारो भक्तगणांचा सहभाग असून वृक्षतोड, प्रदूषण, हवामानातील बदल, ओझन थराला निर्माण झालेला धोका यामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळलाअसल्याचा संदेश या दिंडी द्वारे देण्यात येत आहे.

या पार्श्र्वभूमीवर वसुंधरा पायी दिंडी गावोगावी वृक्ष संवर्धन यांची जतन व निसर्ग रक्षणाचा संदेश देत आहे.वसुंधरा पायी दिंडीचा पहिला मुक्काम लातूर जिल्ह्यातील अहमदपूर तालुक्यातील साई गणेश मिल्ट्री कॅम्प रुद्धा पाटी, दुसरा मुक्काम संजीवनी महाविद्यालय चापोली, तिसरा मुक्काम माऊली मंगल कार्यालय अष्टमी चाकूर, चौथा मुक्काम जगनाथ मंगल कार्यालय औसा रोड लातूर, पाचवा मुक्काम यादव मंगल कार्यालय, बेलकुंड येथे राहणार आहे. नंतरच्या दिवशी ही दिंडी धाराशिव जिल्ह्यात प्रवेश करणार आहे.या दिंडीचा मुख्य हेतू हरितक्रांती रुजविण्यासोबत स्वच्छता, प्लास्टिक मुक्तीचा संदेश हा आहे.

पर्यावरण रक्षणाचा तसेच इतर समाजपयोगी संदेश देणाऱ्या या वसुंधरा पायी दिंडीत लातूर जिल्ह्यातील सर्व भक्तगणांनी जास्तीत जास्त सहभाग नोंदवावा असे आवाहन लातूर जिल्ह्यातील रामानंद संप्रदाय भक्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## मुक्तांगणच्या लाडक्या गणराजाला साश्रूनयनांनी दिला निरोप

गणपती बप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या... अशा घोषणा देत चिमुकल्यांनी साश्रुनयनांनी आपल्या लाडक्या



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २६ सप्टेंबर : येथील विशाल नगर परिसरातील साई मंदिरा समोरील मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचलित मुक्तांगण इंग्लिश स्कूलमध्ये मुक्तांगण बाल गणेश मंडळाने स्थापन केलेल्या लाडक्या गणरायाला दहा दिवसांनंतर मोठ्या उत्साहात चिमुकल्यांनी निरोप दिला. तत्पूर्वी चिमुकल्यांनी विघ्नहर्त्या गणपती बाप्पा समोर अथर्वशिर्ष, गायत्री मंत्रांचे पठण केले. श्री गणेशाची पुजा व आरती प्रमुख पाहुणे श्रीकृष्ण लाटे, प्रभारी प्राचार्या माधुरी वाघमारे, आशा यादव, निशिगंधा सोट, कृष्णा घोडके, सानिया अत्तर, अरुणा राठोड, मीरा इगारे यांच्या हस्ते करण्यात आली. यानंतर बाप्पांची ढोल ताशांच्या गजरात, लेझीम खेळत, नाचत वाजत गाजत चिमुकल्यानी मिरवणूक काढली. मिरवणूकी दरम्यान मुलांनी गणपती बप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या... या जयघोषात गुलाल व फुलांची उधळण करत मुलांनी आनंद घेतला.

गणेशाला निरोप दिला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या शिक्षिका माधुरी वाघमारे यांनी केले

याप्रसंगी पालक, विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आदींची उपस्थिती होती. याप्रसंगी सर्व गणेश भक्तांना व विद्यार्थ्यांना प्रसादाचे वाटप करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त...

### भटक्या-विमुक्तांसाठी विशेष हक्क व प्रमाणपत्र अभियान, २७ ते २९ सप्टेंबर शिबिराचे आयोजन

तभा वृत्तसेवा

चाकूर दि. २६ सप्टेंबर : 'राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता' या अभियानांतर्गत राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या नागरिकांना शासनाच्या विविध योजना व प्रमाणपत्रांचा लाभ मिळवून देण्यासाठी चाकूर तालुक्यात भटके-विमुक्त हक्क व प्रमाणपत्र अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. हे विशेष अभियान सत्तावीस, अठ्ठावीस व एकोणतीस सप्टेंबर रोजी राबविण्यात येणार आहे.

या अभियानांतर्गत संबंधित नागरिकांना शासनाच्या विविध योजना व लाभ मिळविण्यासाठी आवश्यक असलेली आधार कार्ड, ओळखपत्रे, शिधापत्रिका, जात प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र, रहिवास व अधिवास दाखला, विवाह नोंदणी, प्रकल्पग्रस्त, दिव्यांग, जन्म-मृत्यू नोंदणी यासह इतर सर्व आवश्यक प्रमाणपत्रे एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिली जाणार आहेत.

सत्तावीस सप्टेंबर रोजी सकाळी दहा वाजता श्री विश्र्वशांती धाम ओंकारेश्र्वर मंदिर,चाकूर-मसनजोगी वस्ती येथे शिबिर होणार असून यासाठी नायब तहसीलदार दिगांबर स्वामी हे नोडल अधिकारी असतील. अठ्ठावीस सप्टेंबर रोजी सकाळी दहा वाजता संत गोविंद बाबा मंदिर लातूर रोड-मसनजोगी वस्ती येथे शिबिर होईल, यासाठी नायब तहसीलदार शैलेश निकम हे नोडल अधिकारी असतील. तर एकोणतीस सप्टेंबर रोजी सकाळी दहा वाजता ग्रामपंचायत सभागृह नळेगाव येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले असून नायब तहसीलदार संतोष धाराशिवकर हे नोडल अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत.

तालुक्यातील सर्व भटक्या-विमुक्त वस्त्यांमधील नागरिकांनी या विशेष अभियानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन चाकूर तहसीलदार नरसिंग जाधव यांनी केले आहे.

# अधिकच्या आणि भरीव मदतीसाठी पाठपुरावा करणार : आ. अभिमन्यू पवार

## औसा मतदारसंघातील निलंगा तालुक्यातील पिकांची आ. अभिमन्यू पवारांकडून पाहणी



तभा वृत्तसेवा

औसा दि. २६ सप्टेंबर : अपुरा पाऊस आणि प्रतिकूल हवामानामुळे खरीप हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेल्या औसा विधानसभा मतदारसंघातील निलंगा तालुक्यातील पिकांची आमदार अभिमन्यू पवार यांनी पाहणी दौरा केला. त्यावेळी एकोजी-मुदगड, सरवडी, मदनसुरी, हरीजवळगा, हासुरी बु., कासार सिरसी आणि मिरगण हळळी परिसरातील गावांतील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधला. शेतकऱ्यांना धीर देत सरकारकडून मिळणाऱ्या सरसकट मदतीची भुमिका स्पष्ट करून अधिकच्या आणि भरीव मदतीसाठी पाठपुरावा करणार असल्याची ग्वाही आ. अभिमन्यू पवार यांनी शेतकऱ्यांना दिली.

या पीक पाहणीत पावसाअभावी सोयाबीन, उडीद,मुग , तूर पिकांची झालेली दयनीय अवस्था, उत्पादनात झालेली घट तसेच वाढलेल्या आर्थिक अडचणींबाबत शेतकऱ्यांनी आपल्या व्यथा मांडल्या. आमदार अभिमन्यू पवार यांनी नुकसानग्रस्त पिकांची पाहणी करून शेतकऱ्यांना धीर दिला.व मदत केवळ पंचनाम्यांपुरती मर्यादित राहणार नाही.शेतर्कयांचे नुकसान मोठ्या प्रमाणात सरसकट झाले असून शेतकऱ्यांना सरसकट मदत सरकार करणार आहे. असे आमदार पवार यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी औसा तालुक्यातील नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून शेतकऱ्यांना सरसकट मदतीची भूमिका स्पष्ट केली आहे. दुष्काळजन्य परिस्थितीच्या पार्श्र्वभूमीवर शासनाकडून आवश्यक निर्णय घेतले जाणार आहेत. तसेच लातूर व धाराशिव जिल्ह्यांतील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना अधिकची व भरीव मदत मिळावी. यासाठी आपण सरकारकडे पाठपुरावा करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

मतदारसंघातील विविध भागांत झालेल्या नुकसानीची तीव्रता शासनाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी पाहणी केली जात आहे .नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना लवकरात लवकर दिलासा मिळावा. यासाठी प्रयत्न केले जातील असे अभिमन्यू पवार यांनी सांगितले. संकटाच्या काळात शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये. शासन त्यांच्या पाठीशी असल्याचा विश्र्वासही त्यांनी व्यक्त केला.या पाहणी दौऱ्यात पदधिकारी यांच्यासह कृषी सहायक, तलाठी, प्रशासकीय अधिकारी, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जय भवानी गणेश मंडळाच्यावतीने २७ रक्तदात्यांनी केले रक्तदान



तभा वृत्तसेवा

किनगाव दि २६ सप्टेंबर : किनगाव पासून काही अंतरावरील खानापूर येथे जय भवानी गणेश मंडळ व गणपती गणेश मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात गावातील तब्बल २७ रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत रक्तदान केले . याप्रसंगी माजी सैनिक गौतम वसंतराव शिंदे ( पाटील) यांच्या संकल्पनेमधून , शौर्य ब्लड बँक अहमदपूर यांना पाचरण करून प्रत्येक रक्तदात्यांना हेल्मेटचे वाटप करण्यात आले . श्री गणरायाची मनोभावे आरती करून या रक्तदान शिबिरास सुरुवात करण्यात आली यावेळी गणेश मंडळाचे पदाधिकारी तसेच गावातील जेष्ठ नागरिक मार्गदर्शक , मान्यवर व्यक्तींची प्रमुख उपस्थिती होती . यावेळी सुनिता ताई सुरेश शिंदे, गौतम वसंतराव शिंदे, सुहास शिंदे, माधव उत्तम शिंदे, कृष्णा शिंदे, माधव जाधव, इंद्रजीत शिंदे, आनंद शिंदे, विनोद जाधव, हनुमान गोंडणार, ईश्र्वर हंगे माजी सैनिक, दत्ता खांडेकर, मच्छिंद्रनाथ खांडेकर, बळीराम इंगळे इत्यादी मंडळीने रक्तदान देऊन सहभाग नोंदवीला . यावेळी अहमदपूर येथील शौर्य ब्लड बँकेचे संचालक नवन पाटील व त्यांच्या डॉक्टरांची टीम . फड राधाकिशन, खुशी नंदरधने, विधी अंबुले, अमिशा वालदे, आणि गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती

## ग्राम रोजगार सहाय्यकांनी केली शासन निर्णयाची होळी लढ्यानंतरही मानधनात होईना वाढ



तभा वृत्तसेवा

औसा दि.२६ सप्टेंबर : महाराष्ट्र शासनाच्या मृद व जलसंधारण (रोहयो) विभागाने २२ सप्टेंबर २०२६ रोजी काढलेल्या ग्राम रोजगार सहाय्यकांच्या मानधनाचा सुधारित शासन निर्णयाच्या विरोधात लातूर जिल्ह्यातील ग्राम रोजगार सहाय्यकांनी संताप व्यक्त केला. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वारासमोर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंके व शहर काँग्रेस अध्यक्ष डॉ .प्रा शिवाजी जवळगेकर, गटनेत्या आशाताई भिसे,मुख्य प्रदोत सोनाली थोरमोटे यांच्या उपस्थितीत या शासन निर्णयाची होळी करण्यात आली.

**शासनाचा निर्णय अन्यायकारक : अभय साळुंके**

मागणी मानधनांची असताना शासनाने जाणिव पुर्वक रोजगार सहाय्यक देशौधडीला लावण्यांचा घाट घातला आहे .शासनाने घेतलेला हा तुबलकी निर्णय असून इमानदारीने मागील १७-१८ वर्षापासून काम करणारे ग्राम रोजगार सहाय्यक रोजगार हमीतील एक महत्त्वाचा मजबुत दुवा आहेत .या रोजगार सहाय्यकांना कायम सेवेत घेण्यांचे सोडून जाणिव पुर्वक चुकीचे निर्णय लादले असून जोपर्यंत रोजगार सहाय्यक यांना न्याय मिळत नाही. तोपर्यंत आम्ही त्यांच्या सोबत आहोत. असे पाठबळ जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंके यांनी दिले आहे.

**कामे उपलब्ध करून देण्याची शासनाची जबाबदारी – चाँद शेख**

शासन निर्णयानुसार मनुष्य दिवसांच्या अटीवरही आक्षेप घेतला असून प्रत्येक सहाय्यकाने वर्षाला सहा हजार, तर सहा महिन्यांत तीन हजार मनुष्यदिवसांची निर्मिती करणे आवश्यक आहे. उद्दिष्ट पूर्ण न झाल्यास सेवा समाप्तीची तरतूद असल्याचे निर्णयात म्हटले आहे. मनरेगा अंतर्गत कामे उपलब्ध करून देणे प्रशासनाची जबाबदारी आहे . तसेच गावातील सरपंच व ग्रामसेवक यांना मदत करण्याची जबाबदारी रोजगार सहाय्यकांची आहे.ग्रामपंचायत कामांना मंजूरी आणते परंतु त्याचा परिणाम सहाय्यकांच्या सेवेशी जोडणे अन्यायकारक असल्याचे जिल्हाअध्यक्ष चाँद शेख यांनी सांगितले.

ग्राम रोजगार सहाय्यक संघटनेनुसार, ३ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयात ग्राम रोजगार सहाय्यकांना आठ हजार रुपये ठराविक मानधन देण्याचे जाहीर करण्यात आले होते. मात्र, दोन वर्षांच्या प्रतीक्षेनंतर जाहीर झालेल्या नव्या निर्णयात दरवर्षी १५ ऑगस्ट रोजी ग्रामसभेत सहाय्यकांची नव्याने निवड करण्याची अट घालण्यात आली आहे. त्यामुळे गेल्या १९ वर्षांपासून सेवा देणाऱ्या सहाय्यकांच्या सेवा शाश्र्वतीवर प्रश्र्नचिन्ह निर्माण झाल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

संघटनेने सहाय्यकांना थेट मुदतवाढ देऊन सेवेत कायम करण्याची मागणी केली आहे. तसेच शासनाच्या या निर्णयाच्या विरोधात आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी रोजगार सहाय्यकांनी दिला आहे.

जिल्हा ग्राम रोजगार सहाय्यक संघटनेचे जिल्हाध्यक्ष चांद शेख, दिलीप पांचाळ,प्रेमचंद आचार्य, जिल्हा सचिव अमोल घायाळ व जिल्ह्यातील तालुकाध्यक्ष व ग्राम रोजगार सहाय्यक शेकडोंच्या संख्येने उपस्थित होते.

## शहरातील अतिक्रमणे हटवा व मोकाट प्राण्यांचा बंदोबस्त करा

### मनसे जिल्हाध्यक्ष डॉ. भिकाने यांची मागणी



तभा वृत्तसेवा

निलंगा दि. २६ सप्टेंबर : शहरातील छत्रपती शिवाजी महाराज नगर मधील रस्ते अतिक्रमणमुक्त करा व मोकाट जनावरे, कुत्रे,डुकरे आदींचा बंदोबस्त करा अशी मागणी मनसे जिल्हाध्यक्ष डॉ नरसिंह भिकाने यांनी नगरपालिका मुख्याधिकारी यांच्याकडे केली आहे. शहरामध्ये कचऱ्याचे ढीग साचले आहेत,त्याची दुर्गंधी येत आहे तसेच अटक वॉक च्या बाजूच्या नाल्यातील कचरा नियमितपणे उचलणे गरजेचे आहे.जो का उचलला जात नाही असा प्रश्र्न डॉ भिकाने यांनी मुख्याधिकाऱ्यांना विचारला.तसेच शहरात रस्त्यावर मोकाट जनावरे,कुत्रे व डुकरे मोठ्या प्रमाणात फिरण्याने वाहनधारकांना वाहने चालवताना दररोज अपघातांना सामोरे जावे लागत आहे तरी त्यांचा बंदोबस्त करावा अशी सूचना केली.तसेच छ.शिवाजी नगर मध्ये सरळ सरळ नगरपालिका रस्त्यांवर घरे थाटली जात आहेत मग नगरपालिका झोप काढतेय का असा सवालही त्यांनी नगरपालिका प्रशासनास विचारत त्वरित कार्यवाही करा अन्यथा मनसे स्टाईल आंदोलन करू असा इशाराही दिला आहे.यावरती मुख्याधिकारी यांनी योग्य भूमिका घेत हे सर्व मुद्दे जनहिताचे असून आम्ही त्यावर तात्काळ कार्यवाही करू असे आश्र्वासन डॉ भिकाने यांना दिले त्यानंतरच त्यांनी नगरपालिका सोडली.यावेळी जिल्हासचिव प्रदीप शेळके,जिल्हाउपाध्यक्ष सूरज पटेल,तालुकाध्यक्ष सचिन बिराजदार,शहराध्यक्ष अबू बकर सय्यद,गणेश उसनाळे,बालाजी पवार,विकास सूर्यवंशी, सदाशिव हाडोळे,शिवराज चिंचोले आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

### 'महा-उपलब्धी' पबाबत ६ ऑक्टोबर रोजी निवृत्ती वेतनधारकांसाठी कार्यशाळेचे आयोजन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २६ सप्टेंबर : वित्त विभागाच्या १९ जून २०२६ च्या शासन निर्णयानुसार १ जुलै २०२६ पासून निवृत्तीवेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतन धारकांसाठी चरहर-णझङ-इउक्रख (महा-उपलब्धी) हे मोबाईल प कार्यान्वित करण्यात आले आहे. या पमुळे निवृत्तीवेतन विषयक सर्व सेवा जलद आणि अत्यंत पारदर्शक पद्धतीने उपलब्ध होणे शक्य झाले आहे.

या मोबाईल पबाबत व्यापक जनजागृती करण्यासाठी लातूर कोषागार कार्यालय यांच्या वतीने ६ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता कोरे गार्डन सभागृह, मोतीनगर, लातूर येथे विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

## मोबाईलच्या व्यसनापासून विद्यार्थी दुर रहावे : तहसीलदार प्रसाद कुलकर्णी

तभा वृत्तसेवा

निलंगा दि. २६ सप्टेंबर : निलंगा तालुक्यातील जोतवाडी (मुगाव) येथे गणपती उत्सवानिमित्त स्वराज्य बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ मुगाव चे संस्थापक अध्यक्ष डॉ. शिवाजी तात्याराव जाधव व वीर हनुमान गणेश मंडळ जोतवाडी (मुगाव) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विविध स्पर्धाचा बक्षीस वितरण सोहळा अनंत चतुर्दशी शुक्रवार दिनांक २५ सप्टेंबर २०२६ रोजी निलंगा तहसीलदार प्रसाद कुलकर्णी यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.

जसे दारू, तंबाखू अशा अनेक व्यसनाप्रमाणे भविष्यात मोबाईल चे व्यसन हे मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. मोबाईल च्या अतिवापरामुळे डोळ्यावर, मेंदुवर परिणाम होऊ शकतो. कोविड काळात मोबाईल चा वापर विद्यार्थ्यांमध्ये वाढला. असुन आज आपली मुले मोबाईल वर काय पाहतात हे पालकाने लक्ष ठेवून मुलांना अभ्यासविषयक बाबींसाठी तात्पुरता मोबाईल द्यावा व आपली मुले भविष्यात मोबाईल च्या व्यसनापासून दूर राहतील याची खबरदारी पालकांनी घेणे गरजेचे असल्याचे मत तहसीलदार प्रसाद कुलकर्णी यांनी व्यक्त केले. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच पुरक शैक्षणिक स्पर्धा मध्ये भाग घेतला पाहिजे व आपल्या आपले व्यक्तिमत्व चांगले बनवावे. असा सल्ला उपस्थित विद्यार्थी व पालकांना दिला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वीर हनुमान गणेश मंडळाचे अध्यक्ष धर्मराज जाधव हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार रविकिरण सुर्यवंशी, तलाठी पल्लवी पवार, कृषी सहाय्यक सदाशिव लोहारे, शिक्षक लक्ष्मण कुंभार, शिक्षीका कविता जाधव, सुमन चपटे, माधव जाधव, मोहन शिंदे, धर्मवीर महाळ, कल्लेश्र्वर स्वामी आदींची उपस्थिती होती.



## डीजे, साउंड – माईकला फाटा ; हलगीच्या तालावर अष्टविनायक गणेश मंडळाची पारंपरिक विसर्जन मिरवणूक





तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. २६ सप्टेंबर : गणेशोत्सवातील ध्वनिप्रदूषणाला फाटा देत अष्टविनायक गणेश मंडळाच्या वतीने यंदा गणेश विसर्जन मिरवणूक पारंपरिक पद्धतीने काढण्यात आली. डीजे नाही, साउंड नाही, माईकही नाही; केवळ हलगीच्या तालावर गणरायाची शोभायात्रा काढून मंडळाने अनोखा आदर्श निर्माण केला.

मिरवणुकीत आकर्षक सजावट केलेली बैलगाडी सहभागी करण्यात आली होती. हलगीच्या पारंपरिक तालावर भाविकांनी उत्साहात सहभाग घेत गणरायाला निरोप दिला. पारंपरिक व साध्या पद्धतीने आयोजित केलेल्या या विसर्जन मिरवणुकीचे नागरिकांकडून कौतुक करण्यात आले.

मंडळाचे अध्यक्ष रुद्र कवठाळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी सोमनाथ पानगावे, संभाजी सुरवसे, बंडाप्पा पानगावे, संगमेश्र्वर पानगावे, वर्षा पानगावे, पुष्पवती पानगावे, शितल सुरवसे, विजयमाला लांडगे, शोभा पानगावे, ऐश्र्वर्या सुरवसे, नंदिनी पानगावे, प्रणिता पानगावे यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले.

### गणेश मंडळाचा रक्तदानासोबत हेल्मेट वापरासाठी प्रबोधन पर कार्यक्रम

तभ वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. २६ सप्टेंबर : लातूर जिल्हात वाढत असलेल्या रस्ते अपघाताच्या पार्श्र्वभूमीवर लातूर जिल्हा पोलिस दलाच्या वतीने जिल्हासह ग्रामीण भागातही प्रत्येक टूव्हिलर चालकांना हेल्मेट वापर करण्यासाठी सक्तीची अंमलबजावणी करण्यात येत असून दुचाकी चालविताना प्रत्येक नागरिकांनी हेल्मेट वापर करावा या कार्यवाही सोबतच जनजागृतीवर पोलिसांनी भर दिला आहे.यासाठी काही जिल्ह्यातील सामाजिक संस्थाने पुढाकार घेत गणेशोत्सव मंडळांना रक्तदान शिबिराचे आयोजन करा आम्ही मोफत हेल्मेट देऊ आशा पुढाकार घेतल्याने ग्रामीण भागातील गणेशोत्सवात रक्तदान शिबिर घेऊन हेल्मेट उपक्रमाला मोठा गणेश मंडळाकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून येरोळ येथील बंजरग बली गणेश मंडळांनी यात सहभाग घेतला संजीवनी ब्लॅड सेंटर च्या माध्यमातून गुरुवारी हणूमान मंदिर सभागृहात रक्तदान शिबिराचे आयोजन केले आसता तब्बल ६६ तरुणांनी उत्साहात रक्तदान केले यावेळी लातूर येथील थॉलेसिमिया प्रतिष्ठान च्या वतीने प्रमोद बानाटे,संरपच सतिश सिंदाळकर, गणेश मंडळ अध्यक्ष यांच्या हस्ते ६६ रक्तदान केलेल्या युवकांना मोफत हेल्मेट वाटप करण्यात आले.

## जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चाकूर तालुक्यातील आरोग्य, शिक्षण,व जनजीवन योजनेची केली पाहणी

### दुष्काळ सदृश्य परिस्थितीमुळे बांधावर जाऊन सोयाबीनची केली पाहणी



तभा वृत्तसेवा

चाकूर दि. २६ सप्टेंबर : लातूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांनी दि.२५ सप्टेंबर रोजी चाकूर तालुक्याचा संयुक्त पाहणी दौरा केला.

चाकूर तालुक्यातील घरणी येथील आरोग्य उपकेंद्रास भेट देऊन जिल्हाधिकाऱ्यांनी औषध साठ्याची पाहणी केली व गरोदर महिलांशी संवाद साधत त्यांच्या आरोग्याची विचारपूस करून अडचणी जाणून घेतल्या. त्यानंतर घरणी येथील जिल्हा परिषद केंद्रीय शाळेला भेट देऊन त्यांनी विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधला. विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता व प्रगतीचा आढावा घेऊन त्यांनी समाधान व्यक्त केले.

सध्याची दुष्काळसदृश्य परिस्थिती लक्षात घेता त्यांनी घारोळा येथे जलजीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनेची प्रत्यक्ष पाहणी केली. तसेच शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन सोयाबीन पिकाची पाहणी करत शेतकऱ्यांशी संवाद साधला. प्रशासन कायम शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याचे आश्र्वासन यावेळी त्यांनी दिले.

त्यानंतर चापोली येथील प्राथमिक आरोग्य केंद्रास भेट देऊन पाहणी करण्यात आली. आरोग्य सेविकांच्या शासकीय निवासस्थानासही त्यांनी प्रत्यक्ष भेट दिली. रुग्णांना चांगल्या आरोग्य सुविधा द्याव्यात व आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत जास्तीत जास्त रुग्णांना लाभ देण्यासाठी प्रयत्न करावेत, अशा मार्गदर्शक सूचना त्यांनी यावेळी दिल्या.तसेच येथील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन सोयाबीनची पाहणी केली.

यावेळी उपविभागीय अधिकारी मंजुषा लटपटे, तहसीलदार नरसिंग जाधव, गटविकास अधिकारी संतोष माने, गटशिक्षणाधिकारी मंदोदरी वाकडे, उपअभियंता बांधकाम कोळे, उपअभियंता लघु पाटबंधारे प्रशांत येलाले, तालुका आरोग्य अधिकारी विवेक होळे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी तसेच भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष रमेश पाटील, रमेश हळनर, गंगाधर बावचे,राम गादगे सह विविध शेतकरी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# विघ्नहर्ता श्री चिंतामणीच्या दर्शनासाठी हिंगोलीत भाविकांची अलोट गर्दी

## दानशूरांकडून ठिकठिकाणी नाश्ता, फराळ, जेवणाची व्यवस्था





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ सप्टेंबर**
नवसाला पावणारा मोदकाचा गणपती म्हणून राज्यासह देशभरात प्रसिध्द असलेल्या विघ्नहर्ता चिंतामणी गणपतीच्या दर्शनासाठी देशभरातून भाविक दाखल झाले होते. हजारो भाविकांनी मध्यरात्रीपासूनच श्री चिंतामणी गणपतीच्या दर्शनासाठी लांबच लांब रांगा लावल्या होत्या. यावेळी शहरातील दानशूर व्यक्तींनी भाविकांच्या सोयीसाठी नाश्ता, फराळ, जेवण तसेच चहा, दूध, पिण्याचे पाण्याची व्यवस्था केली होती. सायंकाळपर्यंत सुमारे दीड लाखांपेक्षा जास्त भाविकांनी श्री चिंतामणीचे दर्शन घेतले होते.

हिंगोली शहरातील गड्डेपीर गल्लीतील विघ्नहर्ता श्री चिंतामणी गणपतीला अनंत चर्तुदशीच्या दिवशी मोठे महत्व आहे. यादिवशी नवसाचा मोदक घेवून जाण्यासाठी तसेच मोदकाचा नवस फेडण्यासाठी हजारो भाविक हिंगोलीत देशभरातून दाखल होतात. महाराष्ट्रासह तेलंगणा, मध्यप्रदेश, आंध्र प्रदेश, गुजरात तसेच राजस्थान येथून मोठ्या संख्येने भाविक श्री चिंतामणीच्या दर्शनासाठी दाखल झाले होते. रात्री बारा वाजता श्री चिंतामणी गणपतीची विधीवत पूजाअर्चा त्यानंतर महाआरती झाली. मध्यरात्री भाविकांच्या दर्शनासाठी मंदिर खुले करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी रांगेत उभे असल्याचे दिसत होते. बाहेर गावाहून आलेल्या भाविकांना ठिकठिकाणी दानशूर व्यक्तींकडून नाश्ता, चहा, दुध, पिण्याचे पाणी तसेच जेवणाची उत्तम सोय करण्यात आली होती.

गणपती बाप्पा मोरया च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दण- ाणून गेला होता. जागोजागी स्वयंसेवकांकडून भाविकांना मार्गदर्शन करण्यात येत होते. संस्थानकडून वृध्द, गरोदर माता यांच्यासाठी दर्शनाच्या रांगेत बसण्यासाठी खुर्च्या तसेच सावलीसाठी मंडप उभारण्यात आले होते. स्वयंसेवकांकडून तसेच नगर पालिका कर्मचाऱ्यांकडून परिसरात स्वच्छता ठेवली जात होती. तसेच आरोग्य विभागाकडून आरोग्य पथके उभारण्यात आली होती. भाविकांना त्रास झाल्यास त्यांची सेवा करण्यासाठी आरोग्य अधिकारी व कर्मचारी तैनात करण्यात आले होते.

कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून शहरात येणारे सर्व रस्ते वाहनांसाठी बंद करण्यात आले होते तसेच जाग- ोजागी चोख पोलिस बंदोबस्त लावण्यात आला होता. यावेळी वरिष्ठ पोलिस अधिकारी, जिल्हा प्रशासनातील अधिकारी तसेच नगर पालिका अधिकारी यांनी भेट देत व्यवस्थेची वारंवार पाहणी केली. रात्री उशिरापर्यंत विघ्नहर्ता चिंतामणीच्या दर्शनासाठी भाविकांच्या रांगा दिसत होत्या.

# लोकशाही सशक्तीकरणासाठी मतदार नोंदणी आवश्यक- तहसीलदार भूजबळ




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ सप्टेंबर**
येथील आदर्श महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय मतदार दिवस व सेवा संकल्प अभियान राबविण्यात आले. यावेळी हिंगोली तहसीलचे तहसीलदार श्रीकांत भुजबळ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले ज्या विद्यार्थ्यांनी१ ऑक्टोबर २०२६रोजी अठरा वर्ष पूर्ण केलेले आहेत त्या विद्यार्थ्यांनी लोकशाही सशक्तीकरणासाठी मतदार नोंदणी करणे आवश्यक आहे आणि पुढे चालून हा देश त्यांना चालवायचा असून ते देशाचे भविष्यातील आधारस्तंभ आहेत असे याप्रसंगी मत व्यक्त केले. तेव्हा मतदार नोंदणी अभियानाचा लाभ घेऊन आपल्या मित्रपरिवार, भाऊ-बहीण, नातेवाईक, यांची नोंदणी करावी असे आवाहन त्यांनी केले. तसेच सेवा संकल्प अभियानांतर्गत समाज कल्याण विभागामार्फत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देण्यात येणारे सुविधांची माहिती श्रीमती डी.ए. अवचार, गृहपाल सावित्रीबाई फ ुले वस्तीग्रह हिंगोली, यांनी दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी स्वाधार योजना तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिष्यवृत्ती या योजनांचा लाभ घ्यावा असे अव- ाहन केले. स्वाधार योजनेसाठी शासकीय वसतिगृह प्रवेश अर्ज करणे आवश्यक असल्याचे सांगितले.या योजनांना लागणाऱ्या कागदपत्रांची माहिती पठाडे व कांगणे यांनी विद्यार्थ्यांना दिली. याप्रसंगी मंचावर नायब तहसीलदार श्रीमती मंगला मोरे, गृहपाल श्रीमती ढोणे, राठोड हे उपस्थित होते. यावेळी बूथ लेवल ऑफिसर श्री दीपक कोकरे यांनी मतदार आणि लोकशाही या संदर्भात विद्यार्थ्यांना उदबोधित केले. या कार्यक्रमासाठी डॉ. सचिन हाटकर, डॉ. तुकाराम हापगुंडे, सुरेश व-हाड, बंडु ठाकुर, संजय राठोड यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. विलास आ- घाव यांच्या मार्गदर्शनाखाली परिश्रम घेतले.

# प्रमाणित व गुणवत्तापूर्ण बियाण्यांचीच खरेदी करावी- राहुल गुप्ता

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ सप्टेंबर**
महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ (म हाबीज), जिल्हा कार्यालय हिंगोली येथे गणेशोत्सवानिमित्त आज जनसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद हिंगोली अतुल एस. वायसे, कृषी विज्ञान केंद्र, तोंडापूरचे शास्त्रज्ञ राजेश भालेराव, महाबीजचे भागधारक सतीश सोमानी, बबनराव पतंगे यांच्यासह जिल्ह्यातील शेतकरी व महाबीजचे विक्रेते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी शेतकऱ्यांनी केंद्र शासनाच्या विकसित साथी पोर्टलद्वारे निर्मित क्यूआर कोड असलेले म हाबीजचे प्रमाणित बियाणेच खरेदी करण्याचे आवाहन केले. प्रमाणित बियाण्यांच्या वा- परामुळे शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण बियाणे उपलब्ध होण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले. तसेच जमिनीतील सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढवून जमिनीची सुपीकता टिकविण्यासाठी भाभा अणुसंशोधन केंद्राच्या तंत्रज्ञानावर आधारित निमास्त्र, निंबोळी पावडर, कचरा विघटनासाठी महास्पीड, जैविक बुरशीनाशक ट्रायकोडर्मा तसेच जैविक द्रवरूप खतसंघ महाजैविक यांचा शेतीमध्ये वापर करण्याचे आवाहन त्यांनी केले.

कृषी विकास अधिकारी अतुल एस. वायसे व कृषी विज्ञान केंद्र, तोंडापूरचे शास्त्रज्ञ राजेश भालेराव यांनी उपस्थित शेतकऱ्यांना विविध शेतीविषयक बाबींवर सखोल मार्गदर्शन केले. महाबीजचे जिल्हा व्यवस्थापक आर. आर. राठोड यांनी महाबीजची नवीन उत्पादने, ध्येय-धोरणे तसेच रब्बी हंगामासाठी हरभरा, गहू व करडई बियाण्यांच्या उपलब्धतेबाबत माहिती दिली. हिंगोली जिल्ह्याने जैविक उत्पादनांच्या विक्रीमध्ये महाराष्ट्र राज्यात सर्वाधिक विक्री केल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच शासनाच्या महाडीबीटी पोर्टलवर अनुदानित बियाणे मिळण्यासाठी पात्र शेतकऱ्यांनी अर्ज करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस. डी. मुंगल यांनी केले. पी. डी. बोकारे, कृषी क्षेत्र अधिकारी यांनी प्रास्ताविक केले, तर व्ही. आर. घुले, कृषी क्षेत्र अधिकारी यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाबीज जिल्हा कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



**हिंगोली- सार्वजनिक दसरा महोत्सव समितीच्या कार्यालयात हनुमानाची पूजा करण्यात आली. यावेळी उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, महंत कौशल्यादास महाराज, अॅड श्रीधर घुगे, शिवाजी मुटकुळे, मधुकर खंडागळे, चंद्रकांत लव्हाळे, दौलत बनसोडे, संतोष टेकाळे, विश्वास नायक, नागेश धनमने, भिकुलाल बाहेती, विलास गोरे आदींसह समितीतील सदस्य उपस्थित होते. छाया- विजय गुंडेकर**


## संक्षिप्त वृत्त

### आदर्शमध्ये रासेयो दिवस साजरा



हिंगोली- आदर्श महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना दिवस साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य प्रो. डॉ. संजीव कुमार नरवाडे होते. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी माय भारत पोर्टलवर रजिस्ट्रेशन केले तसेच विकसित भारत यंग लीडर डायलॉग क्वियज या स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवला. यावेळी डॉ विलास आ- घाव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. राष्ट्रीय सेवा योजने मधून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो तसेच सामाजिक व श्रम संस्काराचे मूल्य विद्यार्थ्यांमध्ये रुजतात असे सांगितले. यावेळी त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्थापनेचे संदर्भातील विषयावर प्रकाश झ्योत टाकला व समाजसेवेचे महत्त्व विशद केले. यानंतर विद्यार्थ्यांनी श्रमदान करून केले. या कार्यक्रमासाठी डॉ. सचिन हाटकर, डॉ. तुकाराम हपगुंडे, प्रा. सुरेश वराड यांनी परिश्रम घेतले तर राष्ट्रीय सेवा योजनेचे २५० विद्यार्थी या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

### सार्वजनिक दसरा महोत्सवाचे बासा पूजन




हिंगोली- सार्वजनिक दसरा महोत्सव समितीच्या वतीने यावर्षी २५ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता शहरातील रामलीला मैदानावर भाषा पूजनाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी सार्वजनिक दसरा महोत्सव समितीचे अध्यक्ष तथा उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, महंत कौशल्यदास महाराज, हिंगोली वकील संघाचे अध्यक्ष श्रीधर घुगे, भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष शिवाजीराव मुटकुळे, नगरसेवक चंद्रकांत लव्हाळे, मधुकर खंडागळे, दौलत बनसोडे, विलास गोरे, संतोष टेकाळे, नागेश धनवणे, विश्वासराव नाईक, सामाजिक कार्यकर्ते गणेश साहू, वाढदिवसाच्या राजेंद्र हलवाई, प्रदीप धडवाई, पाठक महाराज यांच्यासह इतरांची उप- स्थिती होती.

### २३१ वाहनांवर पोलिसांची कारवाई

हिंगोली- अवैध वाहतुक करणाऱ्या तसेच वाहतुकीचे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २३१ वाहन चालकांवर कारवाई केली आहे.

# सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून गरजू व पात्र लाभार्थ्यांपर्यंत सेवा पोहोचविणार- जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ सप्टेंबर**
शासनाच्या निर्देशानुसार दि. १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत जिल्ह्यात सेवा संकल्प अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून गरजू व पात्र नागरिकांना आवश्यक शासकीय सेवा, प्रमाणपत्रे तसेच विविध योजनांचा लाभ उपलब्ध करून देण्यात येत आहे. जिल्ह्यात अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असून, एकही पात्र नागरिक शासकीय सेवा व योजनांच्या लाभापासून वंचित राहणार नाही, यासाठी प्रशासनामार्फत विशेष प्रयत्न करण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी सांगितले.

सेवा संकल्प अभियानाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात आज पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी अभियानाच्या अंमलबजावणीबाबत माध्यम प्रतिनिधींना माहिती दिली. निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, उपजिल्हाधिकारी निवडणूक प्रगती चौंडेकर तसेच विविध माध्यमांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता म्हणाले की, सेवा संकल्प अभियानांतर्गत हिंगोली जिल्ह्यात प्रारंभी २५ गावांची निवड करण्यात आली आहे. या गावांमध्ये नागरिकांना आवश्यक असलेली प्रमाणपत्रे, विविध शासकीय सेवा तसेच योजनांचा लाभ मिळत आहे किंवा नाही, याची माहिती घेण्यात आली आहे. पात्र असूनही आवश्यक प्रमाणपत्रे मिळालेली नाहीत किंवा शासकीय योजनांचा लाभ मिळालेला नाही, अशा नागरिकांना आवश्यक सेवा उपलब्ध करून देण्यासाठी विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

या अभियानाच्या माध्यमातून प्रशासन थेट नागरिकांपर्यंत पोहोचत आहे. निवडलेल्या २५ गावांमध्ये आयोजित विशेष शिबिरांच्या माध्यमातून आतापर्यंत सुमारे ७०० प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात येणार आहे. नागरिकांना शासकीय कार्यालयात वारंवार येण्याची आवश्यकता भासू नये, तसेच प्रम ाणपत्रे व विविध सेवांसाठी अनावश्यक विलंब होऊ नये, यासाठी स्थानिक पातळीवर शिबिरे घेऊन सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

सेवा संकल्प अभियान केवळ प्रारंभी निवडलेल्या २५ गावांपुरते मर्यादित न ठेवता टप्प्याटप्प्याने जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीपर्यंत पोहोचविण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे. प्रारंभीच्या गावांमध्ये अभियानाच्या अंमलबजावणीचा आढावा घेतल्यानंतर नागरिकांच्या गरजा आणि उपलब्ध सेवांचा विचार करून पुढील टप्प्यात अभियान अधिक व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत शासकीय सेवा व योजनांचा लाभ पोहोचविण्यास मदत होणार आहे.दि. १७ सप्टेंबर रोजी पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांच्या हस्ते पात्र लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करून सेवा संकल्प अभियानाचा जिल्ह्यात शुभारंभ करण्यात आला. या अभियानाच्या माध्यमातून प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संपर्क अधिक प्रभावी करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. नागरिकांच्या अडचणी स्थानिक पातळीवर जाणून घेऊन त्यावर आवश्यक कार्यवाही करण्यास प्राधान्य देण्यात येत आहे. सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून जास्तीत जास्त शासकीय सेवा नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न असल्याची माहिती जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिली.

# गणेश मंडळाचा प्लास्टीक बंदीचा निर्णय

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ सप्टेंबर**
सार्वजनिक शिवमुद्रा गणेश मंडळ पूर तालुका औंढा नागनाथ जिल्हा हिंगोली येथे गणेश मंडळाच्या सर्व सदस्यांनी प्लॅस्टिक मुक्ती म्हणून प्लास्टिक पासून बनवलेल्या पत्रावळी व द्रोण - ग्लास न वापरता जेवण हे पारंपारिक पद्धतीने महाप्रसाद सेवन करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाला काही जणांनी पैसे असूनही खर्च बारकाई करून पत्रवाळी ग्लास ड्रोन हे प्लास्टिकचे का वापरत नाहीत याबाबतही चर्चा विनिमय झाला परंतु आरोग्याच्या फायद्यासाठी सर्व शिवमुद्रा मंडळांनी पुढाकार घेऊन सर्वप्रथम सुरुवात केली. सर्व गावकऱ्यांना विनंती केली व आरोग्यासाठी लाभदायक असणाऱ्या गोष्टी चे महत्त्व पटवून देऊन सर्वांनी निर्णय मान्य करून ताट तांब्या वाटी घेऊन जेवणाचे सर्वांनी मान्य करून महीला व पुरुषांनी पारंपरिक जेवणाचा आस्वाद घेतला. स्वतः च्या आरोग्यासाठी फायदेशीर असून कॅन्सर सारख्या बिम ाऱ्यांना आळा बसण्यासाठीचा आपल्या जवळचा सोपा उपाय आहे व सरकारच्या प्लास्टिक मुक्ती योजनेला दुज- ोरा देऊन गणेश मंडळाने यावर्षी पुढाकार घेतला. या निर्णयाचे परिसरात कौतुक करण्यात येत असून प्लास्टीक बंदी व्हायलाच पाहीजे अशी प्रतिक्रिया ग्रामस्थांनी दिली.

# ५६३ ग्रामपंचायतीमध्ये माझं गाव आरोग्य संपन्न गाव अभियानाला वेग

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली २५ सप्टेंबर**
ग्रामीण भागातील प्रत्येक नागरिकाचे आरोग्यमान उंचावण्यासाठी आणि तळ- ागाळातील घटकांपर्यंत दर्जेदार प्राथमिक आरोग्य सेवा पोहोचवण्यासाठी म हाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत १ एप्रिल २०२६ पासून 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' हे विशेष अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या प्रभावी आणि यशस्वी अंमलबजावणीसाठी सामूहिक प्रयत्नातून आरोग्य चळवळ गतिमान करावी, असे प्रतिपादन मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी केले.



जिल्हा परिषदेतील पंचायत समिती सभागृहामध्ये जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली माझं गाव आरोग्य संपन्न गाव जिल्हास्तरीय कार्यशाळा घेण्यात आली.

यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सु- धीर ठोंबरे, प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी समृध्दी दिवाणे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी केशव गडापोड, मुख्य लेखा व वित्त अधिकारी दिगंबर माडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बाल कल्याण) विजय बोराटे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. शिवाजी बुचाले, कार्यकारी अभियंता राजू नरवाडे, उपशिक्षणाधिकारी आसावरी काळे यांच्यासह जिल्हास्तरीय अधिकारी उपस्थित होते.

हिंगोली जिल्ह्यातील सर्व ५६३ ग्रामपंचायतींमध्ये हे अभियान एक व्यापक लोकचळवळीच्या रूपात राबवून, स्वतःला झोकून देत काम करण्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी दिल्या. सामूहिक प्रयत्नातून जिल्ह्यातील एक गाव, राज्यस्तरावर बक्षीस पात्र झाले पाहिजे. गाव निरोगी झाल्यास जिल्हा निरोगी होईल आणि पर्यायाने राज्य निरोगी होईल, असे मुख्य कार्यकारी अधिकारी गायकवाड यांनी संबोधित केले.जिल्ह्याला राज्यस्तरावर आदर्श बनवण्याचा सामूहिक संकल्प यावेळी करण्यात आला. नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून माझं गाव आरोग्य संपन्न गाव अभियान आणि मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले.

कार्यशाळे दरम्यान अभियानाच्या स्वरूपावर प्रकाश टाकताना स्पष्ट करण्यात आले की, 'प्रजा निरोगी, तर राज्य सशक्त' या मूळ तत्त्वावर हे अभियान आधारलेले आहे. हे केवळ आरोग्याची प्राथमिक तपासणी करण्यापुरते मर्यादित नसून, आरोग्याला थेट ग्रामविकासाच्या केंद्रस्थानी आणणारे एक व्यापक व्यासपीठ आहे. ग्रामीण भागातील शेवटच्या घटकातील नागरिकाला त्याच्या घरापासून जवळ, सर्वसमावेशक, मोफत आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे हे या अभियानाचे मुख्य ध्येय आहे. यासाठी ३१ मार्चपर्यंत अभियानाशी संबंधित सर्व पूर्वतयारी व नियोजित कामे पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी यावेळी दिले.

ग्रामीण भागात आरोग्याची एक मोठी चळवळ उभी करण्याची गरज आहे. आरोग्य विभागातील अधिकारी, गटविकास अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी, आरोग्य कर्मचाऱ्यांसोबतच आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका आणि ग्रामपंचायतींचे सरपंच यांनी या अभियानात आघाडीवर राहून उत्स्फूर्तपणे काम केले पाहिजे. सर्वांच्या सामूहिक प्रयत्नांतून हिंगोली जिल्ह्याला या अभियानांतर्गत राज्यपातळीवर सर्वोच्च स्थानी नेण्यासाठी प्रत्येकाने कटिबद्ध रहावे असे आवाहन विवेक गायकवाड यांनी केले.

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे, प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, राज्यस्तरीय प्रशिक्षक स्नेहा गवई, प्रीती बगमारे यांनी विविध प्रात्यक्षिके आणि खेळांच्या माध्यमातून नागरिकांम धील आरोग्यविषयक सवयी बदलण्यासाठीचा 'वर्तन बदल संवाद' कसा साधायचा, याचे अत्यंत रंजक आणि प्रभावी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. देवेंद्र जायभाये यांनी केले. तर आभार जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. रवींद्र पुरी यांनी मानले.

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची लोहयात दुष्काळसदृश्य भागाची पाहणी

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. २६ सप्टेंबर -**

पावसाने खंड दिल्यामुळे राज्याच्या बहुतांश भागात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन थेट आम्ही पाहणी करत आहोत. सरकार शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही.पाणी समस्या ,पशुधन, चारा तसेच शेतकऱ्यांच्या मुलांचे शिक्षण यासाठी राज्यसरकार शेतकऱ्याच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहणार आहे असे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आज लोहा शहरात कंधार रोडस्थित पीक पाहणी करताना शेतकऱ्यांना आश्वासित केले.

राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी शनिवारी (२६ सप्टेंबर) जिल्ह्याच्या दुष्काळ पीक पाहणी दौऱ्यावर आल्या होत्या. सकाळी साडे नऊ वाजता लोहा शहरातील कंधार रोड स्थिती शिवाजी वाघमारे यांच्या शेतात त्यांनी सोयाबीन पिकाची पाहणी केली. त्यांच्या सोबत राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, शिक्षक आमदार विक्रम काळे, जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, माजी आ मोहन अण्णा हंबर्डे, राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर, नगराध्यक्ष शरद पाटील पवार, जिल्ह्याध्यक्ष रावणगावकर , कार्याध्यक्ष माधव पावडे, माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार, उपनगराध्यक्ष करीम शेख, माजी नगराध्यक्ष केशवराव मुकदम, हरिभाऊ चव्हाण, भास्कर पवार ,जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, उपविभागीय अधिकारी नरवटे, तहसीलदार विठ्ठल परळीकर कंधार तहसीलदार रामेश्वर गोरे, कृषी अधिकारी कासराळे, पाणीपुरवठा उपअभियंता बनसोडे, इंजि. कराड, जि.प. बांधकाम उपअभियंता शिवाजी राठोड, माजी जिल्हाध्यक्ष धर्माधिकारी, चित्राताई लुंगारे माजी नगराध्यक्ष अनुसया केंद्रे ,माजी



सभापती बाबुराव केंद्रे, कंधार उपनगराध्यक्ष मनान चौधरी जफ्रॉद्दीन बाहोद्दीन यासह म ोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार माध्यमांशी बोलताना म्हणाल्या, पावसाच्या खंडामुळे सगळीकडे दुष्काळसदृश परिस्थिती दिसत आहे. शेतकऱ्यांनी मला अनेक वेळा भेटून आपली व्यथा सांगितली होती. आज प्रत्यक्ष पाहणी केली असता परिस्थिती अत्यंत गंभीर असल्याचे लक्षात आले आहे.

सरकारला या गंभीर परिस्थितीची पूर्ण जाणीव आहे. केवळ कागदावरील आकडेवारीपेक्षा प्रत्यक्ष पाहणीनुसार पंचनामे करण्याचे आदेश संपूर्ण प्रशासनाला देण्यात आले आहेत. जे रिपोर्ट येतील त्यावर सरकार तात्काळ ॲक्शन घेणार आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही. सरकारने याची अत्यंत गंभीर दखल घेतली आहे. शेतकऱ्यांचे पाणी असो, पशुधन असो, चारा असो किंवा त्यांच्या मुलांचे शिक्षण असो, या सर्व बाबतीत सरकार गंभीर आहे. ज्याचे जसे नुकसान झाले आहे, त्याप्रमाणे नक्कीच मदत दिली जाईल. त्यामुळे कोणीही काळजी करू नये, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिली.

**पहिलाच दौरा प्रतापरावांच्या मतदार संघात**

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा दुष्काळी दौरा सुरू झाला. मराठवाडयात २६ तारखेला त्याचा पहिलाच दौरा होता त्या दौऱ्याची सुरुवात त्यांनी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या मतदारसंघात पीक पाहणी दौऱ्याची सुरुवात केली. पुढे मरडस गाव ( गंगाखेड ) येथे त्यांनी पाहणी केली. दरम्यान लोहाकडे येताना सोनखेड येथेही त्यांनी पिकाची पाहणी केली.

**स्व अजितदादा पवार यांची आठवण**

दिवंगत अजितदादा पवार याच्या निधनानंतर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार नांदेड जिल्ह्यात पहिल्यांदाच आल्या. आजच्या त्यांच्या दौऱ्यात स्व. अजितदादा पवार यांची आवर्जून आठवण झाली. शेतकऱ्यांनी त्यांच्या स्मृती जाग्या केल्या. हा प्रसंग तसा भावुक होता पण अजितदादा प्रमाणेच खंबीरपणे मी तुमच्या पाठीशी उभी राहील असा विश्वास सुनेत्रा वाहिणींनी व्यक्त केला.

## डीजे मुक्त;पारंपारिक वाद्यांच्या गजरात बाप्पांना निरोप

**नवीन नांदेड** -सिडको- हडको नांदेड शहरासह गणेश मंडळाने पारंपारिक वाद्याच्या गजरात शांतता, सुव्यवस्था, शिस्त, सामाजिक सलोखा राखून गणेश मंडळाने सजीव देखाव्याचे सादरीकरण करून गणेश मंडळाच्या भक्तांनी एक आदर्श निर्माण करून यावर्षी गणरायाचे विसर्जन मोठ्या उत्साहात करण्यात आले. सिडको परिसरातील गणेश मंडळांनी डीजे मुक्त व घातक लेझर लाईटचा वापर टाळून पारंपारिक वाद्याच्या गजरात गणेशोत्सव साजरा करण्यात आला. यामध्ये बळीरामपूर येथील जय महाराष्ट्र गणेश मंडळ पावरलुम या गणेश मंडळाने आजचा तरूण कसा व्यासनाधिन होऊन गुन्हेगारी प्रवृत्तीच्या विळख्यात सापडला आहे. त्याचा परिणाम कुटुंबावर होतो. आप्रकारचा सजीव देखाव्याचे सादरीकरण करून करण्यात आला होता. त्याचप्रमाणे जय व्यंकटेश महालक्ष्मी गणेश मंडळ पावरलूम-४ यांच्या वतीने नवरी नटली या गीतावरील सजीव देखाव्याचे सादरीकरण करण्यात आले.तसेचन्तु ओमकार गणेश मंडळ जिंदमनगरचा राजाया गणेश मंडळांनी अफजल खानाचा वध या देखाव्याचे छायाचित्रीकरण करून इतिहासची आठवन करून दिली. एकदंत गणेश मंडळ जिंदमनगर -२,ओमकार गणेश मंडळ एन.डी.-३२ महाकाय गणेश मुर्तीचे दर्शन घडवून आणले, शिव गणेश मंडळ वैभव नगर हडको या ठिकाणीही गणरायाची महाकाय मूर्तीचे दर्शन झाले. गणेश विसर्जनाच्या मिरवणुकी दरम्यान सिडकोच्या मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूला अन्नदात्यांनी ठिकठिकाणी अन्नदान केले.सिडको हडको परिसरातील सर्व गणेश मंडळांनी आपापल्या गणेश मूर्तीच्या उंची प्रशासनाने ठरवून दिलेल्या गणेश विसर्जनची ठिकाणे ढाकणी खदान, झरी खदान या सह गोदावरी च्या अन्य ठिकाणी जाऊन शांततेत गणेश मूर्तीचे विसर्जन करण्यात आले. सदरील विसर्जनात कुठलाही गैरप्रकार घडू नये म्हणून पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशान्वये नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. सदरील गणेश उत्सवात पोलीस अधिकारी-कर्मचारी, सिडको क्षेत्रीय कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त डॉ. मिर्झा बेग व त्यांचे सहकारी अधिकारी -कर्मचारी व विज महावितरणचे अधिकारी सहकारी कर्मचारी यांनी तारेवरची कसरत करून कुठलाही अनुचित प्रकार घडू दिला नाही.




## निरोगी जीवनशैली हीच उत्तम आरोग्याची गुरुकिल्ली : डॉ.समरीन शेख

**बिलोली** -सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत राबविण्यात येत असलेल्या 'सेवा संकल्प अभियान - निरोगी उद्यासाठी' उपक्रम ांतर्गत बिलोली ग्रामीण रुग्णालयात आयुर्वेद दिवस साजरा करण्यात आला. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. समरीन शेख यांनी रुग्णांना दैनंदिन जीवनात आरोग्याची काळजी घेणे यासह निरोगी जीवनशैली हीच उत्तम आरोग्याची गुरुकिल्ली असल्याचे मार्गदर्शन केले आहे. आरोग्यदायी जीवन जगण्यासाठी दिवसाची सुरुवात सूर्योदयापूर्वी उठण्यापासून करावी, असे सांगत त्यांनी मल-मूत्र विसर्जन, उपासना, दंतधावन व जिव्हालेखन, नियमित व्यायाम व योगासने, अभ्यंग, स्नान आणि संतुलित आहाराचे महत्त्व समजावून सांगितले.यावेळी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ.योगेश राजपुत,वैद्यकीय अधिकारी डॉ.सुनिल कदम,डॉ.झहिम सिद्धिखी,डॉ.बेग,डॉ.क्षितिजा गव्हाणे यांच्यासह बिलोली तालुक्यातील रुग्णांचा उपस्थितीत होते. उपस्थितांनी आरोग्यदायी प्रतिज्ञा घेऊन सांगता केली आहे.

## आदमपूरात गणेश विसर्जन शांततेत

**आदमपूर** -बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर परिसरातील श्री गणेश विसर्जन सार्वजनिक सोहळा शुक्रवार दि.२५ सप्टेंबर रोजी शांततेत व उत्साहात पार पडला. येथील बस स्टँड जवळील बुरूड गल्लीत विराजमान जय श्रीराम गणेश,जगदंब गणेश, छावा गणेश,छत्रपती गणेश, एकदंत गणेश,श्रीसाई गणेश, जय बजरंग गणेश व सार्वजनिक नवयुवक गणेश,महात्मा बसवेश्वर गणेश,खंडोबा बाल गणेश आदि मंडळांच्या विद्यमान पदाधिकाऱ्यांकडून श्रीगणेशाची यथासांग विधिवत प्रतिष्ठापणा करण्यात आली होती. अंतिम चार दिवसांपासून प्रत्येक गणेश मंडळाचे भाविक भक्तांना महाप्रसादही वाटप करण्यात आले होते.विविध गुणप्रदर्शन, आरोग्य शिबिर,कीर्तन,प्रवचन महाप्रसाद,अन्नदान,नवीन उपक्रम आदि कार्यक्रमही विशेष घेण्यात आले होते.सर्व समाज बांधव नागरिकांकडून श्रीगणेशाची अकरा दिवस आराधना करण्यात आली.समाज उपयोगी कार्यक्रमातून एक आगळा वेगळा संदेशही आदमपूर परिसरातील गणेश मंडळाकडून देण्यात आला.जय श्रीराम गणेश मंडळाने मुस्लिम कुटुंबास आरतीचा मान देऊन धार्मिक एकात्मतेचा पाया भक्कम केला. येथील गावच्या लगत बिलोली रोडवरील साठवण तलाव अर्थात 'कुंटा' यंदा कमी पावसामुळे कोरडा असल्याने एकाही मोठ्या गणपतीचे विसर्जन करता आले नाही.त्याऐवजी थडीसावळी- खतगांव परिसरातील कोटेकल्लूर निम्न पातळी बंधारा व शेजारील मिनकीच्या तलावात श्रीगणेशाचे विसर्जन सामुहिक श्रीआरती वंदनाने करण्यात आले.आसमंती गुलालाच्या उधळणीत गावच्या मुख्य रस्त्यावरून मिरवणूक मार्गक्रमण करताना आजूबाजूस लहान मुले,जेष्ठ महिला, भगिनींचीही पाहण्यास गर्दी उत्स्फूर्त जमलेली होती.



# मुदखेड व मुखेडचा दुष्काळी तालुक्यांमध्ये समावेश करा : खा. अशोकराव चव्हाण

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २६ सप्टेंबर -**

राज्यामध्ये यंदा खरीप हंगामात पावसाने मोठी ओढ दिल्याने शासनाने २६५ तालुक्यांम ध्ये दुष्काळ जाहीर केला आहे. यामध्ये नांदेड जिल्ह्यातील १६ पैकी १४ तालुक्यांचा सम ावेश करण्यात आला आहे. 'ट्रिगर-१' लागू न झाल्याच्या तांत्रिक कारणास्तव मुदखेड आणि मुखेड या दोन तालुक्यांचा या यादीत समावेश होऊ शकला नाही. परंतु, पिकांची प्रत्यक्ष परिस्थिती व शेतकऱ्यांचे नुकसान लक्षात घेता या दोन तालुक्यांचाही दुष्काळी यादीत समावेश करावा, अशी मागणी माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.



याबाबत त्यांनी मुख्यमंत्र्यांना सविस्तर पत्र पाठवले असून, त्यांच्याशी दूरध्वनीवरूनही चर्चा केली आहे. मुख्यमंत्र्यांना दिलेल्या पत्रात खा. अशोकराव चव्हाण यांनी निदर्शनास आणून दिले आहे की, मुदखेड तालुक्यात सरासरीच्या ८५ टक्के तर मुखेडमध्ये ८१ टक्के पावसाची नोंद असली, तरी एकाच दिवशी मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने ही आकडेवारी वाढलेली आहे. प्रत्यक्षात पावसाचे वितरण अत्यंत असम ान राहिले आहे. शिवाय, पिकांच्या वाढीसाठी सर्वात निर्णायक असलेल्या ऑगस्ट महिन्यातच पावसाचा मोठा खंड पडल्याने पिकांची वाढ खुंटली आणि शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले.

पिकांच्या नुकसानीची आकडेवारी म ांडताना खा. चव्हाण यांनी पत्रात नमूद केले आहे की, उपलब्ध माहितीनुसार मुदखेड तालुक्यात पेरणी झालेल्या २१ हजार ६७१ हेक्टरपैकी १३ हजार ८२३ हेक्टर क्षेत्रावरील पिके वाया गेली आहेत. तर मुखेड तालुक्यात पेरणी झालेल्या ७५ हजार ८८८ हेक्टरपैकी तब्बल ६१ हजार ६०० हेक्टरवरील पिकांना मोठा फटका बसला आहे. यंदाच्या हंगामात नांदेड जिल्ह्याच्या उत्पादनात ७०.६९ टक्के संभाव्य घट अपेक्षित आहे. मुदखेड आणि मुखेडमध्येही हेच प्रमाण ६० ते ७० टक्क्यांच्या घरात आहे. याचाच अर्थ, या दोन तालुक्यांतील उत्पादनाची संभाव्य घट आणि जिल्ह्याची सरासरी घट यात फारसा फरक नाही. त्यामुळे मुदखेड आणि मुखेडची स्थिती इतर दुष्काळी तालुक्यांपेक्षा वेगळी नाही.

पावसाचा प्रदीर्घ खंड आणि पिकांचे झालेले अतोनात नुकसान पाहता, यंदा शेतकऱ्यांच्या हाती कोणतेही उत्पन्न येणार नाही, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे केवळ तांत्रिक निकषांवर न अडकता, विशेष बाब म्हणून पिकांची प्रत्यक्ष वाढ आणि झालेले नुकसान लक्षात घेऊन मुदखेड व मुखेड या दोन्ही तालुक्यांचा दुष्काळी यादीत समावेश करावा व शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी आग्रही मागणी खा. अशोकराव चव्हाण यांनी केली आहे.

# आरोपांपेक्षा चौकशीला सामोरे जा; सत्य समोर आणा

## आदिवासी विकास प्रकल्पातील १६.३७ कोटींच्या कथित गैरव्यवहारावर आमदार भीमराव केराम यांची भूमिका

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २६ सप्टेंबर -**

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील १६.३७ कोटी रुपयांच्या कथित निधी गैरव्यवहारप्रकरणी प्रशासनाने चौकशी सुरू केली असून, या प्रकरणात संबंधित कर्मचाऱ्यावर कारवाई करण्यात आली आहे. दरम्यान, काही संघटनांकडून आमदार भीमराव केराम यांच्यावर थेट आरोप करून राजीनाम्याची मागणी करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर, आरोप-प्रत्यारोप करण्याऐवजी निष्पक्ष आणि उच्चस्तरीय चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे, अशी भूमिका आमदार भीमराव केराम यांनी मांडली आहे.

या प्रकरणात २८० धनादेशांच्या माध्यमातून निधीचा व्यवहार झाल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. या व्यवहारांना कोणत्या स्तरावर मंजुरी देण्यात आली, निधी नेमका कुठे वळविण्यात आला, संबंधित अधिकारी-कर्मचारी यांची भूमिका काय होती आणि संपूर्ण आर्थिक व्यवहारांची साखळी काय आहे, याची सखोल चौकशी होणे आवश्यक असल्याचे आमदार भीमराव केराम यांनी म्हटले आहे.

दरम्यान, वरिष्ठ लिपिक भगवान उद्धवराव डवरे यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. अपर



आयुक्त, अमरावती यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली असून, सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी बी. सरवणन यांनी २२ सप्टेंबर रोजी निलंबन आदेश बजावला. पुढील तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे देण्यात आला असून, पोलिस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या नेतृत्वाखाली तपास सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे.

तसेच, जिल्हाधिकाऱ्यांकडून या प्रकरणाच्या प्रशासकीय चौकशीसाठी चार सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे. किनवट पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २५६/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेतील विविध कलम ांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, आर्थिक व्यवहारांचा तपास केला जात आहे.

'एका कर्मचाऱ्यावर कारवाई झाली म्हणजे प्रकरण संपले असे समजू नये. तपासात संबंधित अधिकारी, कर्मचारी अथवा अन्य कोणाचीही भूमिका निष्पन्न झाल्यास कायद्यानुसार कारवाई झाली पाहिजे. दोषी कोणत्याही पदावर असो, त्याला संरक्षण मिळता कामा नये,' अशी स्पष्ट भूमिका आमदार भीमराव केराम यांनी मांडली.

चौकशी पूर्ण होण्यापूर्वी केवळ आरोपांच्या आधारे कोणालाही दोषी ठरवणे योग्य नसल्याचेही आमदार भीम राव केराम यांनी स्पष्ट केले. या आर्थिक व्यवहारांशी थेट संबंध असल्याचा अधिकृत निष्कर्ष अद्याप समोर आलेला नसताना राजीनाम्याची मागणी करणे योग्य नसल्याचे सांगण्यात आले.

आदिवासी समाजाच्या विकासासाठी मंजूर होणाऱ्या निधीचा पारदर्शक आणि योग्य विनियोग झाला पाहिजे. त्यामुळे गरज भासल्यास फॉरेन्सिक ऑडिट, संपूर्ण मनी ट्रेलची तपासणी आणि स्वतंत्र उच्चस्तरीय चौकशी करण्यास पूर्ण पाठिंबा असल्याचेही आमदार भीमराव केराम यांनी स्पष्ट केले.

'चौकशी करा, सत्य समोर आणा आणि दोषी आढळल्यास कठोर कारवाई करा,' अशी भूमिका घेत आमदार भीमराव केराम यांनी किनवट-माहूरच्या आदिवासी जनतेच्या हक्काच्या निधीबाबत पारदर्शक तपासाची मागणी केली आहे.

# मुदखेडमध्ये भर उन्हात वृक्षलागवड ; वनीकरण विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २६ सप्टेंबर -**

मुदखेड शहरातील गट क्र. ४२७ येथील माळाच्या माळरानावर सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने वृक्षलागवड करण्यात येत असून, या कामावरून स्थानिक नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. या ठिकाणी यापूर्वी नर्सरीअंतर्गत लावण्यात आलेली झाडे तोडून जमीन सपाट करण्यात आली आणि त्याच ठिकाणी पुन्हा नवीन वृक्षलागवड केली जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

सध्या सप्टेंबर महिन्यात कडाक्याचे ऊन असताना वृक्षलागवडीचे काम सुरू



असल्याने लागवड केलेली रोपे कितपत तग धरतील, असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत. वृक्षलागवडीसाठी पावसाळ्याच्या सुरुवातीचा काळ अधिक अनुकूल असताना जून महिन्यात नियोजनबद्ध पद्धतीने लागवड करणे अपेक्षित होते. मात्र, पावसाळ्याचा मोठा कालावधी उलटल्यानंतर भर उन्हात वृक्षलागवड करण्यामागील नियोजन काय, असा सवालही केला जात आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, एकीकडे म राठवाड्यात कोरड्या दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली असून पाण्याची कमतरता भासत आहे, तर दुसरीकडे आधीच अस्तित्वात असलेली झाडे हटवून त्याच ठिकाणी नवीन रोपे लावली जात आहेत. त्यामुळे शासनाच्या निधीचा योग्य वापर होत आहे का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

नवीन रोपांची लागवड केल्यानंतर त्यांना नियमित पाणी, संरक्षण व संगोपन मिळणे आवश्यक असते. मात्र, सध्याच्या उन्हाळी वातावरणात पुरेशा पाण्याअभावी रोपे वाळण्याची शक्यता असल्याने लागवडीपूर्वी व लागवडीनंतरच्या देखभालीचे नियोजन करण्यात आले आहे का, याची माहिती विभागाने सार्वजनिक करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

गट क्र. ४२७ मधील पूर्वीची झाडे नेमक्या कोणत्या कारणामुळे तोडण्यात आली, जमीन सपाट करण्यासाठी किती खर्च झाला, नवीन वृक्षलागवडीसाठी किती निधी मंजूर आहे आणि या रोपांच्या संगोपनासाठी काय उपाययोजना करण्यात येणार आहेत, याबाबत सामाजिक वनीकरण विभागाने स्पष्ट माहिती द्यावी, अशी मागणी होत आहे.

दरम्यान, सामाजिक वनीकरण विभागाचा हा कारभार 'अजब-गजब' असल्याची प्रतिक्रिया म ुदखेड तालुक्यातील नागरिकांकडून व्यक्त होत असून, संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी म ागणीही जोर धरत आहे.

## 'धुक्याची दुलई'चे आज प्रकाशन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २६ सप्टेंबर -**

ज्येष्ठ साहित्यिक अनुरत्न वाघमारे लिखित धुक्याची दुलई या प्रवासवर्णनपर पुस्तकाचा प्रकाशन सोहळा येत्या रविवारी २७ सप्टेंबर रोजी सकाळी अकरा वाजता हॉटेल विसावा येथे आयोजित करण्यात आला असून येथील ज्येष्ठ साहित्यिक तथा ४३ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. जगदीश कदम यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन होणार आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुरेश घुले हे राहणार आहेत तर या पुस्तकावर फुले आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ विचारवंत सविस्तर भाष्य करणार आहेत.

# गोव्याच्या सांस्कृतिक भूमीत साहित्यपुष्प फुलले

## अवनी करंदीकर लिखित 'द हिडन पॉवर ऑफ मॅरिड वूमन'पुस्तकाचे थाटात प्रकाशन; ॲमेझॉनवर ठरले 'नंबर १ बेस्टसेलर'

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २६ सप्टेंबर -**

इंटरनॅशनल कौन्सिल ऑफ ऑथर्सतर्फे गोव्यात आयोजित पुस्तक प्रकाशन सोहळ्यात, गोदावरी अर्बनचे व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर यांची कन्या सौ. अवनी अथर्व करंदीकर (देवयानी तांबेकर) यांच्या 'द हिडन पॉवर ऑफ मॅरिड वूमन'या पुस्तकाचे प्रकाशन थाटात पार पडले. अल्पावधीतच हे पुस्तक ॲमेझॉनवर 'नंबर १ बेस्टसेलर' ठरल्याने त्यांच्यावर देशभरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

गोव्यातील निसर्गरम्य




वातावरणात वसलेल्या प्रसिद्ध 'हॉटेल रेनेसां'येथे 'इंटरनॅशनल कौन्सिल ऑफ ऑथर्स'(आयसीए)च्या वतीने भव्य पुस्तक प्रकाशन सोहळ्याचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. देशभरातील नाम ांकित लेखक, विचारवंत आणि साहित्यिकांच्या मांदियाळीत हा सोहळा अत्यंत उत्साहात पडला. 'आयसीए'चे संस्थापक मि. इन्स्पायरिंग जतिन यांच्या हस्ते 'द हिडन पॉवर ऑफ मॅरिड वूमन'या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. या प्रसंगी अवनी करंदीकर यांनी संपादित केलेल्या 'अँथॉलॉजी चॅप्टर'मधील त्यांच्या अद्वितीय आणि मौलिक साहित्यातील योगदानाची दखल घेत, त्यांना विशेष प्रावीण्य प्रमाणपत्र व सन्म ानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी अवनीचे वडील धनंजय तांबेकर व आई सौ. सुषमा तांबेकर यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

**प्रकाशन होताच ॲमेझॉनवर यशाची मोहोर**

'कष्टाचे चीज होणे'म्हणतात, अगदी तसाच प्रत्यय या पुस्तकाच्या बाबतीत आला. प्रकाशनानंतर अवघ्या काही तासांतच या पुस्तकाने जागतिक दर्जाच्या 'ॲम ेझॉन'या डिजिटल व्यासपीठावर 'नंबर १ बेस्टसेलर'चा किताब पटकावला. विवाहित स्त्रियांच्या सुप्त शक्ती, त्यांची कौटुंबिक व सामाजिक समीकरणांमधील भूमि का आणि आत्मशोधाचा प्रवास यांवर अवनी यांनी अत्यंत प्रभावी व अभ्यासपूर्ण भाष्य केले आहे. वाचकवर्गाकडून या पुस्तकाला उदंड प्रतिसाद मिळत आहे.

**समकालीन स्त्री-साहित्यातील प्रवाह आणि संदर्भ**

सध्याच्या डिजिटल युगात आणि साहित्याच्या बदलत्या प्रवाहात भारतीय महिला लेखिका जागतिक पटलावर स्वकर्तृत्वाने आपली वेगळी ओळख निर्माण करत आहेत. मराठी साहित्याला वैचारिक आणि सामाजिक बांधिलकीचा मोठा वारसा लाभला आहे. त्याच परंपरेला पुढे नेत, आधुनिक काळातील कौटुंबिक आव्हाने आणि स्त्री-शक्तीचा जागर इंग्रजी भाषेत मांडण्याचे महत्त्वाचे कार्य अवनी करंदीकर यांनी केले आहे. आजच्या काळात ई-बुक्स आणि डिजिटल प्रकाशनाच्या माध्यमातून जागतिक वाचकांपर्यंत पोहोचणे अधिक सुलभ झाले असून, अवनी यांच्या या यशामुळे भारतीय इंग्रजी लेखनाचा एक नवा आयाम समोर आला आहे.